सोलापूर तरुण भारत
आसमंत




# नव्या आव्हानांसाठी संशोधन सुसज्जता!

लक्ष्यवेध
**तेजस परब**

'रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलमेंट' आणि 'डीप टेक'मध्ये गुंतवणुकीला चालना मिळावी, यासाठी केंद्र सरकारने एकूण एक लाख कोटी रुपयांच्या नव्या योजनेला मंजुरी दिली आहे. केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या संदर्भात नुकतीच घोषणा केली. त्यानिमित्ताने...

नवी दिल्लीत मंत्रिमंडळ बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी एक लाख कोटी रुपयांच्या संशोधन, विकास आणि सृजनशीलतेला चालना मिळेल अशा 'आरडीआय' योजनेला नुकतीच मंजुरी दिली आहे. यामुळे रणनीतिक आणि उभरत्या क्षेत्रांमध्ये 'रिस्क फंड' (जोखीम निधी) उपलब्ध होईल. या योजनेद्वारे क्वांटम कम्प्युटिंग, रोबोटिस, जैवतंत्रज्ञान आणि आर्टिफिशयल इंटेलिजन्स अशा नवनव्या क्षेत्रांना ही योजना स्पर्श करेल. गेल्या वर्षी अर्थसंकल्पात यासंदर्भातील घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार, संरचना आखली जात आहे. संशोधन आणि विकासासाठी द्विस्तरीय आराखड्यानुसार, दीर्घ मुदतीवर शून्य टक्के व्याजासह निधी किंवा कर्जाचे पुनर्गठन (रिफायनान्सिंग) करण्याच्या दृष्टीने सुविधा देण्यात आली. या बहुप्रतीक्षित योजनेचा लाभ अनेक खासगी संस्थांसाठी फायदेशीर ठरू शकतो.

भारतात 'रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट'वर होणारा खर्च हा एकूण 'जीडीपी'च्या केवळ ०.७ टक्के म्हणजे एक टक्कादेखील नाही, इतका तो नगण्य आहे. पण, आता हळूहळू परिस्थिती बदलताना दिसते. इस्रायल, दक्षिण कोरिया, अमेरिका, जपान, चीन, जर्मनी हे देश मात्र संशोधनावरील तरतुदीत आघाडीवर आहेत. तज्ज्ञांच्या मते, केवळ 'रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट'मध्ये नव्हे, तर 'डेव्हलपेंट अ‍ॅण्ड इंजिनिअरिंग' क्षेत्रात तत्काळ गुंतवणुकीची गरज आहे. ज्याद्वारे वैज्ञानिक संभाव्यतेसाठी सज्ज राहणे सोपे होत जाईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील 'अनुसंधान नॅशनल रिसर्च फाऊंडेशन' (एएनआरएफ) ५० वर्षांचे व्याजमुक्त कर्ज दिले जाईल. त्यानंतर दुसर्या टप्प्यात पर्यायी गुंतवणूक निधी संस्था, आर्थिक विकास संस्था, बिगर बँकिंग कंपन्या यांना कर्जस्वरूपात निधी दिला जाईल.

दुसर्‍या स्तरातील निधीवाटपामुळे 'डीप टेक फंड्स', अद्ययावत तंत्रज्ञानासाठी, तंत्रज्ञानात आमूलाग्र बदल घडविण्यासाठी मदत मिळू शकेल. नवनिर्मितीसाठी तत्काळ निधी वर्ग करण्याची गरज अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. जागतिक स्तरावर अमेरिकेसारखे देश 'नॅशनल सायन्स फंड'सारख्या संस्थांना निधी वर्ग करतात. भारताने केलेल्या घोषणेचा लाभ हा खासगी क्षेत्रासाठी आमूलाग्र बदल करणारा ठरणार आहे. केंद्र सरकारचा विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग हा या योजनेसाठी 'नोडल एजन्सी' म्हणून काम करणार आहे. बदलत्या उद्योगविश्वाने या बदलाचा नव्याने स्वीकार केला आहे.

'एएनआरएफ'चे संचलन मंडळ 'आरडीई' योजनेला व्यापक रणनीतिक दिशा ठरवणार आहे, तर 'कार्यकारी परिषद' ही योजना आणि द्विस्तरीय निधी व्यवस्थापकांना दिशानिर्देशक म्हणून मदत करेल. कोणकोणती क्षेत्र या योजनेअंतर्गत येऊ शकतात, याबद्दल लवकरच कॅबिनेट सचिवांची टीम निर्णय घेईल. 'रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट'साठी जोखीम निधी वळवण्याचे धाडस कंपन्या करतात. मात्र, या निर्णयामुळे सरकार आणि खासगी संस्था यांच्यात एक दुवा निर्माण होण्याची शयता आहे. यात ऊर्जा सुरक्षा आणि पारेषण, तसेच पर्यावरणीय कृती आराखडा, क्वांटम कम्प्युटिंग, रोबोटिस आणि अंतराळ क्षेत्रांसह 'डीप टेक'चाही समावेश आहे.

कृषी, आरोग्य, शिक्षण यांसारख्या क्षेत्रांमध्ये भारतातील विशिष्ट आव्हानांचा विचार करण्याची गरज आहे. जैवतंत्रज्ञान, जैविक उत्पादन आणि फार्मा, डिजिटल शेती आणि डिजिटल अर्थव्यवस्था या क्षेत्रांसाठी ही योजना महत्त्वाची ठरणार आहे.

भारतात पूर्वापार अंतराळ, संरक्षण, अणुऊर्जा, फार्मा आणि माहिती-तंत्रज्ञान या क्षेत्रातील 'रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट'वर भर दिला जातो. याउलट आता नव्या उभरत्या क्षेत्रासाठी आणखी निधी देण्याची गरज सरकारला दिसू लागली आहे. परिणामी, भारतातील उच्च-शिक्षित मनुष्यबळ हे इतर देशांकडे वळू लागते. आपल्या शालेय किंवा महाविद्यालयातील संस्थांमध्ये संशोधनाला असलेले कमी महत्त्व यामुळे समाजाचा याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलत जातो. त्याआधारे 'रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट' संस्थाही तशा मोजयाच. यामुळेच केंद्र सरकारने नव्या शैक्षणिक धोरणात 'राष्ट्रीय संशोधन संस्थे'साठी आणखी ५० हजार कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. शिक्षण, उद्योग आणि अन्य क्षेत्रांचा संबंध अधिक दृढ व्हावा, यादृष्टीने सुरुवातीच्या काळातच संशोधनाचे बीज विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याची गरज नव्या शैक्षणिक धोरणात सांगितली आहे. 'एआय', क्वांटम, हरितऊर्जा अशी अनेक क्षेत्र बदलत्या धोरणानुसार उपलब्ध आहेत. त्यामुळे 'पिन-टू-पियानो' प्रत्येक गोष्टीला नवनिर्मितीची गरज आहे. आपल्या दैनंदिन जीवनातच आपण किती बदल पाहू शकतो. टिव्ही, मोबाईल्स, कम्प्युटर्स, कॅमेरा अशा कित्येक क्षेत्रांत झालेले बदल आपण अनुभवतो आहोत. परंतु, दुर्दैवाने हे बदल पाश्चिमात्य देशांतून भारतात आले. याचा अर्थ भारतीयांना नवीन शोध लावलेच नाही, असा अजिबात होत नाही. अशा कित्येक गोष्टींचा शोध भारताने लावल्याचीही उदाहरणे देता येतील.

आता केंद्र सरकारने ही योजना आणून 'जीडीपी'च्या एकूण एक टक्के निधी हा 'रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट'साठी वर्ग करण्याची तयारी दर्शविली आहे. आगामी दहा ते १५ वर्षांत हा आकडा तीन ते ३.५ टक्क्यांपर्यंत पोहोचायला हवा. त्याचबरोबर खासगी क्षेत्रातील संशोधनाची देखरेख आणि त्या मोबदल्यात त्यांना करसवलत अशा प्रोत्साहनाची गरज आहे. मुळात म्हणजे 'रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट' या क्षेत्राला जास्तीत जास्त गांभीर्याने घेऊन, त्यादृष्टीने नवे तंत्रज्ञान स्वीकारण्याची गरज आहे.

शिक्षण क्षेत्रात याचे पडसाद प्रामुख्याने उमटवण्याची गरज आहे. काही दिवसांपूर्वीचीच बातमी आहे. चीनने त्यांच्या 'फॉसकॉन' कंपनीतील अभियंत्यांना माघारी बोलावून घेतले आहे. (पान ४ वर)



**अंतराळवीर शुभांशु शुक्ला हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (आयएसएस) जाणारे पहिले भारतीय अंतराळवीर ठरले आहेत. अ‍ॅक्सिओम-४ या ऐतिहासिक मोहिमेतून ते यशस्वीपणे पृथ्वीवर परतले आहेत. त्यांच्या धैर्याने, समर्पणाने संपूर्ण देशाचा अभिमान उंचावला आहे. त्यांच्या या प्रवासाने भारताच्या अंतराळ स्वप्नांना नवी दिशा दिली आहे. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणारे पहिले भारतीय अंतराळवीर म्हणून त्यांनी आपल्या समर्पण आणि धैर्याने लाखो लोकांना प्रेरणा दिली आहे. हा मानव अंतराळ उड्डाण मोहिमेकडे जाणारा आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.**

# शुभांशुची गगनयान भरारी

गौरव
**प्रतिनिधी**

शुभांशु शुक्ला यांची अंतराळयात्रा केवळ ऐतिहासिक नव्हती, तर विज्ञानासाठीही खूप महत्त्वाची ठरली. त्यांनी अंतराळात केवळ तांत्रिक कामच केलं नाही, तर अनेक वैज्ञानिक प्रयोगांतही भाग घेतला. अ‍ॅक्सियम-४ मोहिमेचे कमांडर पेगी व्हिटसन, पायलट शुभांशु शुक्ला आणि मिशन स्पेशालिस्ट स्लावोझ अझनान्स्की विझनीव्हस्की व टीबोर कापू यांनी २५ जून रोजी फ्लोरिडातून अंतराळयात्रा सुरू केली. २६ जून रोजी ते इंटरनॅशनल स्पेस स्टेशनला पोहोचले होते. दरम्यान, अमेरिकन अंतराळ संस्था नासा आणि भारतीय संस्था इस्रो यांच्यातील करारानुसार भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांची अ‍ॅक्सिओम-४ या मोहिमेसाठी निवड झाली होती. ४१ वर्षांपूर्वी १९८४ मध्ये सोव्हिएत युनियनच्या अंतराळयानातून भारताचे राकेश शर्मा यांनी अंतराळात प्रवास केला होता. यानंतर शुभांशू यांचा हा अनुभव भारताच्या गगनयान मोहिमेत उपयुक्त ठरणार आहे. ही भारताची पहिली मानवी अंतराळ मोहीम आहे, ज्याचा उद्देश भारतीय अंतराळवीरांना पृथ्वीच्या खालच्या कक्षेत पाठवणे आणि त्यांना सुरक्षितपणे परत आणणे आहे. हे २०२७ मध्ये प्रक्षेपित होण्याची शक्यता आहे.

शुभांशू शुक्ला हे भारतीय हवाई दलात स्क्वाड्रन कमांडर आहेत आणि त्यांना २००० तासांहून अधिक उड्डाणाचा अनुभव आहे. आपल्या १८ दिवसांच्या अंतराळ प्रवासात त्यांनी ६० पेक्षा अधिक शास्त्रीय प्रयोगांमध्ये सहभाग घेतला, ज्यामध्ये भारताचे ७ महत्त्वाचे प्रयोगही समाविष्ट होते. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) शुभांशु शुक्ला यांच्या आयएसएस प्रवासासाठी सुमारे ५५० कोटी रुपये खर्च केले आहेत. हा अनुभव इस्रोला २०२७ मध्ये सुरू होणाऱ्या 'गगनयान' या मानवी अंतराळ मोहिमेची तयारी करण्यासाठी उपयुक्त ठरेल.

शुभांशु शुक्ला यांनी अंतराळात १८ दिवसांमध्ये दररोज १६ सूर्योदय आणि सूर्यास्त पाहिले कारण आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक पृथ्वीपासून सुमारे ४०० किलोमीटर अंतरावर असलेल्या कक्षेत २८,००० किलोमीटर प्रति तास वेगाने फिरत होते. तसेच शुभांशु शुक्ला आणि टीममधील इतर अंतराळवीरांनी अंतराळात १४ दिवस अनेक वैज्ञानिक संशोधन केले. ज्यामध्ये अंतराळात मानवी शरीरावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे समाविष्ट आहे. एकूण संपूर्ण टीमने ३१ देशांमधून ६० प्रयोग केले, ज्यात विज्ञान आणि तंत्रज्ञानाला पुढे नेण्यासाठी विविध प्रकारचे प्रयोग समाविष्ट आहेत. शुभांशु शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर हरभरा, मेथी आणि मूगाचे बियाणे वाढवले आहे. सूक्ष्म गुरुत्वाकर्षणामध्ये वनस्पतींच्या बिया कशा अंकुरतात आणि वाढतात हे पाहण्याच्या उद्देशाने केलेल्या संशोधनाचा हा एक भाग होता. त्यांनी ISS वर पेट्री डिशमध्ये मूग आणि मेथीचे बियाणे अंकुरित केले आणि नंतर ते ISS वरील एका स्टोरेज फ्रीजरमध्ये ठेवले. (पान ४ वर)

# दुर्मीळ खनिजांचे शस्त्रीकरण आणि भारताला संधी

वेधक
**पार्थ कपोले**

**संकट हेच संधीचे दुसरे नाव आहे. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदीही अनेकदा 'आपदा में अवसर' असा संदेश देताना दिसतात. दुर्मीळ खनिजांच्या जागतिक राजकारणात हीच उक्ती अगदी खरी ठरताना दिसते. चीनच्या मक्तेदारीने निर्माण केलेल्या संकटात भारताला स्वतःचे स्थान आणि सामर्थ्य सिद्ध करण्याची दुर्मीळ संधी प्राप्त झाली आहे. त्याचे आकलन...**



स्मार्टफोन, क्षेपणास्त्रे, चुंबक, इलेट्रिक वाहने, पवनचक्क्या अर्थात 'टर्बाईन' यासाठी लागणार्या या १७ धातूंचा तुटवडा निर्माण झाला, तर संपूर्ण तंत्रज्ञान यंत्रणाच विस्कळीत होते. चीनने हीच गोष्ट ओळखून दुर्मीळ खनिजांच्या क्षेत्रात एकहाती वर्चस्व निर्माण केले. सुमारे ७० टक्के जागतिक उत्पादन व ९० टक्के प्रक्रिया उद्योगदेखील आज चीनकडे आहे. चीनने यापूर्वी २०१० साली जपानला आणि आता अमेरिका व भारताला, याच दुर्मीळ खनिजांच्या शस्त्राचा फटका देण्याचा प्रयत्न केला आहे. सात महत्त्वाच्या खनिजांवर निर्बंध लावून चीनने दाखवून दिले की, दुर्मीळ खनिजे ही केवळ अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची नाही, तर जागतिक सत्ता समीकरणातील ते एक प्रभावी हत्यारही आहे.

भारत आजही ९० टक्के दुर्मीळ खनिजे चीनकडूनच आयात करतो. त्यामुळे चीनच्या निर्णयाचा थेट फटका आपल्या संरक्षण उत्पादन, इलेट्रिक वाहन, स्वच्छ ऊर्जा क्षेत्राला बसतो आहे. 'मारुती सुझुकी', 'एमजी मोटर' यांसारख्या कंपन्या कच्च्या मालाच्या टंचाईमुळे अडचणीत आल्या आहेत. संरक्षण क्षेत्रातही भारताला धक्का बसला आहे. परंतु, याचवेळी लक्षात घ्यायला हवे की, भारताकडे स्वतःचे ६.९ दशलक्ष टन साठे आहेत, जे जगातील तिसर्या क्रमांकाचे आहेत. भारतातील आंध्र प्रदेश, ओडिशा, तामिळनाडू, केरळ व पश्चिम बंगालच्या किनार्यावरील वाळूमध्ये मौल्यवान 'मोनाझाईट' सापडतो. तरीही आपण जागतिक उत्पादनात फक्त एक टक्के वाटा उचलतो. अर्थात, ही स्थिती बदलण्यासाठी केंद्र सरकारने आवश्यक धोरणही आखले आहे.

भारताने नुकत्याच जाहीर केलेल्या 'नॅशनल क्रिटिकल मिनरल मिशन'अंतर्गत २०२४-३१ सालच्या दरम्यान एक हजार, २०० अन्वेषण प्रकल्प राबविले जाणार आहेत. एक हजार, ३४५ कोटी रुपयांच्या प्रोत्साहन योजनेत 'महिंद्रा', 'युनो मिंडा', 'सोना बीएलडब्ल्यू' यांसारख्या कंपन्यांनी रस दाखवला आहे. 'इंडियन रेअर अर्थ्स लिमिटेड' (आयएरईएल) देशांतर्गत पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी निर्यात कमी करत आहे. ऑस्ट्रेलिया, ओमान, व्हिएतनाम यांसारख्या देशांशी भागीदारी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अर्थात, हे बदल फक्त धोरणात नाही, तर दृष्टिकोनातही आवश्यक आहेत. खासगी क्षेत्राला आकर्षित करण्यासाठी १९६२ सालच्या अणुऊर्जा कायद्यातील अडथळे दूर करावे लागतील. जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान आणि कौशल्येही आत्मसात करावे लागतील. भारताची हजारो वर्षांची खाणकामाची परंपरा आहे. भारतीय संस्कृती 'पृथ्वीचे रक्षण' करण्याची शिकवण देते. म्हणूनच नवीन धोरणात रोजगारनिर्मिती, स्थानिक समुदायांचा विकास आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा शाश्वत वापर याला महत्त्व द्यायला हवे. दुर्मीळ खनिज क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे फक्त जागतिक पुरवठा साखळीच सशक्त होणार नाही, तर देशांतर्गत रोजगारातही मोठी वाढ होऊ शकते. खाणकाम, प्रक्रिया, संशोधन, वाहतूक, उपकरणनिर्मिती अशा अनेक पातळ्यांवर रोजगाराचे नवीन दरवाजे उघडतील.

ग्रामीण भागात पायाभूत सुविधा निर्माण होतील, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. आज आपण ज्या बदलत्या जागतिक सत्ता-समीकरणाचा भाग आहोत, त्यात 'क्रिटिकल मिनरल्स' महत्त्वाच्या भूमिका बजावत आहेत. चीनचे वर्चस्व हा या बदलत्या जागतिक युगातला सर्वांत मोठा धोका आहे. अमेरिका आणि युरोप चीनच्या मक्तेदारीपासून सुटण्यासाठी नव्या भागीदारांकडे पाहत आहेत. भारत या जागतिक शोधात स्वतःला पर्याय म्हणून उभे करू शकतो. 'ग्लोबल साऊथ'च्या नेतृत्वासाठी भारताने सतत आवाज उठवला आहे.

'ब्रिस' शिखर परिषदेत पंतप्रधान मोदींनी स्पष्टपणे सांगितले की, कोणत्याही देशाने खनिजांचा वापर शस्त्र म्हणून करू नये. हे विधान जागतिक स्तरावर भारताच्या नेतृत्वाची चुणूक दाखवते. जगाला एका विश्वासार्ह, पर्यावरणस्नेही व लोकशाही पद्धतीने काम करणाऱ्या पर्यायाची गरज आहे आणि ही भूमिका भारत निभावू शकतो.

आज जग एका नव्या शीतयुद्धाच्या उंबरठ्यावर आहे, ज्यामध्ये शस्त्र तेलाऐवजी दुर्मीळ खनिजे ठरत आहेत. चीन, अमेरिका, रशिया, युरोप, ऑस्ट्रेलिया यांच्यात स्पर्धा वाढली आहे. अशा परिस्थितीत जर भारताला स्वतःचा प्रभाव वाढवायचा असेल, जागतिक नेतृत्व करायचे असेल, तर 'क्रिटिकल मिनरल्स'च्या शर्यतीत मागे राहून चालणार नाही. भारताला हीच वेळ साधून जागतिक पुरवठा साखळीमध्ये आपली जागा पक्की करावी लागेल. स्वच्छ ऊर्जा, संरक्षण उत्पादने, ग्रीन टेक्नोलॉजी, सेमीकंडटर्स यांसारख्या क्षेत्रात भारताकडे 'विश्वसनीय व जबाबदार भागीदार' म्हणून ओळख निर्माण होऊ शकते. जागतिक सत्ता-समीकरणात 'क्रिटिकल मिनरल्स' ही नवे चलन झाले आहे. चीनने या चलनाचा शस्त्र म्हणून वापर केला. (पान ४ वर)

विश्वसंचार

**मल्हार कृष्ण गोखले**

# ‘यह कैसा सिपाही खुदाने पैदा किया!’

१६ मे १६६५ या दिवसाने एक विलक्षण आक्रित पाहिले.शिवरायांच्या हिंदवी स्वराज्यातल्या पुरंदर गडाला मोगलांचा वेढा पडला होता. खुद्द मिर्झाराजे जयसिंग आणि दिलेरखान पठाण हे वेढ्याचे काम चालवत होते. अतिशय परिश्रमांनी त्यांनी गढाचा खालचा भाग, ज्याला ‘माची’ म्हणतात, तो जिंकला होता आणि आता गढाचा वरचा भाग, ज्याला ‘बालेकिल्ला’ म्हणतात. त्याच्या रोखाने दिलेरखानाने आपले अत्यंत कडवे असे ५ हजार पठाण लढवय्ये सोडले होते. आजच्या परिभाषेत बोलायचे तर उत्तम प्रशिक्षित, निवडक, वेचक असे ५ हजार पठाण कमांडोज् बालेकिल्ल्यावर निकराचा हल्ला चढवायला निघाले होते.

बालेकिल्ल्यावरून सरदार मुरारबाजी देशपांड्याने हे दृश्य पाहिले. त्याचेही ७०० निवडक कमांडो मावळे तयार होते. बालेकिल्ला चढून येणाऱ्या पठाणांवर मुरारबाजी आणि त्याचे मावळे चित्त्यांसारख्या झेपा टाकत तुटून पडले. ५ हजार विरुद्ध फक्त ७००. फारच विषम लढाई. मुरारबाजी आणि त्याच्या मावळ्यांचा आवेशच इतका भयंकर होता की, प्रशिक्षित पठाण पळत सुटले. माची ताब्यात घेऊन बसलेली मोगली सेना पळत सुटली वा ठार झाली, पण मुरारबाजी थांबला नाही. माचीवरून झेपा घेत त्याने थेट मुख्य मोगली वेढ्यावरच चाल केली.

पुरंदर गढाच्या पायथ्याशी एक अत्यंत भीषण रणकंदन सुरू झाले. मोगली सैनिकांचे दस्तेच्या दस्ते मुरारबाजी आणि त्याच्या माणसांवर तुटून पडत होते. अक्षरशः केळीचे खांब छाटावेत तसे त्यांना कापत-मारत-तोडत मुरारबाजी मोगलांच्या मुख्य छावणीकडे घुसत होता. आपल्या खाशा हत्तीवर बसून रणांगणात आलेला दिलेरखान ते अद्भुत दृश्य पाहून आश्चर्याने थक्क झाला. मुखात अंगुळी घालून बोलला, ‘यह कैसा सिपाही खुदाने पैदा किया!’

२६ जानेवारी १९४५ या दिवशी अशीच काहीशी स्थिती फ्रान्समधल्या ‘कोलपर पॉकेट’ या रणभूमीवर लढणाऱ्या जर्मन सैनिकांची झाली. ‘एम १०’ या नावाने ओळखले जाणारे अमेरिकन चिलखती वाहन जर्मनांच्याच तोफगोळ्याने पेरले होते. त्या वाहनातले वाहक, चालक आणि गनर पटापट उड्या टाकून सुरक्षित आडोशाला लपले. पण हे बघून संतापलेला त्यांचा कंपनी कमांडर ताडताड उड्या मारत पुढे आला. स्वतःच्या हातातली ॲसॉल्ट रायफल बाजूला ठेवून त्याने चिलखती वाहनावरची हेवी मशीनगन ताब्यात घेतली आणि तिच्यातून गोळ्यांचा पाऊस पाडत त्याने बघता-बघता ५० जर्मन सैनिक ठार केले.

एवढ्याने भागले नाही. त्याच्या डोक्यावरच्या हेडफोनला वॉकीटॉकी जोडलेला होताच. त्यावरून तो पिछाडीवरच्या अमेरिकन तोफखान्याला जर्मन मोर्च्यांच्या जागा सांगू लागला. अमेरिकन तोफगोळे दणादण येऊन जर्मन मोर्चे भाजून काढू लागले. मागच्या सुरक्षित आडोशातून त्याचे हे आक्रित पाहणारे त्याचे दोस्त त्याला वॉकीटॉकीवरून शिव्या देऊन सांगत होते, ‘अरे गधड्या ती चिलखती गाडी पेटली आहे. कोणत्याही क्षणी तिच्या पेट्रोलच्या टाकीचा स्फोट होईल आणि तुझ्या चिंधड्या उडतील. उडी मार आणि मागे ये.’ पण हा पठ्ठ्या तेव्हाच थांबला, जेव्हा त्या वाहनातले मशीनगनच्या गोळ्यांचे पट्टे पूर्ण संपले.

गंमत म्हणजे याने उडी मारून मागे धाव मारेपर्यंत त्या पेटत्या वाहनाचा स्फोट पण व्हायचा थांबला होता. खरोखर त्या दिवशीची ती विलक्षण हिंस्र लढाई बघून जर्मन शत्रूच नव्हे, तर स्वकीय अमेरिकन सैनिकही म्हणाले असतील, ‘यह कैसा सिपाही खुदाने (किंवा येशूने) पैदा किया!’ त्याच संध्याकाळी त्याला ‘मेडल ऑफ ऑनर’ हा अमेरिकन सैन्याचा सर्वोच्च पुरस्कार (परमवीर चक्राप्रमाणे) जाहीर करण्यात आला. त्या विलक्षण सैनिकाचे नाव होते ऑडी मर्फी.

ऑडी मर्फी हा एक शेतमजूर आईबापांच्या १२ मुलांपैकी एक. ऑडी लहान असताना त्याचा बाप बायको-मुलांना वाऱ्यावर सोडून कुठेतरी परांगदा झाला. अमेरिकेतले टेक्सास हे राज्य राकट-रांगड्या लोकांसाठी प्रसिद्ध आहे. बाप परांगदा झाल्यामुळे अक्षरशः पडेल ते काम करणारा ऑडी आपोआपच राकट, रांगडा आणि एकदम बिनधास्त स्वभावाचा होत गेला. महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याने विविध प्रकारच्या बंदुका हाताळण्याचे शिक्षण बाहेरच्या बाहेर घेतले आणि तो उत्तम नेमबाज बनला. त्याचा उपयोग करून तो अनेकदा ससे, कबुतरे, होले, बदके, रानकोंबड्या मारून घरी आणून आईला दुपारची वेळ निभवायला मदत करत असे. हे असेच चालू राहिले असते तर ऑडीला कदाचित एखाद्या गुंड टोळीने उचलले असते. पण डिसेंबर १९४१ मध्ये जपानने अमेरिकेच्या पर्ल हार्बर या नाविक अड्ड्याचा विध्वंस केला. त्यासरशी अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धात उडी घेतली. सार्वत्रिक सैन्य भरती सुरू झाली. तरुणांमध्ये एक अपूर्व युद्धोत्साह संचारला. ऑडी मर्फीने क्रमाक्रमाने भूदल, नौदल आणि मरीन्स दलामध्ये भरतीसाठी अर्ज केला. तिन्ही दलांनी त्याला हाकलून दिले.

ऑडी फारच पोरगेला दिसायचा. त्यामुळे भरती अधिकारी बहुधा त्याला म्हणाले असावेत की, ‘‘तू अजून मर्फी रेडिओच्या जाहिरातीतले छोटुकले बाळ आहेस. घरी जा आणि बिस्कीट खा.’ प्रत्यक्षात ऑडी खरोखरच अंडरवेट होता आणि अंडरएजही होता. पण त्याला काहीही करून सैन्यात जायचेच होते. तेव्हा त्याची बहीण मदतीला धावून आली. तिने शपथपत्रावर लिहून दिले की, त्याने आवश्यक ते वय गाठलेले आहे.

ऑडीला पायदळात भरती करण्यात आले आणि प्रशिक्षणासाठी पाठवण्यात आले. प्रशिक्षणात ऑडी सर्वोत्कृष्ट नेमबाज आणि बायोनेटने द्वंद्वयुद्ध करण्यात अव्वल ठरला. थोडक्यात ऑडी दिसायला पोरगेला असला, तरी जन्मजात लढवय्या होता. फेब्रुवारी १९४३ मध्ये ऑडी मर्फीची १५ वी पायदळ डिव्हिजन मोरोक्कोत कासाब्लांका इथे दाखल झाली. ऑडीला रनरचे काम देण्यात आले. तसे फिल्ड टेलिफोन अस्तित्वात आले ते होतेच, पण आपल्याच एका तुकडीकडून दुसऱ्या तुकडीकडे निरोप पोचवायला रनर्स वापरले जात. हे चलाख, चपळ पोऱ्ये खरोखरच धावत इकडून तिकडे जात निरोपांची ने- आण करत. हे काम करताना ऑडीने अशी काही चमक दाखवली की, फेब्रुवारीत रनर असणारा ऑडी त्याच वर्षाच्या जुलैमध्ये कॉर्पोटल म्हणजे दहा सैनिकांचा नायक बनला. मोरोक्को, ट्युनिशिया

आणि अल्जीरियातून ऑडीची १५ वी पायदळ डिव्हिजन प्रथम सिसिली आणि मग इटलीत पोचली. इटलीतून जर्मन सैन्याला हाकलून लावण्याच्या ‘ऑपरेशन ॲव्हलांच’ या कारवाईत ऑडीने प्रचंड मर्दुमकी गाजवली. ससे आणि कबुतरे टिपावीत तितक्याच सहजतेने तो जर्मन आणि इटालियन सैनिक टिपत असे. मुख्य म्हणजे समोर मशीनगनचा मोर्चा असो वा रणगाडा असो, वा चिलखती गाडी असो; ऑडी अत्यंत निर्भयपणे त्यांच्यावर थेट धावून जाई आणि आपल्या मशीनगनने किंवा हँड ग्रॅनेडने समोरच्याचा निकाल लावी.

१९४५ च्या एप्रिलमध्ये युरोपातले युद्ध संपले तेव्हा अशी स्थिती होती की, बढती मिळून शिपायाचा अधिकारी झालेल्या म्हणजे लेफ्टनंट या पदावर पोचलेल्या ऑडीने ‘मेडल ऑफ ऑनर’ या सर्वोच्च सैनिकी सन्मानासह झाडून सगळे सन्मान मिळवलेत आणि त्याने एकट्याने शत्रूचे एकंदर २४१ सैनिक ठार केलेत.

महान पराक्रमी वीर म्हणून मायदेशी परतलेल्या ऑडी मर्फीवर कौतुकाचा वर्षाव झाला. त्याचबरोबर त्याच्या वरिष्ठांनी त्याला ‘वेस्ट पॉईंट’ इथल्या लष्करी अकादमीत दाखल होण्याची सूचना केली. अमेरिकेच्या न्यू यॉर्क राज्यात वेस्ट पॉईंट ही लष्करी अकादमी आहे. उत्तम प्रशिक्षित अधिकारी तिथे निर्माण केले जातात. ऑडी मर्फीला आपल्या मर्यादा माहीत होत्या.

आपण उत्तम लढवय्ये सैनिक आहोत, पण चांगला अधिकारी बनण्यासाठी तेवढे पुरेसे नाही. त्यासाठी युद्धशास्त्राचा, डावपेचांचा अभ्यास करावा लागतो. हे आपल्याला जमणे नाही. आपण आठव्या इयत्तेत शाळेतून टाकलेले गेलेले विद्यार्थी आहोत, हे तो पक्के जाणून होता. तेव्हा त्याने चक्क हॉलिवूडमध्ये पदार्पण केले आणि एका पाठोपाठ एक ४४ चित्रपटांमध्ये यशस्वी काम केले. १९६९ साली ‘ए टाईम फॉर डायिंग’ हा त्याचा चित्रपट झळकला आणि २८ मे १९७१ या दिवशी व्हर्जिनिया प्रांतातल्या एका पर्वतरांगेत त्याचे खाजगी विमान कोसळून तो खरोखरच मरण पावला.

रणांगणावरचा खराखुरा नायक आणि चित्रपटातला खोटाखोटा नायक दोन्ही ठिकाणी यश मिळविणाऱ्या ऑडी मर्फीचा जन्म ३० जून १९२५ चा. ३० जून २०२५ ला त्याच्या जन्माला १०० वर्षे झाली. ‘यह कैसा सिपाही येशूने पैदा किया!’

(लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)





# फडणवीसांचा खराखुरा मास्टर स्ट्रोक!

नोंद

**प्रतिनिधी**

महाभारताच्या नंतरची कथा आहे. राजा परीक्षित हा अभिमन्यू आणि उत्तरा यांचा पुत्र, अर्जुनाचा नातू. अत्यंत पराक्रमी, धर्मशील, पण एका ऋषीच्या शापामुळे तक्षक नावाच्या नागाने त्याला दंश करून मारले. वडिलांचा मृत्यू तक्षकाच्या हातून झाल्यामुळे जनमेजय अंतःकरणात प्रचंड सूडाग्नि बाळगून होता. त्याने पृथ्वीवरील सर्व नागांचा नाश करण्यासाठी सर्पमेध यज्ञ आरंभ केला. तक्षक नाग इंद्राच्या संरक्षणात आकाशात लपून बसला होता. पण आहुतीच्या तेजामुळे तोही यज्ञकुंडाकडे खेचला जाऊ लागला. इंद्राच्या संरक्षणामुळे तक्षक नाग यज्ञात भस्मीभूत होत नाही हे लक्षात आल्यावर जनमेजय याने एक प्रसिद्ध वाक्य उच्चारले इंद्राय स्वाहा... तक्षकाय स्वाहा... इंद्राने संरक्षण दिल्यामुळे जर तक्षक वाचत असेल तर मी इंद्राचा सुद्धा नाश करेन आणि तक्षकाचा सुद्धा नाश करेन.

महाराष्ट्राच्या विधानसभेत काल जे जनसुरक्षा विधेयक पारित झाले आहे त्या विधेयकाला एका वाक्यात सांगायचे असेल तर ते वाक्य, इंद्राय स्वाहा... तक्षकाय स्वाहा... याशिवाय दुसरे असूच शकत नाही. या विधेयकाने विरोधकांचा प्रखर विरोध झुगारत, राज्याच्या अंतर्गत सुरक्षेच्या संदर्भात एक निर्णायक वाटचाल केली आहे. हे विधेयक एक महत्वाची घोषणा करते आहे ती म्हणजे महाराष्ट्रात आता ‘शहरी नक्षलवाद’, ‘देशविरोधी चळवळी’, ‘घातपाती विचारधारा’ आणि संविधानाच्या विरोधात आघात करणार्या संघटनांना टिकाव धरू दिला जाणार नाही. परंतु हे विधेयक केवळ शहरी नक्षलवादालाच ठेचणार नसून हे विधेयक सर्व स्वरुपाच्या राष्ट्र आणि संविधान विरोधी शक्तींचा कर्दनकाळ सिद्ध होणार आहे. पारंपरिक नक्षलवाद आता जंगलातच मर्यादित राहिलेला नाही. तो आता कॉलेज, विद्यापीठ, साहित्य संमेलने, सोशल मीडिया, आणि एनजीओंच्या माध्यमातून शहरी नक्षलवाद म्हणून वाढत आहे. हे लोक मुक्त भाषणाच्या ना-वाखाली राज्यसंस्था, पोलीस, लष्कर आणि न्यायसंस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करतात. यामध्ये काही बौद्धिक वर्गांचाही सहभाग असतो, जे देशाच्या मूळ रचनेचाच नायनाट करण्यासाठी सक्रिय असतात. या राष्ट्रविरोधी शक्तींना वेसण घालण्यासाठीच हे विधेयक पारित केले गेले आहे. या विधेयकानुसार जर एखादी संघटना देशाच्या एकात्मतेला बाधा आणणारे कार्य करत असेल, तर त्या संघटनेवर बंदी घालता येईल. त्यांची मालमत्ता जप्त केली जाऊ शकते. या संघटनांशी संबंधित व्यक्तींना अटक करण्याचा अधिकार पोलिसांना मिळतो. यातील गुन्हे हे कॉग्नायजेबल आणि नॉन-बेलेबल स्वरूपाचे असतील. म्हणजेच अटक होऊ शकते आणि जामीन लगेच मिळणार नाही. या विधेयकावर विरोधकांनी टीकेची झोड उठवली. त्यांच्या म्हणण्यानुसार, हे विधेयक व्यक्तिस्वातंत्र्याच्या, अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकारांवर घाला घालणारे आहे. काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गटाने याला लोकशाहीविरोधी, घाबरवणारा, विरोधकांना दडपण्यासाठीचा उपाय असे म्हणून निषेध केला. या विरोधाची हवा देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात मांडलेल्या एकाच मुद्याने निघाली जे संविधान मानत नाहीत, जे लोकशाहीला नष्ट करायचे बघतात, त्यांच्यासाठी कायद्यातील जरा अधिक कडकपणा हा अपरिहार्य असतो.

फडणवीसांनी उदाहरण देऊन दाखवले की, देशाच्या अनेक भागांत पोलिसांवर हल्ले करणाऱ्या माओवादी संघटना आज एनजीओंच्या मुखवट्यात समाजात काम करत आहेत. अशा संघटनांना रोखण्यासाठी केवळ पुरावे नव्हे तर सिद्ध इच्छाशक्ती आणि तत्काळ कारवाई करण्याचा अधिकार पोलिसांना दिला जाणे आवश्यक आहे. आणि हे विधेयक त्याच दिशेने उचललेले पाऊल आहे. ‘अर्बन नक्षल’ हा शब्द हल्ली फक्त टीका करण्यासाठीच वापरला जातो, पण त्यामागे जी योजना, जी आंतरराष्ट्रीय प्रेरणा, आणि जी अराजक निर्माण करणारी मानसिकता आहे ती अत्यंत घातक आणि देशाच्या अस्तित्वाच्या मुळावर येणारी आहे आणि त्यामुळे त्याला ठेचणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे ब्रिटीशांनी १९०० च्या दशकात ‘राजद्रोह’ कायद्याचा वापर भारतीय क्रांतिकारकांवर केला, त्याच पद्धतीने आज भारताच्या आत काही लोक ‘बौद्धिक दहशतवाद’ पसरवतात. हे लोक ‘आजादी’, ‘रेव्होल्युशन’, ‘फॅसिस्ट सरकार’ अशा घोषणा देऊन समाजात उलथापालथ घडवू पाहतात. अशा शक्तींना अटकाव घालणारा कायदा म्हणजे जन सुरक्षा विधेयक. गेली काही वर्षे कम्युनिस्ट मंडळींनी फार शिस्तबद्ध पद्धतीने बुद्धिभेद केला आहे आणि त्याला शह देण्यासाठी हा कायदा आवश्यक आहे. **या कायद्यामुळे नेमके काय होईल हे आपण समजून घेऊया...** एखादा मुसलमान मौलाना लव्ह जिहाद चे रॅकेट चालवतो आणि तो पकडला जातो. त्याच्यावर वैयक्तिक कारवाई होते. परंतु अश्या पद्धतीची प्रकरणे जास्त प्रमाणात उघडकीला आली तर या ऊचापती शिस्तबद्ध पद्धतीने घडवणारी तबलीगी जमात या नवीन कायद्याच्या कचाट्यात सापडेल. मग संपूर्ण तबलीगी जमात वर कारवाई झाल्याने देशभरातली लव्ह जिहाद प्रकरणांना आळा बसू शकेल. या तबलीगी जमातला आर्थिक सहाय्य करणाऱ्या सगळ्याच देशी आणि विदेशी संस्था सरकारच्या रडारवर येतील आणि त्यांना मिळणारी आर्थिक मदत बंद केली जाईल. अर्बन नक्षल मंडळी अनेक संस्था चालवतात या संस्था नाटक आणि अन्य सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून माओवादाचा प्रचार आणि प्रसार करतात. तसेच अनेक विचारवंत मंडळी, प्राध्यापक, काही पत्रकार हे सगळेच लोक माओवादाचे समर्थक आहेत आणि ते त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात माओवादाचा प्रचार प्रसार करतात. अर्थात हे कोणीही फुकट करत नसतो. या सगळ्या मंडळींना माओवाद भारतात रुजवण्याचा प्रयास करणाऱ्या चीनकडून आर्थिक मदत केलीच जाते.

कला, संस्कृती, विचारवंत, विश्वविद्यालय अश्या अनेक क्षेत्रात ही मंडळी कार्यरत आहेत आणि पैसे घेऊन माओवादी विषवल्ली समाजात रुजवत आहेत. माओवाद ही एक विचारसरणी असली तरी या विचारसरणीला स्थापन करण्यासाठी सशस्त्र क्रांती अपरिहार्य आहे, इथे लोकशाहीला थारा नाही. त्यामुळे अर्बन नक्षली ही राष्ट्रीय सुरक्षेला धोका आहेत. त्यांच्यावरील कारवाई अपरीहार्य आहे. परंतु अश्या मंडळींवर जुन्या कायद्यांच्या अनुसार जी व्यक्ती पुराव्यांसह दोषी आढळेल तिच्यावर कारवाई होत असे. परंतु एक संघटना, एक विचार म्हणून या संपूर्ण जनसमुहावर कारवाई आवश्यक आहे. ती कारवाई करायला प्रचलित कायदे पुरेसे नव्हते. जनसुरक्षा कायदा अश्या समस्त माओवादाच्या समर्थकांची अभिव्यक्ती स्वातंत्र्याची कवचकुंडले उतरवणार आहे. ही मंडळी उघड उघड हिंसाचाराचे समर्थन करत होती. ही मंडळी उघड उघड पोलिसांच्या आणि निमलष्करी जवानांच्या कृर हत्यांचे समर्थन करत होती. ही मंडळी सरकारला कायमच आरोपीच्या पिंजऱ्यात उभी करत होती. ही मंडळी एकीकडे संविधनाचे प्रेम दाखवत होती परंतु चीनची शस्त्रे हातात घेऊन देशविरुद्ध युद्ध पुकारणाऱ्या माओवादी दहशतवाद्यांना मात्र समर्थन देत देशविरुद्ध युद्ध पुकारण्याचे सुद्धा समर्थन करत होती.

(पान ६ वर)


संस्कारांच्या देशा

**रमा गोळवलकर**

# सत्य - ५
# सत्यव्रती तोच सनातनी

मागच्या चार लेखांतून आपण ‘सत्य’ हाच सनातन धर्माचा गाभा आहे, यावर चर्चा करीत आहोत. भारतीय ज्ञानसाधनेत सत्य या संकल्पनेवर अतिशय सारगर्भ आशय विविध श्लोकांतून सूत्ररूपांत मांडण्यात आला आहे. सत्याचा अवलंब करणाऱ्या लोकोत्तर व्यक्तींच्या चरित्रकथा हा भारतीय संस्कृतीच्या जडणघडणीचा अविभाज्य घटक आहे. मध्यंतरी पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या वामपंथी लोकांनी श्रीरामांच्या वागण्याचं लेखापरीक्षण करण्याची एक टूम काढली होती. त्यात गर्भवती पत्नीचा त्याग करणारा राम तु चा आदर्श कसा असू शकतो, हा थेट प्रश्न त्यांनी श्रीराम जन्मभूमी आंदोलनात सहभागी होणाऱ्यांना विचारायला सुरुवात केली होती.

सत्यं शिवं सुंदरम् : सर्न प्रयोगशाळा, जिनेव्हात विराजमान नटराज



सूर्यवंशी इक्ष्वाकु कुळात जन्मलेले श्रीराम एकवचनी आहेत. त्यांनी दिलेला शब्द खरा करण्यासाठी ते आपल्या प्राणांची बाजी लावतील, असा त्यांचा लौकिक आहे. त्यांच्या पूर्वजांनीदेखील अशीच ख्याती मिळविली होती. एकूण सत्य हे त्यांच्या गुणसूत्रांत निबद्ध आहे. म्हणून श्रीराम आमचे आदर्श आहेत. सूर्य या प्रत्यक्ष देवाचे आपण पूजक आहोत.

‘नमो धर्म विधानाय नमस्ते कृतसाक्षिणे।
नमः प्रत्यक्ष देवाय भास्कराय नमो नमः।।’

(धर्मविधान करणाऱ्या, केलेल्या प्रत्येक कर्माचा साक्षी, प्रत्यक्ष देव अशा भास्कराला नमन)

मानसशास्त्रातील नवीन संशोधनानुसार सूर्यप्रकाशात बहुतांश सर्वसामान्य लोक खोटं बोलत नाहीत. खरं-खोटं करणारी त्यांची बुद्धी दिवसा सतर्क आणि जागृत असते. सूर्यप्रकाशामुळेच सर्वांशी न्याय्य वर्तन करण्याची प्रेरणा त्यांना मिळत असते. म्हणजे अधिकांश लोकांचा आत्मा, बुद्धी, ज्ञान आणि वाचा या चहू अंगांनी सत्य प्रकटण्यासाठी सूर्याचा प्रकाश कारणीभूत असतो.

आपल्या सर्व प्राचीन वाङ् यातली सत्यप्रियता, सत्यनिष्ठा आणि सत्याराधना अधोरेखित करणाऱ्या व्यक्तींची चरित्रं वस्तुपाठ म्हणून या खंडप्राय देशात बोलल्या, लिहिल्या आणि वाचल्या जाणाऱ्या सर्व भारतीय भाषांत भाषांतरित करून प्रसारित करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी छांदोग्य उपनिषदात येणारी ही गोष्ट अतिशय बोलकी आहे. वेश्यावृत्ती करणाऱ्या जबाला नावाच्या स्त्रीच्या बाल्यावस्थेतल्या मुलाला वेदाध्ययन करण्याची अपार इच्छा होती. तो गौतम ऋषींकडे जाऊन आपली इच्छा बोलून दाखवतो. त्यावर ऋषिवर त्याला त्याचं नाव आणि पित्याचं नाव विचारतात. तो उत्तरतो, ‘‘मी एका वारांगनेचा मुलगा आहे. म्हणून मला माझे पिता कोण हे माहीत नाही. माझ्या जननीचं नाव जबाला. म्हणून ‘जबाला’ या नावानंच मला सगळे हाक मारतात.’

त्याच्या बोलण्यातला हा सच्चेपणा गौतम ऋषींना आवडला. त्यांनी त्या बालकाचं नाव ‘सत्यकाम’ ठेवलं आणि त्याला वेदविद्या दिली.

**या कथेवरून दोन बिंदू स्पष्ट होतात-**

१- प्राचीन भारतीय समाजात मातेच्या नावानं ओळखल्या जाणाऱ्याचा आणि वारांगनेची संतती असलेल्याचा सहज स्वीकार केला जाई.

२- वेदाध्ययन करण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत सत्य बोलणं हीच प्राथमिक आणि न्यूनतम अर्हता (बेसिक अँड मिनिमम क्वालिफिकेशन) होती.

श्रीरामांचे पूर्वज असलेल्या अयोध्येचा ‘सत्यवादी’ राजा हरिश्चंद्राचं नाव या सूचीत अग्रक्रमानं घेतलं जातं. सत्ययुगात होऊन गेलेल्या या इक्ष्वाकु वंशाच्या राजाच्या सत्यप्रियतेची परीक्षा घेण्यासाठी ब्रह्मर्षी विश्वामित्रांनी त्याच्या स्वप्नात जाऊन त्याच्याकडे त्याच्या राज्याचं दान मागितलं. त्यानं त्याच्या स्वभावानुसार ते देऊनही टाकलं. दुसऱ्या दिवशी सकाळी ब्रह्मर्षी प्रत्यक्षात त्याच्या राजसभेत गेले आणि त्यांनी काल रात्रीच्या स्वप्नात दिलेल्या दानाची आठवण त्याला करवून दिली.

राजानं तत्काळ आपलं सारं राज्य ब्रह्मर्षींना देऊन टाकलं. स्वप्नात दिलेल्या वचनाची पूर्ती करण्यासाठी त्यानं आपल्या राज्याची सीमा सोडून काशीच्या महास्मशानात डोंब राजाकडे चाकरी केली. ब्रह्मर्षी विश्वामित्रांनी घेतलेल्या वेगवेगळ्या परीक्षांत शारीरिक श्रम आणि मानसिक त्रास सहन करूनही त्यानं त्याची सत्यनिष्ठा सोडली नाही. त्यांच्या सगळ्या परीक्षांत तो उत्तीर्ण झाला.

भारतीय सिनेसृष्टीची सुरुवात झाली तो चित्रपट होता फाळकेकृत ‘राजा हरिश्चंद्र’ (१९१३). पहिला मराठी बोलपट होता व्ही. शांताराम दिग्दर्शित ‘अयोध्येचा राजा’ (१९३२). स्वातंत्र्योत्तर काळात त्याच भारतीय चित्रपटसृष्टीनं वामपंथ्यांच्या नादाला लागून सत्यानं वागणाऱ्या व्यक्तिरेखेची खिल्ली उडवत त्याला ‘राजा हरिश्चंद्राची औलाद’ म्हणण्यास सुरुवात केली. या प्रचार-प्रसाराचा परिणाम म्हणजे दुर्दैवानं आज प्रत्येकच जण ‘मी काही राजा हरिश्चंद्राची औलाद नाही’ असं स्वत:च घोषित करण्यात धन्यता मानू लागला आहे.

असंच दुसरं चरित्र आहे सदेह स्वर्गारोहण करणारा ज्येष्ठ पांडव युधिष्ठिर. त्याच्या सत्यव्रतामुळे त्याचा रथ भूमीपासून दशांगुळे वर अधांतरी धावायचा. महाभारत युद्धात आचार्य द्रोणांनी ‘माझा पुत्र अश्वत्थामा खरोखरच हताहत झाला का?’ असं त्याला विचारलं असता अश्वत्थामा नावाचा हत्ती मारला गेला, हे सत्य माहिती असूनही त्यानं उत्तर दिलं-

**‘अश्वत्थामा हतो हत: नरो वा कुंजरो वा’**

(अश्वत्थामा मारला गेला; पुरुष की हत्ती हे ने कं माहिती नाही.) तेव्हा त्याचा रथ दाणकन खाली आपटला. असे अनेक सत्यव्रती होऊन गेलेत. त्याचंच पुढचं सूत्र म्हणजे ‘सत्यं शिवं सुंदरम्’! यात शिव या शब्दावर श्लेष साधला आहे.

शिव म्हणजे महादेव आणि शिव म्हणजे स्थिर, सौभाग्यदायक. जी पंचमहाभूतं या विश्वाचे कारक आहेत, त्यावर महादेव शिवाचं आधिपत्य आहे. म्हणूनच त्याचं एक नाव आहे भूतनाथ.

जे पंचज्ञानेन्द्रियांच्या आधारे प्राप्त होतं, प्रमाणानं सिद्ध करता येतं ते ज्ञान म्हणजे सत्य. ज्या बुद्धीमुळे सत्याचं आकलन होतं ती प्रमा. तिला जसं जसं हे सत्य उलगडत जातं तसं या विश्वाचं कोडं सुटत जातं. त्याचं सौंदर्य अधिकाधिक भावतं. त्यातून सकल विश्वाचं कल्याण करण्याची वृत्ती बळावत जाते.

**तात्पर्य -**

सत्य हेच शिव आहे आणि म्हणून ते सुंदर आहे असा भारतीयांचा ठाम विश्वास आणि श्रद्धा आहे. म्हणूनच आपला सनातन धर्म हा ‘सत्य सनातन’ या विशेष नामाभिधानासह प्रचलित आहे. हा भारतीय संस्कार आपल्या व्यक्तिमत्त्वात प्रकाशित करणं हेच आपलं प्रथम कर्तव्य आहे.

# मशागत मनाची, तरतूद यशाची!

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

केरळमधील अतिश्रीमंत व्यावसायिक सीरियन ख्रिश्चन कुटुंबात १९१८ साली अन्ना मणीचा जन्म झाला. त्या काळात मुलांनी उच्चस्तरीय करीअर करणे तर मुलींनी लग्न करून कुटुंबाकडे लक्ष देणे अपेक्षित होते. कुटुंबातील आठ भावंडांपैकी त्यांचा नंबर सातवा होता.



अन्ना मणी
(२३ ऑगस्ट १९१८-१६ ऑगस्ट २००१)

अगदी सहाव्या वर्षाच्या वयापासूनच तिला वाचनाचे खूप वेड होते. वयाच्या आठव्या वर्षापर्यंत त्यांनी मल्याळम सार्वजनिक वाचनालयातील जवळजवळ सर्व पुस्तके वाचली; शिवाय अन्ना मणी (२३ ऑगस्ट १९१८-१६ ऑगस्ट २००१) बारावीपर्यंत सर्व पुस्तके त्यांनी इंग्रजीत वाचली होती. त्यांच्या आठव्या वाढदिवशीच्या एका प्रसंगाने कुटुंबातील सर्वांनाच धक्का बसला. घरी पूजा झाली.


सगळ्यांच्या समोर कौटुंबिक परंपरेनुसार आईने कौटुंबिक हिऱ्याच्या कानातल्यांचा सेट तिला भेट दिला. पण तिने स्वीकारण्यास नकार दिला. त्याऐवजी एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकाचा सेट मागितला. सतत वाचन, चिंतन व मनन अशी मनाची मशागत तिने बालवयापासूनच केल्यामुळे तिची बुद्धी अतिशय तल्लख व प्रगल्भ झाली होती. शेवटी तिच्या हट्टानुसार तिला तो पुस्तकांचा सेट मिळाला. त्या पुस्तकांच्या जगाने नवीन कल्पनांसाठी तिचे आकाशच जणू खुले केले. याचमुळे त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत आपल्या क्षेत्रात भरीव योगदान दिले. थोर लोकांची व संशोधकांची चरित्रे वाचल्यामुळे आपणही काही संशोधन करून लोकांचे भले करावे, ही तीव्र इच्छा तिच्या मनात होती. त्यामुळे १९३९ मध्ये त्यांनी चेन्नई (तेव्हाचे मद्रास) येथील पचयप्पा कॉलेजमधून भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्रात बी.एस्सी. ऑनर्स पदवी मिळवली. त्याच वेळी त्यांनी पाच शोधनिबंध प्रकाशित केले.


१९४० मध्ये त्यांनी बंगळुरूच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये संशोधनासाठी शिष्यवृत्ती मिळवली. १९४५ मध्ये त्या भौतिकशास्त्रातील पदवी शिक्षण घेण्यासाठी इम्पिरियल कॉलेज, लंडन येथे गेल्या; परंतु हवामान शास्त्रातील उपकरणांमध्ये विशेष प्रावीण्य मिळविले. १९४८ मध्ये लंडनहून परत आल्यानंतर अन्ना मणी पुण्यातील भारतीय हवामानशास्त्र विभागात रुजू झाल्या, जिथे त्यांच्याकडे हवामान यंत्रांची व्यवस्था करण्याची जबाबदारी होती. हवामानशास्त्रीय उपकरणांच्या क्षेत्रात १०० च्या वर विविध हवामान मोजण्याचे यंत्र शोधून अन्ना मणी यांनी भरपूर योगदान दिले, संशोधन केले आणि सौर किरणोत्सर्ग, ओझोन आणि पवन ऊर्जा मोजमापांवर असंख्य शोधनिबंध प्रकाशित केले. त्या एकमेव भारतीय भौतिकशास्त्रज्ञ आणि हवामानशास्त्रज्ञ होत्या.

अन्ना मणी यांनी भौतिकशास्त्र आणि हवामानशास्त्रात केलेल्या संशोधनामुळे भारताला हवामानाचा अचूक अंदाज लावणे शक्य झाले. म्हणूनच अन्ना मणी यांना 'वेदर वुमन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाते. त्यांच्यापेक्षा ३० वर्षांनी मोठे असलेल्या व नोबेल पुरस्काराने सन्मानित जगप्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. सी. व्ही. रमण यांच्या यांच्या हाताखाली त्यांना काम करण्याची संधी त्यांना मिळाली. त्यांच्या सोबत अन्ना मणी यांनी रुबी व डायमंडच्या ऑप्टिकल गुणधर्मांवर केलेलं संशोधन जगप्रसिद्ध प्रसिद्ध आहे. भारताला सस्टेनेबल व पुनर्वापरातील ऊर्जास्रोतांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी एक भक्कम पाया रचून ठेवला होता. आजही हवामानशास्त्रात त्यांनी शोधलेल्या यंत्रांचा उपयोग करतात. अण्णा मणी यांचे हवामानशास्त्रातील कार्य आजच्या समाजासाठी प्रभावी आणि मौल्यवान आहे. किंबहुना, अन्ना मणी यांच्या दूरदृष्टी आणि कार्यामुळे भारत आज पवनऊर्जा शास्त्रात जागतिक आघाडीवर आहे. त्यांच्या हवामानविषयक नवकल्पनांनी भारताच्या वैज्ञानिक क्षेत्राचा तसेच देशाच्या स्वातंत्र्यानंतरच्या विकासाचा विस्तार केला.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे अण्णा मणी या आजसुद्धा अनेक तरुणींसाठी त्यांच्या ओळखींवर सामाजिक मर्यादा असूनही त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रेरणा आहे. कारण हवामान क्षेत्रात सर्वत्र पुरुषप्रधान क्षेत्र असताना त्यांनी जबरदस्त शोध व कार्य करून आपले नाव अमर केले आहे. आपल्या कर्तबगारीने काहीच काळात

**मनाची मशागत = चांगले स्वीकारा, वाईट त्यागा**



अन्ना मणीनंतर भारतीय हवामान विभागाच्या उपमहासंचालक बनल्या व संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक हवामान संघटनेत अनेक महत्त्वाच्या पदांवर त्यांची नेमणूक झाली.

१९८७ मध्ये त्यांनी विज्ञानातील उल्लेखनीय योगदानासाठी के. आर. रामनाथन पदक जिंकले आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या उपम हासंचालक म्हणून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी रमण संशोधन संस्थेत व्हिजिटिंग प्रोफेसर म्हणून काम केले. अगदी वयाच्या ८३ व्या वर्षी म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत त्या सतत कार्यमग्न होत्या.

**मनाची मशागत म्हणजे काय?**

जमीन सुपीक आहे, बीजसुद्धा उत्तम असले, तरी योग्य प्रमाणात पाऊस असेल तरच पीक उत्तम येते. मात्र, चांगले पीक येण्यासाठी जमिनीतून दगड, काटे, निरुपयोगी झुडपे काढून जमीन सखल करावी लागते. नंतर जमिनीत बीज नीट रुजावे यासाठी सखल जमिनीला खोदून नांगरावे लागते. त्यानंतरच बी पेरण्यासाठी जमीन तयार होते. अशी मेहनत म्हणजेच मशागत केलेल्या जमिनीतच उत्तम गुणवत्तेच्या पिकाची अपेक्षा करता येते.

आपल्या आयुष्याचेही तसेच आहे.आई-वडील चांगले, घरातील वातावरण चांगले, शिक्षण, गुरू चांगले असे असूनही ज्या मुलामुलींना उज्ज्वल भविष्य हवे त्यांच्या मनाची मशागत करावी लागते. कारण आजच्या वातावरणात टीव्ही, लॅपटॉप, मोबाईल, इंटरनेटवर आधारित सोशल मीडियाच्या व खुनशी गेमिंगच्या जमान्यात गुन्हेगारी जगात पोहोचविणाऱ्या विषारी व्यसनांचा सुळसुळाट झाला आहे.

या शिवाय सात्त्विक व पोषक सनातन संस्कृतीपासून दूर नेणारे, कसेही करून हिंदूंचे धर्म परिवर्तन करून त्यांना भटकविण्याचे प्रयत्न पूर्ण जगातच सुरू आहेत. या सगळ्या वाईट गोष्टींचे वाईट परिणाम दूर करून सशक्त मन तयार करणे, म्हणजे मनाची मशागत! तसेच काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे षड्रिपू म्हणजे सहा शत्रूंपासून स्वत:चा बचाव करून, भीतीचा त्याग करून चांगल्या सवयी लावणे, आत्मविश्वास वाढविणे, इतरांनाही मदत करून सगळ्यांना आपापल्या आयुष्यात चांगले कर्तृत्व करायला प्रेरित करणे. याचप्रकारे संपूर्ण देशाला सुदृढ, सक्षम करून संपूर्ण जगाला त्याचा लाभ करून देणे असे या मनाच्या मशागतीचे ध्येय असावे.

**शिकायचे काय?**

१३ व्या शतकात अतिशय प्रतिकूल परिस्थितीत निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई या चारही भावंडांनी जगातून त्यांच्याकडे आलेल्या छळाच्या वाईट प्रभावाला बळी न पडता प्रत्यक्ष आपल्या वागण्यातून संपूर्ण जगावर सकारात्मक ठसा उमटविला व पूर्ण जगात...

आदिनाथ (भगवान शंकर) - मत्स्येंद्रनाथ - गोरक्षनाथ

गहिनीनाथ - निवृत्तिनाथ - ज्ञानेश्वर अशा नाथ संप्रदायातील गुरुपरंपरा जपली आणि भक्तिपंथाची मुहूर्तमेढ रोवली. त्यातून आपण आपल्या मनाची मशागत कशी करावी हे शिकविले. ज्यांनी त्यांना छळले तेच त्यांचे शिष्य झाले.

दुष्टांचे दुष्टपण नाहीसे होवो, त्यांना सत्कर्मे करण्यामध्ये स्वारस्य वाढो. सर्व प्राणिमात्रांमध्ये मित्रत्वाची भावना निर्माण होवो. पापी माणसाचा अज्ञानरूपी अंधार नाहीसा होवो.

विश्वात स्वधर्मरूपी सूर्याचा उदय होवो. प्राणिमात्रांच्या मंगल इच्छा पूर्ण होवोत. या प्रकारे श्रीज्ञानेश्वरांच्या पसायदानातून त्यांनी संपूर्ण विश्वाचेच कल्याण व्हावे, अशी प्रार्थना केली आहे.

योग्य सद्गुरूचा शोध घेऊन त्यांच्या मार्गदर्शनाने आपल्या मनाची मशागत करून या जन्माचा सदुपयोग व्हावा. मनाची योग्य मशागत करून यशाची, भविष्याची तरतूद करण्यासाठी संत रामदास स्वामीकृत दासबोधातील दशक ५ मधील तिसऱ्या समासाचा अभ्यास करणे उपयुक्त ठरेल. त्यात सद्गुरू आणि सत्शिष्य कसा असावा याचे सखोल मार्गदर्शन समर्थांनी केले आहे.

**सेत पेरिलें आणी उगवलें ।**
**परंतु निगेविण गेलें ।**
**साधनेंविण तैसें जालें । साधकांसी ।। ९।।**

शेतात बी पेरले, ते उगवूनही आले, पण त्याची जर नीट निगा राखली गेली नाही, तर ते फुकट जाते. त्याप्रमाणे साधकाने गुरूंनी सांगितल्याप्रमाणे साधन जर केले नाही, तर त्याच्या जीवनाचे सार्थक होत नाही.

शिष्यच जर अनधिकारी असेल, तर एखाद्या भाग्यवान पुरुषाचा मुलगा भिकारी निपजावा, तशी स्थिती होते. साधन, त्याचा अभ्यास, त्यात मार्गदर्शन करणारे सद्गुरू आणि त्यांच्या आदेशाचे कसोशीने पालन करणारा सत्शिष्य, सत्शास्त्रविचार सत्कर्म, सद्वासना या सर्व गोष्टी असतील तरच यशस्वी होता येते.

सदुपासना, सत्कर्म, सत्क्रिया, स्वधर्म, सत्संग आणि नित्यनेम या सर्व गोष्टी निरंतर असतील तरच यश मिळते. शिष्याचा सद्गुरूंच्या वचनावर त्याचा संपूर्ण विश्वास हवा. तो सात्त्विक साधक, धैर्यशील, पवित्र आचरण करणारा स्थितप्रज्ञ असावा. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## जाणी भगवंता । पुण्यवंत ।।

पुण्याचा महिमा । आम्हा काय ठावा ।।
घेईन केशवा । नाम तुझे ।।१।।

नामाचा महिमा । हरिपाठ सांगे ।।
पुण्य घरी रांगे । निशी दिनी ।।२।।

भाव कर्म करू । कर्म देव मानू ।।
पुण्य वर्म जाणू । कर्मासंगे ।।३।।

देहास जडो ते । कर्माचे बंधन ।।
आत्म्याचे मिलन । नामा संगे ।।५।।

कर्ता-करविता । तूच रे अनंता ।।
जाणी भगवंता । पुण्यवंत ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१८८

## पाऊस

पाऊस कधीचा पडतो स्वप्नाच्या गावात
मी शुष्क कोरडा ठक्क उष्णाच्या कडाक्यात
ना नाव कागदी ओली अंगणातल्या ओहळात
झाडांची पाने पिवळी ग्रीष्माच्या मुक्कामात
शब्दांची तगमग होते आठवता मागचा मोसम
मन मरगळलेले उत्तर पावसाची कविता ना 'सम'
मेघांनी नभात यावे मज चिंब भिजवून द्यावे
मग शब्द येतील आतून मी पाऊस पाऊस व्हावे

कल्पी जोशी

## निसर्ग...

एकांतात आनंद देणारा निसर्ग,
पक्ष्यांच्या थव्याने नटलेला...
फुला झाडांनी बहरलेला निसर्ग..!
मनुष्याचा नि:स्वार्थी मित्र निसर्ग,
किलबिल सुरांनी सुवासलेला...
नद्या पर्वतांनी सजलेला निसर्ग..!
वाऱ्यासवे मायेचा आभास करून देणारा,
विविध रंगाने रंगलेला...
धरतीवरील स्वर्ग निसर्ग..!
मनुष्याच्या प्रगतीमध्ये महत्त्वाचा वाटा
निसर्ग..!
आपल्याला मिळालेली मौल्यवान भेट
निसर्ग...!!

गायत्री नागरे



# लेणे कैलासाचे

कोणे एके काळी
स्वाती काळे (कोलारकर)

प्राचीन महाराष्ट्र देश कलासमृद्ध होता. लेणी, मंदिरे, शिल्प कलाकृतींनी नटलेला होता. शिल्पकारांनी, चित्रकारांनी गजबजलेला होता. विणकर, सुवर्णकारांमुळे नगरांमध्ये कायमच लगबग असायची. सातवाहनांच्या व्यापारी वाहतुकीपासून दूर डोंगरकपारीत मात्र शांतता नांदायची. छन्नी-हातोडीचे आवाज सह्याद्रीच्या कड्याकपारीत घुमायचे. नदी-ओहोळांमध्ये हातपाय टाकून, तोंडावर पाण्याचा शिपकारा मारून शिल्पकारांचा संघ नव्या उमेदीने कामाला लागायचा. इ. स. पूर्व दुसऱ्या शतकापासून महाराष्ट्रात भाजे, कोंढाणे, पितळखोरे, अजिंठा, नाशिक, कार्ले, जुन्नर, कान्हेरे अशा अनेक ठिकाणी बुद्धधर्मीय संघाराम अस्तित्वात आले.

सुरुवातीच्या म्हणजेच इ. स. २०० पर्यंतच्या हिनायन लेण्यांमध्ये बुद्धाची प्रतिमा नाही. चैत्यगृहातील स्तूप म्हणजेच बुद्धाच्या परिनिर्वाणाचे प्रतीक मानले जाई. नंतर इ. स. पाचव्या शतकापासून लेणी खोदायला पुन्हा नव्या उर्जेने सुरुवात झाली. हिंदू देवदेवतांच्या शिल्पांमुळे सह्याद्रीच्या कणखर दगडाला भक्तीचे उमाळे आले. आता महाराष्ट्रात भक्तिमार्गाची पहाट झाली होती. वाकाटक राज्याच्या ऊर्जितावस्थेत अजिंठ्याची अद्भुत चित्रशैली बहराला आली. हिंदू शिल्पशैलीच्या समृद्धतेचा परमोच्च काळ सहाव्या शतकापासून सुरू झाला. राष्ट्रकूटांनी वेरूळला भव्य-दिव्य कैलास लेणे साकारून भारतीय कलेची ओळख सबंध जगताला करून दिली. आठव्या शतकाच्या उत्तरार्धात कोरलेले वेरूळचे कैलास लेणे म्हणजे भारतीय शिल्पकलेला पडलेले अलौकिक स्वप्न आहे. वेरूळ डोंगराच्या मध्यभागी सोळा नंबरचे कैलास लेणे आहे. कैलास लेण्याच्या अगोदरची लेणी महत्त्वाची यासाठी की, त्यांच्यामुळे कैलास लेण्यापर्यंतचे विकासाचे टप्पे सहज समजतात. लेणे चौदा ङ्गरावण की खाई' या नावाने प्रसिद्ध आहे. कुबेराचा पराभव करून परत लंकेत येताना शरवनातील तपोवनात शिवपार्वतीमुळे रावणाला प्रवेश मिळाला नाही. त्यामुळे संतापून संपूर्ण पर्वतच उपटून टाकण्याचा तो प्रयत्न करू लागला. शिवपार्वतीला धक्के बसू लागले. त्यामुळे भयभीत होऊन शिवाला बिलगलेल्या पार्वतीचे शिल्प बघतच राहावे असे वाटते. बलवान रावणाचे ताणलेले स्नायू, तळव्याने रावणाला दाबणारा शांत मुद्रेचा शिव, घाबरलेल्या पार्वतीच्या चेहऱ्यावरचे हावभाव आणि तिला जवळ घेऊन आश्वस्त करणाऱ्या शिवाची प्रणय भावना अतिशय नितळपणे शिल्पकारांनी कातळातून व्यक्त केली आहे. अक्षक्रीडा करणाऱ्या शिवपार्वतीचे अप्रतिम शिल्प येथील एका खणात दिसते. खेळण्यात शिवाचे लक्ष नाही आणि त्यामुळे रुसलेल्या पार्वतीने आपला चेहरा फिरवला आहे. शिवाने तिचा हात धरत आणखीन एकवेळ खेळ खेळण्याचा गोड हट्ट केला आहे. आजूबाजूचे शिवगण दोघांची चेष्टा करत आहे. नंदी मात्र स्थितप्रज्ञ बसलेला आहे. एवढे गोड शिल्प प्रत्यक्ष बघायला पाहिजेच. कितीही वर्णन केले तरी चेहऱ्यावरचे भाव शब्दात मांडता नाही येत.


वरील सर्व शिल्पे कैलास लेण्यामध्येही आहेत आणि ती अधिक जिवंत पद्धतीने व्यक्त झालेली वाटतात. लेणे पंधरा म्हणजे दशावतार लेणे. त्यामध्ये अनेक उत्कृष्ट शिल्पे आहेत. तेथील एक नंदी अगदी मनात कोरला गेला आहे. त्याच्याभोवती अनेक गण आहेत. कोणी त्याच्याशी झोंबाझोंबी करीत आहेत, कोणी त्याचे शेपूट पकडत आहेत, हा मात्र शांत उभा आहे नंदीबैलासारखा!शिवपार्वती विवाहदेखील अनेक ठिकाणी दाखवण्यात आला आहे. लाजऱ्या उमेचा हात हातात घेताना उमा



शिवाच्या डाव्या बाजूला उभी आहे. नाहीतर ती नेहमी उजव्या बाजूला दाखवली जाते.

मार्कंडेयाचे यमापासून संरक्षण करतानाचे शिवाचे शिल्पदेखील फार सुंदर आहे. अपत्यहीन मर्कंड ऋषींनी शिवाची आराधना केली. शिवाने प्रसन्न होऊन विचारले की, 'तुम्हाला अनेक मूर्ख पुत्र पाहिजेत की एकच विद्वान पुत्र पाहिजे? तुमचा पुत्र विद्वान होईल, पण तो अल्पायुषी असेल.' मर्कंड ऋषींनी विद्वान पुत्राची इच्छा व्यक्त केली. काही वर्षांनी अल्पायुषी मार्कंडेयांना वडिलांच्या दुःखाचे कारण समजले आणि त्याने शिवतपश्चर्या सुरू केली. ते सोळा वर्षांचे झाल्यावर तपश्चर्या करीत असतानाच मागून यम आला आणि गळ्याभोवती पाश आवळू लागला. एवढ्यातच शिवलिंगामधून अतिशय क्रोधित होऊन शिव बाहेर पडला आणि त्याने यमाच्या छातीवर लाथ मारली. उमेचा हात हाती घेत असतानाचा प्रणयोत्सुक शिव, यमाच्या छातीवर लाथ मारणारा क्रोधित शिव आणि इतरही अशा विविध छटांची तरल शिल्पे पाहत पाहत आपण कैलास मंदिराजवळ पोहोचतो. कैलास लेणे म्हणजे दैवी सौंदर्याचे निधान. हजारो अनामिक कलावंतांनी घाम गाळून हातोड्यांच्या खणखणाटातून पृथ्वीवर उभा केलेला हा स्वर्गच आहे. कोण असेल या मनस्वी कलाकृतीचा शिल्पकार? कोण असेल येथील स्थापत्यकार? कोणी मूर्ती घडविल्या असतील? कोणा शापित गंधर्वांनी पृथ्वीवर येऊन देवदेवतांच्या चेहऱ्यावरचे एवढे उत्कट भाव दगडावर तासले असतील? कोणी रंगरंगोटी केली असेल? इतिहास या सर्वच बाबतीत मुग्ध होऊन कैलास मंदिरासमोर नतमस्तक उभा आहे. इतिहासाला फक्त एवढीच माहिती आहे की, दंतीदुर्गानंतर आलेला राष्ट्रकूट राजा कृष्ण एक याने हे मंदिर उभारले आहे.


दहाव्या शतकातील कथाकल्पतरूमध्ये एक कथा अशी आहे की, रोगाने पछाडलेल्या राष्ट्रकूट राजा येलूला वाचविण्यासाठी राणीने मंदिर बांधण्याचानवस केला. तिने हट्ट धरला की, मंदिराचा कळस बघितल्याशिवाय ती जेवणार नाही. पैठणच्या कोकस या शिल्पकाराने हे आव्हान स्वीकारले. त्याने कळसापासूनच शिल्प कोरण्यास सुरुवात केली. राणीला कळस दिसल्यावर तिने अन्नपाणी घेतले. या गोष्टीत शिल्प खोदण्याची तांत्रिक पद्धत केवढ्या खुबीने सांगितली आहे. शिल्प नेहमी वरूनच तासत तासत खालपर्यंत खोदण्यात येतं. या गोष्टीमधील कोकस नावाचा शिल्पकार इतरही अनेक प्राचीन कथांमध्ये सुतारकाम करताना दिसतो. हे पारंपरिक आडनावदेखील असण्याची शक्यता आहे. भव्य राजप्रासादाप्रमाणे उभ्या असलेल्या या लेण्याकडे बघितल्यावर माणूस जागीच स्तब्ध होतो. असंख्य शिल्पकृतींनी परिपूर्ण असे हे भव्य-दिव्य अद्भुत लावण्यकमळ आहे. दरवाजातून आत गेल्यावर सरोवरात बसलेली गजलक्ष्मी, गंगा यमुना सरस्वती यांची देखणी लेणी, महिषासुरमर्दिनीचे भव्य



शिल्पपट, महायोगी शिव, त्रिपुरांतक शिव, नरसिंह-हिरण्यकश्यपू, गंगावतरण, लिंगोद्भव, गोवर्धन करंगळीवर उचलणारा श्रीकृष्ण, ब्रह्मचे शीर तोडणारा भैरव, अंधकासुराचा वध करणारा शिव, मंडपाच्या छतावरील नटराज, अंतरालाच्या छतावरील अन्नपूर्णा, नंदीमंडपाच्या छतावरील उमललेलं सुंदर कमळ, मंदिराच्या सभोवाली असलेल्या ओवऱ्या, पाठीमागील उपमंदिरे या सर्व शिल्पांमधील केवळ एका शिल्पाबद्दल जरी लिहायचं ठरवलं तरी एक स्वतंत्र लेख होईल. पट्टडकल स्थापत्यशैली, पल्लव शैली, चालुक्य शैलीचा प्रभाव कैलास लेण्यावर दिसतो. परंतु प्रभाव म्हणण्यापेक्षा या सर्व स्थापत्य शैलींचा विहंगम संगम आपल्याला सहज दिसून येईल. आपण या शैलीला राष्ट्रकूट स्थापत्य शैलीही म्हणू शकतो. या अनाम शिल्पकारांनी त्यांच्या स्थानिक स्थापत्य शैलीचे पैलू घेऊन त्यावर स्वत:ची नवनिर्मित स्वतंत्र अशी शैली निर्माण केली.

कैलास लेणे बघणे हा अनुभव नाही, ती एक विलक्षण दैवी अनुभूती आहे. यातली काही शिल्पे अवकाशात डोकावताना दिसतात. काही आतआत गेलेली, खोलवर रुजलेली भासतात. काही शिल्पे पाण्यावर हेलकावे खाण्याइतपत हलकीशी वाटतात तर काही जगाचं ओझं पाठीवर घेऊन फिरतात. काही शिल्पे उजव्या दिशेला गतिमान धावताना दिसतात तर काही शिल्पे उलट्या बाजूला पळताना हसतात. ही शिल्पे तुमच्या-आमच्याशी संवाद करीत नाहीत. पण त्यांच्या अवकाशात ती स्थिरदृष्टीने स्वत:मध्येच खोलवर पाहताना दिसतात. या आत्ममग्न शिल्पांमध्ये असलेली प्रचंड ऊर्जा आपल्याला ओंजळभरून मिळाली तरी आपला जन्म सार्थकी लागला असं समजायचं. कैलास लेण्यामध्ये सर्व रस सामावले आहेत. कैलास हलवताना कराकरा दात खाणारा रावण वीररस आणि भयानक रस साकार करतो. कधी पार्वती घाबरलेली आहे तर कधी शिवाला बिलगून बसली आहे. कधी लटक्या रागाने पाहते आहे. कधी रुसलेली आहे. पार्वतीचे फक्त उदाहरण दिले, पण कैलास लेण्यामधील प्रत्येक शिल्पाकृती नवरस निर्माण करते. मग ते शिल्प देवतांचे, माणसाचे किंवा पशूचेही असो. सिंहाची आयाळ आणि त्याने वर उचललेला पंजाही वीररसाचा उद्भव करतो आणि या सर्व रसांना कवेत घेणारा अंतराळातील दर्शनी भागावरील महायोगी शिव शांतिरसाचे रसपान करतो.

विमानातून जाणाऱ्या देवांनी कैलासाचे लेणे पाहिले आणि ते सौंदर्य पाहून विस्मित झालेले देव चर्चा करू लागले. एवढे सुंदर देवालय कृत्रिम असणे शक्यच नाही. असा विस्मय देवांना पडला आणि ज्या शिल्पीने हे घडविले तो याहीपेक्षा विस्मयचकित झाला. अशा प्रकारचे मंदिर त्याने पुन्हा बांधण्याचा असफल प्रयत्न केला. त्यानंतर तो म्हणाला की, 'ही कलाकृती मी कशी बरे केली?' बडोदे येथे हा संस्कृत ताम्रपट सापडला. राष्ट्रकूट घराण्याचा गुजरात शाखेतील राजा दुसरा कर्क याने सिद्धांशी या गावी इ. स. ८१२ मध्ये जे दान दिले. त्यावेळेचा हा ताम्रपट आहे. देवांनाच असा गूढ प्रश्न पडला तर मग म्या पामराची काय कथा!



# आषाढ यावा गंध कस्तुरीचा पेरण्या!

ऋतूरंग.....
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

चक्क डोळ्यासमोर ऋतू कूस बदलून घेतो
पावसा आधी ढगांमध्ये कोठून गारवा येतो?

**कवी सौमित्र यांच्या गारवा या पावसावरील कवितांमधील ह्या ओळी आठवल्या की मला ग्रीष्मामधून उन्हाळ्यातच ज्येष्ठ महिना सरताच आषाढाचे आगमन झाल्यावरचे वातावरण सौमित्र ह्यांनी वरील शब्दात नेमकेपणाने टिपले आहे असे वाटते. नेमके ऊन सरत नाही, ढगामधून पाणी झरत नाही आणि अशावेळी आषाढ आपल्या धुंदीत मस्तीत येत असतो. वार्याचा वेग म्हणजे काय ते जाणवत राहावे, अशा ताकदीने झाडाझुडपांना हलवत, आकाशातल्या काळ्या पांढर्या ढगांना सैरावैरा उडवून, दोन ढग एकमेकांना घासले की, ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट, चमचमाट इत्यादी अधून-मधून सुरू होते. उन्हाळ्यात झाडांची वाळलेली पाने वार्याच्या वेगाबरोबर स्पर्धा करत धावू लागतात. खरे तर आषाढातही पुन्हा काही झाडाच्या पानांची गळती होत असते, या काळातील बहुतांश पाने पिवळे होऊन पडत असतात. अनेक झाडांना या काळात बहरही येतो बहुतांशी मृग नक्षत्रात पावसाची झड लागली की हा बहर गळूनही जातो.**



आषाढ लागला की चिंचेचे झाड नव्या पोपटी पालवीने मन मोहून घेते. पण मध्यंतरी माझ्या शाळेतील चिंचेच्या झाडावर पालवी येताच शाळेतील मुलांच्या हातापायावर बारीक बारीक पुरळ येऊ लागली काळजीपूर्वक पाहिल्यावर चिंचेच्या मोहरा सोबत अतिशय बारीक असे किडे झाडांवर गर्दी करून आणि ते फुलोर्यासोबत खाली पडून चावल्यावर अशी पुरळे दिसू लागली होती. त्यामुळे शाळेच्या वर्गावर येणाऱ्या चिंचेच्या त्या फांद्या नाईलाजाने काढून टाकाव्या लागल्या. हे असे सूक्ष्म बारीक जीव म्हणजे बदललेल्या पर्यावरणाचे दुष्परिणामच. आषाढामध्ये नाच रे मोरा आंब्याच्या बनात असे म्हणणारे बालविश्व आजच्या काळात डोळ्यांनी दिसणेही दुरापास्त झाले आहे. मात्र अजूनही मेहकरच्या पैनगंगा नदीच्या काठावर छत्री कुत्री ह्या नावाने ओळखल्या जाणार्या भागात, लोणार सरोवराच्या जवळ किन्ही रोडवर म्याव म्याव असा आवाज येतो आणि नाचायला सांगणारी पिढी नसली तरी आषाढाच्या ढगाकडे पाहून मोर आजही नाचत असावा असा दिलासा मनाला मिळतो. परिस्थिती कितीही बदलली तरी आपण आपले काम करत रहावे हा संदेश जणू हा मोर पिसारा फुलवून नाचताना देत असतो.

आषाढाच्या बाजारामध्ये गर्दी होते ती जांभळाची, मधुमेह नावाच्या श्रीमंत बिमारीवर जांभूळ उपचारात्मक ठरते असा शोध लागल्यापासून साधारणपणे १०-२० पैशाला ग्लास भर अशा पद्धतीने शाळेच्यासमोर विकली जाणारी जांभळे आजकाल दोनशे रुपये किलोंपर्यंत आपली किंमत वाढवून बसले आहेत. पिकलेले रसरसीत ताजे जांभूळ पाहताच तोंडाला पाणी सुटणार नाही असा मनुष्य विरळाच. आषाढामध्ये बाजारात दिसणारा भाजीपाला कमी होतो आणि जेवढा असतो तेवढा महागाई कशाला म्हणतात ते शिकवणार असतो. पूर्वीच्या काळी आषाढामध्ये झाडावर पिकून ज्याचा घमघमाट आसमंतभर पसरून राहायचा ते कवठाचे झाड आज-काल डोळ्यांनी दिसणेही कठीण झाले आहे. मात्र आपला पर्णसांभार गमावून अंगभर फुले लेवून उन्हाळ्यातल्या सूर्याला वाकोल्या दाखवणाऱ्या पळस पांगरा, शर्वरी म्हणजेच काटेसावरी, पळस, शेवगा, गुलमोहर अशा अनेक झाडांवर पोपटी पानांची रंगछटा मन भूलवणारी असते. पेरूचे झाड आता लवकरच माझे दिवस येणार असा इशारा देत हसत असते. आमच्या लहानपणी आषाढ समोर उभा ठाकला की घराचे कौले किंवा पत्रे छावण्याचे काम केले जात असे. त्यासाठी फार क्वचित प्रसंगी मजूर बोलवल्या जायाचा, ऐरवी चार-पाच शेजारी-शेजारी राहत असलेले बापे पाऊस येण्यापूर्वी एकमेकांना मदत करत आज याचे उद्या त्याचे अशा पद्धतीने छप्पर नीट करून घेत. अश्या छोट्या मोठ्या प्रसंगातून नेमकेपणाने शेजारधर्म कशाला म्हणतात ते आम्ही लहानपणीच शिकलो होतो. जसे मानव प्राणी पावसाळ्याचा सामना करण्यासाठी सज्ज होतो अगदी त्याच पद्धतीने सृष्टीतील इतर प्राणीही आपापल्या परीने या ऋतूचा आनंद घेण्यासाठी आणि सामना करण्यासाठी सज्ज असतात. पावसाच्या आगमनापूर्वी मुंग्यांच्या रांगा पावसाळाभर पुरेल एवढे अन्न घेऊन जाताना दिसतात. त्यांचे रांगेतील शिस्तबद्ध चालणे, पावसाळ्यात अन्न साठवून ठेवण्याची विचारशक्ती सर्वच अनाकलनीय..! आणि निसर्गाने प्रत्येक सजीवाला किती सक्षम केले आहे हे दाखवणार. मारुती चितमपल्ली यांच्या एका पुस्तकात झाडाची पाने कुस्करून डिंकाचा आणि मधाचा वापर करून ते अन्नाच्या रूपाने झाडाच्या ढोलीत ठेवून माकडे त्याचा पावसाळ्याच्या दिवसात अन्न म्हणून वापर करतात असा संदर्भ वाचायला मिळाला होता. खरे तर लोककथा मधून ऐकलेली तहानलाडू भूकलाडू ही संकल्पना त्यांचीच.

एखादा दुसरा पाऊस पडला की शेतामध्ये पेरणीच्या कामाचा उत्सव साजरा होत असे. होय पेरणीचा उत्सवच, समोर बैलाच्या मानेवर ओझे ठेवून तिफन चालत असे. विठ्ठल वाघांच्या कवितेप्रमाणे सदाशिव आणि पार्वती यांची जोडी शेतात राब राबत असे, या पद्धतीत आज आमूलाग्र बदल झाला आहे, शेतामध्ये ट्रॅक्टरने नांगरणी पेरणी इत्यादी होत आहे, बळीराजाचा सखा सोबती बैल आता खुंट्यावरही दिसेनासा झाला आहे. शेतीचे तंत्र, यंत्र आणि मंत्र सर्वच आधुनिकीकरणात बदलून गेले आहे बदलली नाही ती शेतकर्यांची दैना, शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू आणि वेदना. मात्र आषाढ येतो तो हिरव्या स्वप्नांची गर्दी करत. धनधान्य आणि समृद्धी यांची लयलूट करून ही सृजनव्रती माती आपल्यावर माया दाखवेल ही आशा प्रत्येक शेतकऱ्यांच्या मनामध्ये पल्लवीत झालेली असते.

आषाढामध्ये पाऊस सुरू होतो आणि पाऊस आणि वारा यांच्या एकत्रित आगमनातून सृष्टीची बऱ्यापैकी त्रेधातिरपीट उडते. अनेक झाडांच्या फांद्या मोडून पडतात. झाडावर भिजणारे पक्षी पाऊस गेल्यावर विजेच्या तारेवर ओळीने अंग सुकवताना दिसतात. मोबाईलचा रेडिएशनमुळे चिमण्याची प्रजाती नष्ट होत आहे असे वाक्य आठवल्यावर त्याच मोबाईलच्या टॉवर वर शेकडो सुगरणी बसून काय करत असाव्यात? असा प्रश्न मला पडतो. पाऊस पडून गेला की एखाद्या झाडाच्या पानांमधून चातकाचा आवाज, कोकिळेचा आवाज पुन्हा कानावर पडायला लागतो. आकाशात ढगांचे गर्दी होते, ही गर्दी कधी कधी दिवस दोन दिवस तर कधी कधी आठ दिवसही सूर्याला झाकून ठेवते. या काळात पाऊस पडेलच असे नाही पण पावसाळा आल्याची जाणीव सर्वत्र असते. घरातील जुन्या छत्र्या दुरुस्त करून पावसाळ्यात वापरण्याचे दिवस किंवा अंगावर पोत्याची घोंगडे घेऊन अर्धवट भिजण्याचे दिवस आता आठवणीत उरले तरी तेच खरे झिम्माड दिवस होते हे नक्की.

महाराष्ट्रभरचे रस्ते ज्ञानोबा तुकाराम ज्ञानराज माऊली तुकाराम अशा घोषणांनी व्यापून पंढरीकडे चालू लागतात. आषाढी एकादशीच्या दिवशी आपले आराध्य दैवत म्हणजे विठ्ठल निद्रिस्त होणार आणि त्यानंतर कार्तिक शुल्क एकादशीपर्यंत ते निद्रिस्त राहणार त्यामुळे त्याला भेट देण्यासाठी महाराष्ट्रातील वारकरी पंढरपुरात गर्दी करत असतात. म्हणूनच आषाढी एकादशीला देवशयनी एकादशी सुद्धा म्हटले जाते. बारा बलुतेदार यांनी एकेकाळी महाराष्ट्राचा कारभार केला आहे. त्यामुळे वारी परंपरेमध्ये बलुतेदारातील प्रत्येक समाज घटकातील किमान एका तरी संताला महत्त्वाचे स्थान दिसून येते. वारीतली ही धर्मनिरपेक्षता कायमस्वरूपी संपूर्ण महाराष्ट्रात अंगीकारली गेली असती तर कदाचित सामाजिक भेदाभेदीच्या भिंती उभ्या राहिल्या नसत्या. हा आषाढ कवी मनात ओलावा निर्माण करणारा असतो.

महाकवी कालिदास यांच्या काव्यात आषाढाच्या प्रथम दिवसाचे महत्व आणि वर्णन त्यांनी फार प्रभावीपणे केले आहे. विरहातला यक्ष आपल्या पत्नीला मेघाच्या माध्यमातून संदेश पाठवतो त्या मेघदूतामधील आषाढेस्य प्रथम दिवस ह्या एका ओळीतून अनेक महाकाव्य जन्मास येतील एवढी त्या कालिदासापासून प्रेरणा घेत जवळपास प्रत्येक कवीने पावसाच्या कविता लिहिल्या आहेत.

आषाढामधली पौर्णिमा ही सुद्धा अनन्यसाधारणच, कारण तिची ओळखच गुरुपौर्णिमा ह्या नावाने होते. गुरुकुल पद्धतीत शिक्षण घेणारे शिष्य गुरु पौर्णिमेच्या दिवशी आपल्या गुरूंचा गौरव करण्यासाठी त्यांचे पूजन करायचे. त्यांना गुरुदक्षिणा द्यायचे. गुरुचे माणसाच्या जीवनातील महत्त्व सांगणारी ही पौर्णिमा होय. गुरुपौर्णिमा आली की मला मात्र उगाच द्रोणाचार्य आणि एकलव्य यांची कथा आठवत राहते.किंबहुना व्यास पौर्णिमा म्हणजे व्यासांचे स्मरण व्हावे पण व्यासांनी आपल्या लिखाणात एकलव्याला न्याय दिला का? असा प्रश्न उपस्थित करून ठेवला. पण मला वाटते द्रोणाचार्य हे गुरु संज्ञेत न बसणारे आणि वेतन घेऊन राजपुत्रांना शिक्षण देणारे शिक्षक होते असे म्हणणे जास्त सोयीचे ठरते कारण भीष्माने त्यांची निवड या राजपुत्रांना शिकवण्यासाठी केली होती असे संदर्भ महाभारत या महाकाव्यात सापडतात. वर्तमान काळातही गुरूंचे शिक्षकात कधी आणि कसे परिवर्तन झाले हे कुणाला कळलं नाही.

आषाढामध्ये शेतीकामाच्या सारखी एक महत्त्वाची लगबग असते ती शाळा सुरू होण्याची, अनेक चिमुकल्याची शाळेत जाताना होणारी तगमग, कुणाची शाळेत जाताना जाण्यासाठी असणारी उत्सुकता, नव्या पुस्तकांचा गंध, नवी दप्तरे, पाटी,पेन्सिल, पेन इत्यादीची खरेदी, शाळेत जाण्यासाठी नवा गणवेश ही सगळी उत्सुकता पूर्वीही होते आजही आहे. यात विशेषत्वाने काही बदल झाला नाही याचे समाधान आहे. मात्र तरीही नव्या पुस्तकाला स्वतः कव्हर लावून मी स्वतः कव्हर लावले असे अभिमानाने सांगणारी पिढी आज दिसत नाही. दप्तराचे ओझे सांभाळत चिखलातून वाट काढत, रस्त्यात जमलेल्या पाण्याच्या डबक्यात दगड फेकून त्याचे तरंग मोजत आनंद मिळवणारी आपली पिढी शेवटची होती असे एखादेवेळी वाटते.

ग्रामीण भागात अजूनही आषाढ, आषाढच वाटतो शहरात मात्र सिमेंटच्या जंगलाखाली दबलेल्या जमिनीवर आषाढाचे थेंब पडले तरी कस्तुरीचा सुगंध येत नाही. शहरात अनेकदा रात्रभर पाऊस पडतो आणि सिमेंटच्या रस्त्यावर न साचलेले पाणी आणि रात्रभर स्लॅब वर आवाज न आल्याने पाऊस आपल्या झोपेवर मात न करता कोसळतो, आणि आपण त्याचे दखल नाही घेतल्याने हिरमुसतो. पण माणसाने दखल घेतली नाही तरी संपूर्ण सृष्टी आपली वाट पाहत आहे, संपूर्ण सृष्टीत अस्तित्व आपल्या थेंबांना झेलून घेण्यासाठी आसुसलेले आहे या जाणिवेतून तो पडत राहतो, आणि सृष्टीला भिजवत राहतो. म्हणून मनावर असे वाटते... आषाढ यावा गंध कस्तुरीचा पेरण्या, आषाढ यावा शिल्प चैतन्याचे कोरण्या नाही का?

पान १ वरून

## नव्या आव्हानांसाठी संशोधन सुसज्जता!

परिणामी, आयफोन निर्मितीवर याचा परिणाम होणार, हे निश्चित. केवळ तैवानमधील कर्मचारी तिथे तैनात आहेत. भारतातून होणारी आयफोनची विक्रमी निर्यात चीनला खुपली आणि तंत्रज्ञानाच्या देवाणघेवाणीचे कारण देत कर्मचाऱ्यांना माघारी बोलावण्यात आले. चीनने ज्याप्रकारे या गोष्टीचा वापर अस्त्र म्हणून केला, तसा भारत करणार नाही. मात्र, आत्मनिर्भरतेच्या दृष्टीनेही 'आरडीआय' योजना महत्त्वाची ठरेल. अर्थात याचा निधी येत्या काळात सरकारने आणखी वाढविण्याची गरज आहे, शिवाय रणनीतीही ठरविण्याची गरज आहे.

## शुभांशुची गगणयान भरारी

या प्रयोगांतर्गत, या बियाण्यांपासून वाढलेल्या वनस्पतींच्या अनुवंशशास्त्र, सूक्ष्मजीव परिसंस्था आणि पौष्टिक प्रोफाइलमध्ये कोणते बदल होतात हे देखील पाहिले जाईल. याशिवाय, शुभांशु शुक्लाने आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर अद्वितीय सूक्ष्म-गुरुत्वाकर्षण प्रयोग केले, जे भारताच्या अवकाश विज्ञान आणि तंत्रज्ञानातील वाढत्या क्षमतांचे प्रदर्शन होते. हे प्रयोग भविष्यातील ग्रह मोहिमा आणि दीर्घकाळाच्या अंतराळ मुक्कामासाठी महत्त्वाचा डेटा प्रदान करण्यासाठी होते. शुभांशु शुक्ला यांनी दुसऱ्या एका प्रयोगात सूक्ष्म-शैवाळाचाही वापर केला आहे. ज्याचा वापर अन्न, ऑक्सिजन आणि जैवइंधन तयार करण्यासाठी केला जाऊ शकतो. हे संशोधन भविष्यात अवकाशात शाश्वत शेतीसाठी महत्त्वाचे ठरू शकते.

शुक्ला यांची अंतराळ स्थानकावरील भेट त्यांच्या वैयक्तिक यशापुरती मर्यादित नाही तर भारताच्या अंतराळ संशोधनाच्या इतिहासातील एक नवीन पर्व ठरले. अक्सिओम-४ या खासगी अंतराळ सहकार्य मोहिमेचा भाग होऊन त्यांनी केलेली ही 'स्पेस सफर' भारताच्या वैज्ञानिक, तांत्रिक, सामरिक आणि प्रेरणादायी दृष्टिकोनातून क्रांतिकारी ठरू शकते. शुक्ला यांची अंतराळ स्थानक भेट ही केवळ एक ऐतिहासिक घटना नाही तर भारताच्या अंतराळ प्रवासाच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. हे यश नव्या युगासाठी मैलाचा दगड ठरेल. एक भारतीय अंतराळवीर आंतरराष्ट्रीय स्थानकावर पोहोचला यापेक्षा 'भारतातील अंतराळ स्वप्नांनी आता भूतल सोडले' हे अधिक बोलके आहे.

## दुर्मीळ खनिजांचे शस्त्रीकरण आणि ...

आता प्रश्न हाच की, भारताला हीच परिस्थिती एक संधी म्हणून वापरता येईल का? हे आपल्या इच्छाशक्तीवर अवलंबून आहे. आपल्याकडे तिसर्या क्रमांकाचे साठे आहेत, जागतिक मागणी वाढत आहे आणि चीनविरोधी वातावरण तयार होत आहे. भारताने आता निर्णायक पावले उचलली, तर आपण केवळ आयातदार न राहता पुरवठादार होऊ शकतो.

'मेक इन इंडिया'ला खरं अर्थाने चालना देणारा हा खरा काळ आहे. भारताला ही वेळ एक परीक्षेसारखी आहे; जागतिक नेतृत्वाची, नैतिक जबाबदारीची आणि धोरणात्मक शहाणपणाची. चीनच्या शस्त्रीकरणाला उत्तर देताना भारताने जगाला एक विश्वासार्ह पर्याय देणे हेच खऱ्या अर्थाने जागतिक नेता होण्याचे लक्षण ठरेल. ही संधी केवळ दुर्मीळ नाही, ती ऐतिहासिक आहे. भारताने आता निर्णायक पावले उचलली, तर आपण केवळ आयातदार न राहता पुरवठादार होऊ शकतो. 'मेक इन इंडिया'ला खऱ्या अर्थाने चालना देणारा हा खरा काळ म्हणावा लागेल.

## आषाढ

त्या ढगांचा भार थोडा
आधार सांगून वाकला
ती कथा मग प्रे विरह
शब्द स्थापून गाजला.
ती मेघ वाणी उरात
संगीत सांगून लाजली
पावसाची ती कथा ना
आषाढस्य वाटली.
ती प्रवाही प्रे गीते
घेऊन पानांवर थाटले
दूर मातीच्या कणांवर
विरह घेऊन आटले.
उष्ण व्याप्त कडा तिच्याशी
तृप्त धारा वेढल्या
मग कविता पाऊस
होऊन आषाढस्य गाजल्या.
ती लिहिली मेघवाणी
सरींच्या आशेत सुख
हिरवळीवर प्रे लिहून
कविता विरही सन्मुख.
त्या सरींचा आधार होऊन
आभाळ आड्नेत- श्रद्धा
राऊत बुरले वाहिले
मातीत कृष्ण कांतीतले
मज विठू दर्शन भावले.
विठू दर्शन भावले.

श्रद्धा बुरले

## दाता

दरवर्षीच पाऊस हा
घेऊन दान देतो
उन्हाच्या काहिलीला
गारेगार मन देतो
भुकेल्या जनावरांना
हिरवेगार रान देतो
सुकलेल्या त्या फांदीला
कोवळे कोवळे पान देतो
रिमझिम गाणाऱ्या सुरांना
प्रतिसाद तो छान देतो
ऐकणाऱ्या हृदयाला
आपुलकीचे कान देतो
चिंब भिजल्या कायेला
सौंदर्याचा मान देतो
कविमनाच्या ओंजळीत
चार शब्दांचे दान देतो
कोण म्हणतं पाऊस
फक्त पाऊस होऊन येतो
जातानाही पुढच्या वर्षीची
चाहूल मागे ठेवून जातो

अश्विनी भागवत



**हिंदू, बौद्ध, शीख व्यतिरिक्त धर्मांतरितांचे अनुसूचित जाती प्रमाणपत्र रद्द करण्याचा महाराष्ट्र सरकारने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे! सेक्युलर पक्षांचा राजकीय आश्रय असलेल्या 'कन्व्हर्जन-माफिया' विरुद्ध उचललेले हे एक धाडसी पाऊल आहे. वाळवंटातून आलेल्या धर्मांमध्ये कन्व्हर्ट झालेल्या अनुसूचित जातीच्या लोकांच्या प्रमाणपत्र रद्दीकरणाचा हा निर्णय केवळ कायद्याच्या अंमलबजावणीचा मुद्दा नाहीये, तर तो सामाजिक समतेच्या रक्षणाचा आणि सनातन मूल्यांच्या जपणुकीचा निर्धार आहे.**

## वेल-डन देवेन्द्र फडणवीस सरकार.

राजकारण
वेद कुमार

सगळ्यात महत्वाचे म्हणजे कोणीही कोर्टात जावे नाही तर कुठंही जावे, हा निर्णय आता स्थगित किंवा रद्द होऊ शकणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच स्पष्ट केले आहे की अनुसूचित जातींना मिळणाऱ्या सुविधा आणि आरक्षणे केवळ हिंदू, बौद्ध आणि शीख धर्मांमध्ये राहणाऱ्यांसाठीच आहेत. याच न्यायालयीन निर्णयाचा 'अभ्यास' करून, महाराष्ट्र सरकारने आता आपले धोरण बनविले असून त्याची कडक अंमलबजावणी करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.


या निर्णयामुळे धर्मांतर करूनही अनुसूचित जातीचे बनावट प्रमाणपत्र घेऊन सरकारी नोकऱ्या, शैक्षणिक संधी किंवा निवडणुका जिंकणाऱ्यांवर आता गंडांतर येणार आहे! अशा प्रकरणांमध्ये केवळ प्रमाणपत्र रद्द होणार नाही, तर त्या व्यक्तीने मिळवलेले लाभ परत घेतले जातील आणि निवडणुका जिंकल्या असतील तर त्या देखील रद्द केल्या जातील. ही केवळ कायदेशीर कारवाई नाही, तर समाजात एक स्पष्ट संदेश देणारे पाऊल आहे की धर्मांतर करून अनुसूचित जातीच्या नावावर लाभ मिळवण्याचा मार्ग आता बंद झाला आहे.

धर्मांतरित व्यक्तींना जर त्यांच्या नव्या धर्मात सामाजिक अन्यायाची जाणीव नसेल, तर त्यांनी त्या समाजात जरूर समरस व्हावे, पण मूळ जातीचे फायदे आणि नव्या धर्माचा स्वीकार करत दोन्हीकडून ढोल बडवू नये. अशी डबल-ढोलकी लोकं मूळ अनुसूचित जातींची फसवणूक करत त्यांच्या न्याय्य हक्कांवर गदा आणत होते.

फडणवीस सरकारने यापूर्वीही जश्या शांततेत पण ठामपणे हिंदुत्वाच्या आणि राष्ट्रहिताच्या अनेक गोष्टी पुढे रेटल्या आहेत, त्याच प्रमाणे कोणताही अनावश्यक गोंधळ न करता आणि कोर्टाच्या निर्णयाचा सन्मान राखत त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना आवश्यक कारवाई करण्याचे आदेशही दिले आहेत. त्याचबरोबर, जबरदस्तीने किंवा फसवून धर्मांतर घडवून आणणाऱ्या शक्तींवर कारवाई करण्यासाठी स्वतंत्र कायदा आणण्याचीही तयारी सरकार करत आहे. इतर राज्यांचे कायदे आणि सुप्रीम कोर्टाचे निकाल यांचा 'अभ्यास' करून एक 'फेल-प्रूफ' कायदा आणणे सामाजिक समतेच्या रक्षणासाठी महत्त्वाचे आहे, हे सरकार जाणून आहे. 'अभ्यास' करायला वेळ लागतो त्याला कारण आहे. कोणी गैरवापर करू शकणार नाही (चुकून किंवा जाणूनबुजून) असा एक फुल-प्रूफ कायदा तर कॉपी-पेस्ट करून आणता येऊ शकतो, पण जर तो कायदा 'फेल-प्रूफ' नसेल तर त्याची नीट अंमलबजावणीच होत नाही. तो कायदा 'ऑन-पेपर' कितीही चांगला असो, उपयोग होत नाही.

लक्षात घ्या, तुम्ही फुलप्रूफ कायदा तयार केला पण जर अधिकारी तो लागू करत नसतील, राजकीय दबावामुळे किंवा सामाजिक तणावाखाली तो कोलमडत असेल, न्यायालयात तो रोखला जात असेल किंवा सिस्टमच स्लो असेल, तर कायदा फुलप्रूफ असूनही 'फेल' होतो. म्हणून, कायदा फेलप्रूफ पण असणं आवश्यक आहे. 'अभ्यास' यासाठी करावा लागतो. असो!

फडणवीस सरकारच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे केवळ बनावट लाभार्थ्यांना लगाम बसणार नाहीये, तर खऱ्या अनुसूचित जातींच्या व्यक्तींना त्यांचे हक्क मिळण्यात मोठी मदत होणार आहे. महाराष्ट्र सरकारचे हे धाडसी पाऊल स्वागतार्ह असून, इतर राज्यांनीही या दिशेने विचार केला पाहिजे.



# मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण

प्रबंधांची बीजे
श्रीरंग हिर्लेकर

या जगामध्ये घडणारी प्रत्येक गोष्ट आपल्या मर्जीनुसारच घडली पाहिजे; आपण म्हणू तसेच झाले पाहिजे, अशी प्रत्येकाची इच्छा असते. काही जणांच्या बाबतीत तर ही इच्छा दुराग्रहाचे, हट्टाग्रहाचे रूप घेते. परंतु असे घडत नसते. असे जर घडले नाही तर त्याचे दोन परिणाम होतात. आपल्या मनासारखे काहीच घडत नाही हे जाणवून माणसे हिरमुसली होतात. कधी कधी वैफल्यग्रस्त होतात. दुसरा परिणाम असा होतो की, एखादी गोष्ट जर आपल्या मनाविरुद्ध घडली तर ती सहन न होऊन संतापाचा भडका उडणारी माणसेही समाजात असतात.

आपल्या वाट्याला आलेले जीवन जगणे म्हणजे समायोजन करणे, हे आपण विसरून जातो. असे समायोजन करायचे झाले, तर आधी मनाला समजवावे लागते. कधी मन मोठे करावे लागते तर कधी मन मारावेही लागते. ज्याचे मन विशाल, सर्वसमावेशक असते, तो समाजात आणि कुटुंबात आदर्श असतो. आपल्या मनाला वळण लावण्याचे कार्य हे मानवी जीवनातील सर्वात उन्नत कार्य आहे. मनावर करावयाच्या संस्कारांची जाणीव संतांना होती, म्हणून संतांना पृथ्वीवरील चालते बोलते देव म्हटले जाते.

'भूदेव संतांसी सदा नमावे' या वचनामागील रहस्य हे असे आहे. शेवटी आपला सामाजिक आणि कौटुंबिक व्यवहार म्हणजे दोन किंवा त्यापेक्षा जास्त माणसांच्या मनोव्यापारातील देवाण-घेवाणच असते ना? यासाठी समर्थांनी सर्वात प्रथम उपदेश कुणाला केला असेल, तर तो मनाला केलेला आहे.

माणसाचे मन अतिशय चंचल असते. आता इथे तर क्षणात तिथे. मनाचा वेग हा अतुलनीय आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी 'मन वढाय वढाय' या रचनेत मनाच्या या चंचलतेचे अतिशय चपखल वर्णन केलेले आहे. मनाला सहावे इंद्रिय मानले गेले आहे. समर्थांनी मनालाच उपदेश केला आहे. 'मन सज्जना भक्तिपंथेचि जावे' याप्रमाणे समर्थांनी २०५ श्लोकांमध्ये मनाला उपदेश केला आहे. गीते ध्येदेखील महाप्रतापी अर्जुनाने भगवंताला मनाच्या चंचलतेची आणि अनिग्रहाची कबुली दिलेली आहे.


**योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन ।**
**एतस्याहं न पश्यामि**
**चंचलत्वास्थितीं स्थिराम ।।३३-६।।**
**चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवददृम ।**
**तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करं ।।**
**३४-६।।**
**अर्जुनाच्या या उद्गारांवर माउली सांगते-**
**अर्जुन म्हणे देवा।**
**तुम्ही सांगा कीर आमुचिया कणवा।**
**पुरी न पुरों जी स्वभावा। मनाचिया ।।**
**हे मन कैसे केवढे।**
**ऐसें पाहों म्हणों तरी न सापडे।**
**एऱ्हवी राहाटावया थोडें । त्रैलोक्य यया।।**
**जें विवेकाते भुलवी।**
**संतोषासी चाड लावी।**
**बैसजे तरी हिंडवी। दाही दिशा ।।**

यावर भगवंताने दिलेले उत्तर आपणा सर्वांसाठी आजही त्रिकालाबाधित आहे. भगवान म्हणतात...

**असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलं ।**
**अभ्यासेन तु कौंतेय**
**वैराग्येण च गृह्यते ।।३५-६।।**

यावर माउलीने जे कथन केले ते अभ्यासण्याजोगेच नव्हे तर आचरणात आणण्याजोगे आहे.

**तंव कृष्ण म्हणति साचचि।**



**बोलत आम्हासि तें तैसेचि।**
**यया मनाचा कीर चपळिच। स्वभावो गे॥**
**परी वैराग्याचेनि आधारे।**
**जरी लावले अभ्यासाचिये मोहरे ।**
**तरि केतुलेनि एकें अवसरें। स्थिरावेल।।**
**कां जें यया मनाचें एक निकें ।**
**जें हें देखिले गोडीचिया ठाया सोके।**
**म्हणोनि अनुभवसुखचि कवतिके ।**
**दावीत जाईजे।।**

आपले मन एकाग्र करणे, त्याला वळण लावणे ही एक साधना आहे. त्यासाठी संतांनी हरिस्मरणाचा मार्ग सांगितलेला आहे. संत एकनाथ म्हणतात-

**या मनाची एक उत्तम गती।**
**जरी स्वयें लागले परमार्थी।**
**तरी दासी करी चारी मुक्ती।**
**दे बांधोनि हाती परब्रह्म ।।**

जगद्‌गुरू संत तुकोबारायांनीही मनावर विजय मिळविण्याचे महत्त्व जाणले होते. मनाला जर प्रसन्न ठेवले तर सर्व प्रकारच्या सिद्धी हात जोडून समोर उभ्या राहतात, हे तुकोबारायांचे सांगणे आहे. आपल्या आयुष्याला उत्तम मार्गाने नेणे किंवा वाईट मार्गाने नेणे हे केवळ मनच करू शकते. आपले खरे दैवत आपले आपले मनच आहे. या चंचल मनाला आवर घालायची असेल तर परमेश्वराच्या नित्य अनुसंधानाशिवाय अन्य मार्ग नाही. संत तुकोबाराय म्हणतात....

**मन करा रे प्रसन्न।**
**सर्व सिद्धीचे कारण।**
**मोक्ष अथवा बंधन।**
**सुख समाधान इच्छा ते।।**
**आवरिता मन नावरे दुर्जन ।**
**घात करी मन माझे मज।।**
**अंतरी संसार भक्ती बाह्यात्कार।**
**म्हणोनि अंतर तुझ्यापायी।।**
**मन माझे चपळ न राहे निश्चळ।**
**घडी एक पळ स्थिर नाही ।।**
**आता तू उदास न हो नारायण।**
**धावे मज दिन गांजिलेंसे।।**

मनाच्या चपळतेने आणि अनिग्रहाने आयुष्याची फरफट होते. त्यासाठी मनावर ताबा मिळविणे हे सर्वप्रथम साधन आहे, हे संतांनी जाणले होते. म्हणूनच समर्थांनी सर्वप्रथम जर कुणाला उपदेश केला असेल तर तो मनाला केला आहे. 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही' हा संत तुकोबारायांचा उद्गार आहे. मनाला बोध करताना समर्थांनी मनाशीच संवाद साधण्याचे माध्यम निवडले, हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

आजकाल समाजातील, कुटुंबातील परस्पर संवादच तुटलेला आहे. आपल्या शेजारी कोण राहतो याची माहिती असणे तर सोडाच; परंतु त्याच्याशी कुठलाही संबंध न ठेवण्यातच कृतार्थता मानण्याचा काळ आला आहे. स्वतःचे मन जाणणे जसे महत्त्वाचे आहे तसेच दुसऱ्याचेही मन आकळले पाहिजे, यासाठी संवाद साधणे आणि तोही सुसंवाद साधणे आवश्यक आहे. निदान आजच्या जागतिकीकरणाच्या, घाईगर्दीच्या यंत्रवत आयुष्यात मन आणि जन यांचा संवाद आवश्यक आहे. म्हणूनच समर्थांनी आपल्या आयुष्यात दोनच संवाद साधले.

एक मनाशी आणि दुसरा जनाशी! मनाशी बोलण्यासारखे दुसरे सुख नाही. परंतु आपल्या मनाशी बोलायला आजकाल आपल्याला वेळ मिळतो का? उत्तर आहे 'नाही.'

**अखंड सावधान असावे। दुश्चित्त कदापि नसावे। तजवीजा करीत बसावे। एकांत स्थळी।।'**

असे समर्थ सांगतात. त्यातील एकांत स्थळी बसून तजवीज करणे याचा अर्थ समजून घेतला पाहिजे. अखंड सावधानता आणि दयाशीलता ही संतांची लक्षणे असतात. ही लक्षणे त्यांच्यात मनोनिग्रहाने आणि ईश्वरी अनुसंधानाने येतात. '**बुडती हे जन। देखवे न डोळा।**' असा कळवळा संत तुकोबारायांच्या मनात होता. मुळात ही सर्व दुःखे मनाच्या चंचलतेने, अस्थिरतेने येतात याची संतांना जाण होती. म्हणूनच मनाला योग्य वळण लावणे त्यांना महत्त्वाचे वाटले.

समर्थ एके ठिकाणी म्हणतात, 'हे मना, तुला जर या रामदरबारात राहावयाचे असेल तर तू आपली वाणी रामनामाच्या गुणवर्णनासाठीच खर्च कर. रामनामाचे सांगून चरित्र मनाला सांग. आपली वाणी रामनामासाठी अखंडपणे जपून ठेव. वाचन, श्रवण, मनन, चिंतन इत्यादी साधनांनी मनाला रामनामाच्या संकीर्तनात गुंतवून ठेव.' आपले मन हा देहाचा राजा आहे. हा राजा स्वतःच अभिषेक करून तिथे बसला आहे. आपल्या संपूर्ण व्यवहारावर या राजाचे नियंत्रण असते, नव्हे असावे लागते. काहीतरी चांगले करण्यासाठी म्हणून मनाच्या हाती हे दशेंद्रियांचे राज्य सोपविलेले आहे.

आपण ने के काय करतो, हे प्रत्येकाने आपल्या मनाला विचारून बघावे. किती जणांची उत्तरे आशावादी असतील बरे? मन मानेल तसे किंबहुना मनस्वीपणाने वागणारा माणूस नको तिथे भरकटत जातो. या भरकटण्यासाठी अहंकाराचा एक फटकाराही पुरेसा असतो. अशा भरकटण्यात माणूस स्वतःला विसरून जातो.

एकदा का माणूस या पद्धतीने स्वत्व विसरला की, त्याचे मन अहंकारग्रस्त होते आणि अज्ञानाच्या अंधकारात भरकटत जाते. हे केवळ होते ते मनाच्या चंचलतेमुळे! मन कसे आहे हे मनालाच उमगत नाही. मनाला कुणीच बघितलेले नसते. परंतु या अदृश्य शक्तीचे अधिराज्य आपल्या जगण्यावर असते. प्रसिद्ध कवी सुधीर मोघे यांच्या एका कवितेच्या ओळी इथे उद्धृत कराव्याशा वाटतात...

**मन मनास उमगत नाही**
**आधार कसा शोधावा**
**स्वप्नातील पदर धुक्याचा**
**हातास कसा लागावा**
**चेहेरा मोहोरा ह्याचा**
**कुणि कधी पहिला नाही**
**धनी अस्तित्वाचा तरीही**
**ह्याच्याविण दुसरा नाही**
**ह्या अनोळखी नात्याचा**
**कुणी कसा भरवसा द्यावा ?**


(पान ६ वर)

# कृष्ण आणि अवतार

प्रबंधांची बीजे
श्रीरंग हिर्लेकर

केवळ मनाने कल्पावे आणि श्रद्धेने मोजावे असे विश्वाचे रहस्य भौतिकशास्त्र व गणिताच्या माध्यमातून उलगडण्याचा प्रयत्न थोर शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन प्रभृतींनी केला. फार काय, पण बोसॉन पार्टिकल किंवा आदिकणांचा प्रयोग म्हणजेच नासदीय सूक्तातील सृष्टीच्या जन्माचे रहस्य सांगणारा प्रयोग असाही गैरसमज पसरला. स्वत: शास्त्रज्ञांनी मात्र असे विधान कधीच केले नाही. शास्त्रज्ञांचे कृष्णविवर आणि तत्त्वज्ञांचा कृष्ण यांची तुलना करणे दोनही विषयांचा अभ्यास करणाऱ्यांना मनोरंजकच नव्हे, तर उद्‌बोधकही होते.

भौतिकशास्त्राने गुरुत्व किंवा वस्तुमानाची व्याख्या करताना १ घन सें. मी. आकारमानाचे वजन म्हणजे गुरुत्व किंवा वस्तुमान असे सांगितले आहे. उदा. सोन्याचे वस्तुमान १९.३ ग्रॅ प्रतिघन सें. मी. याचा अर्थ १ घन सें. मी. आकारमानाच्या सोन्याचे वजन १९.३ ग्रॅ असते असा आहे. दोन भिन्न वस्तूंचे वस्तुमान एकसारखे असत नाही; किंबहुना वस्तूचे मान हीच तिची खरी ओळख, असेही म्हणता येते. हे लक्षात



आले आणि युरेका- युरेका म्हणजे सापडले-सापडले असे आनंदाने ओरडत आर्किमिडीज रस्त्याने पळत सुटल्याची कथा सर्वांना माहीत आहेच. विशिष्ट गुणधर्म हीच त्या पदार्थाची खरी ओळख असते. म्हणून चकाकते ते सर्व सोनेच नसते, या अर्थाची म्हण अक्षरशः खरी आहे. प्रत्येकाच्या चकाकीमध्ये फरक असतो.

भिन्न वस्तुमान ही जशी पदार्थाची खरी ओळख तशी भिन्न चकाकी, ही पण त्या पदार्थाची ओळख म्हणता येते. 'स्प्रेक्टोफोटो मीटर'चा उपयोग करून अती दूरच्या ग्रहांपासून येणाऱ्या प्रकाशाचा अभ्यास करून तेथे कोणत्या पदार्थांचे अस्तित्व असावे ते ठरवता येते. याचप्रमाणे अजूनही काही भौतिक गुण हे त्या पदार्थाची ओळख किंवा निराळ्या शब्दात ते त्याचे विशिष्ट गुणधर्म म्हणता येतात. याचाच अर्थ हा की, वस्तू आणि तिचे गुण हे एकमेकांशी इतके संबद्ध असतात की, समान गुणांचे दोन भिन्न पदार्थ असत नाहीत. या विधानाचा व्यत्यास असा की, अस्तित्वासाठी काही गुण असणे अवश्य असते. शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध यांचा आविष्कार म्हणजे अस्तित्व. मूळ घटनेतील एकाही गुणात आधिक्य किंवा न्यूनता निर्माण झाली तर मूळ वस्तूचे स्व-रूप नष्ट होते.

नवीन वस्तू नवीन गुणांसह प्रकट होते. या नवीन आणि मूळ वस्तूत सर्वार्थाने साधर्म्य असणे संभवत नाही आणि असे हे अस्तित्व कायम राहण्यासाठी जसे आधिक्य किंवा न्यूनता नसावी, तसे त्यात सुसूत्रताही असणे महत्त्वाचे आहे. या सुसूत्रतेत विस्कळीतपणा येताच क्षयाची प्रक्रिया आरंभ होते. आयुर्वेदानेही निरामय शरीराविषयी 'समदोष समाग्निश्च' अशी लक्षणे सांगताना वात-पित्त-कफ या त्रिदोषांविषयी हेच सांगितले आहे.

**संस्कार:** संस्कारांमुळे मुळात असलेली सुसूत्रता अधिक बळकट किंवा स्पष्ट होते. पण कितीही उत्तम संस्कार केले तरी नवनिर्मिती किंवा गुणबदल अशक्य आहे. विशिष्ट गुण हा त्या वस्तूचा स्व+भाव म्हणजे सह+ज भाव असतो.

सहज म्हणजे जन्मासोबतच उत्पन्न होतो तो. हा त्या विशिष्ट रचनेमुळे उत्पन्न होतो. गुण ही ओळख असते म्हणून या सहज भावावर अतिक्रमण होणे अशक्य आहे. 'स्वभावो दुरतिकम:' हे वचन खरे आहे. कोणाचा स्वभाव बदलणे हे किती दुरापास्त असते, हे आपण व्यवहारात बघत असतोच.

**'परधर्मो भयावह:' :** जेव्हा हा सहजभाव नष्ट करण्याचा प्रयत्न होतो तेव्हा ती विशिष्ट रचना कोलमडून पडते आणि मूळ वस्तू नष्ट होऊन तिचे प्रचंड उर्जेत रूपांतर होते. ज्ञानेश्वरांचा रेडा किंवा एन्रिको फर्मी या अणुशास्त्रज्ञाचा युरेनियम अणू यावर संस्कार होताच त्या दोघांच्याही मूळ वृत्ती नष्ट होऊन त्यांचे उर्जेत रूपांतर झाले. श्रद्धावंत सांगतात की, त्या रेड्याने वेदातील ऋचा म्हटल्या, पण नंतर तो लगेच गतप्राण झाला. युरेनियमची रचना बदलली आणि भयानक अणू ऊर्जा उत्पन्न झाली. दोनही उदाहरणात पदार्थाचा मूळ गुणधर्म व रचना बदलण्याचा प्रयत्न झाला.

याप्रमाणे गीतेत म्हटल्याप्रमाणे 'परधर्मो भयावह:' हे खरेच आहे, पण कोणासाठी तर मूळ अस्तित्वासाठी. अस्तित्व सांभाळून परधर्म पाळणे हे कठीण आहे. मात्र, हेच धर्मांतर किंवा गुणां धील बदल प्रत्यक्ष अनुभवणारे तुकाराम महाराज त्याला सोहळा म्हणतात. इतकेच नव्हे, तर तो सोहळा अनुपम असल्याचेही आवर्जून म्हणतात.

**'आपुले मरण पाहिले म्यां डोळा।**
**सोहळा झाला अनुपम।।'**

**देखणा देहान्त तो:** तुकाराम महाराजांनी कोणते धर्मांतर अनुभवले होते?

लौकिक वृत्तीतून निवृत्त होत अलौकिक साधणे हेच त्यांचे धर्मांतर. संपूर्ण निवृत्ती म्हणजे मरण. अणुस्फोटाच्या वेळेस अणू नष्ट होऊन त्याचे तेजात रूपांतर झाले. त्यावेळी त्या तेजोदर्शनामुळे किंवा साक्षात्काराने भारावलेल्या अवस्थेत ओपनहायमर या शास्त्रज्ञाला आठवण झाली ती श्रीमद्‌भगवत्‌गीतेतील-

**'दिवी सूर्य सहस्त्रस्य भवेद्युगपदुत्थिता।**
**यदि भा:सदृशी सा स्याद्धासस्तस्य महात्मन:।।**
**प्रभा सहस्त्र सूर्याची नभीं एकवटे जरी।**
**तरी त्या थोर देवाच्या प्रभेसी न तुळे चिती।।**

म्हणजे अवकाशात हजारो दिव्य सूर्य एकचा वेळेस प्रकटावेत अशा तेजस्वी विश्वरूपाची. तत्त्वज्ञ काय किंवा शास्त्रज्ञ काय, ग्रेट पिपल थिंक अलाईक हेच खरे.

अस्तित्वासाठी गुण आवश्यक असल्याचे म्हटलेच आहे. अस्तित्व मान्य केले तर गुण हे आलेच. मग 'निर्गुणावस्था' या शब्दाचा अर्थ काय? निर्गुण आणि तरीही अवस्था हे शक्य आहे का? निर्गुण म्हणजे गुणहीन नाही तर गुणांच्या कोणत्याही एका व्याख्येत जिला बसवता येत नाही, प्रत्येकच व्याख्या अपुरी ठरून गुणवर्णन शिल्लकच राहते, अशी स्थिती म्हणजे निर्गुणावस्था. निरंतर गुणी.

**जे जे बोला, ते ते साधे या विठ्ठला।।**
**अनंत रूपे अनंत वेषे देखिले मी त्यासी।**
**बापरखू़ देवीवरू खुण बाणली ऐशी।।**

**निर्गुणता:** सर्व रंगांचे मिश्रण म्हणजे पांढरा रंग तर रंगांचा अभाव म्हणजे काळा रंग. पांढरी दिसणारी वस्तू स्वत: मात्र काळी असते. कारण ती प्रकाशाला १०० टक्के परावर्तित करते आणि काळी भासणारी वस्तू तिच्यातून एकही रंगछटा बाहेर पडू देत नाही, म्हणून ती काळी भासते. दिसते असे न म्हणता भासते, असे म्हणण्याचे कारण ती कृष्ण असेल तर दिसेलच कशी? तिचे फक्त अनु ान करावयाचे.

व्याकरणकारांनीही कृष्ण शब्दाची व्याख्या आकर्षित करतो, तो कृष्ण अशीच केली आहे. अवघ्या विश्वाला स्वत:कडे आकर्षित करून त्या सर्वांच्या समावेशानेच त्याच्या अस्तित्वाची कल्पना करावयाची. कारण ते १०० टक्के आकर्षणाने रंगलेले असते.

(पान ६ वर)

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य (भाग ५७)

# मैत्रीपर्व: गुरुदेव, स्वामी विवेकानंद आणि योगी अरविंद

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२




१९ व्या आणि २० व्या शतकाचे वैशिष्ट्य असे म्हणता येईल की १९ व्या शतकाच्या अखेरीस आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीला आपल्या देशात ज्या महापुरुषांनी जन्म घेतला, त्यामध्ये गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्याबरोबरच लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद, योगी अरविंद, सुभाष बाबू यांच्यासारख्या महान व्यक्तिमत्त्वांचा समावेश होता. या अर्थाने हे महापुरुषांचे युग होते असे म्हणता येईल. या सर्व महापुरुषांच्या वयात थोडेफार अंतर असले तरी ते सगळे समकालीनच होते. त्यापैकी लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित नेहरू, सुभाषबाबू ही मंडळी भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी राजकीय कार्यात सक्रिय होती. आपल्या आयुष्याच्या सुरुवातीच्या काळात गुरुदेव रवींद्रनाथ टागोर आणि योगी अरविंद यांनी देखील भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी राजकारणात सक्रिय सहभाग घेतला होता.

योगी अरविंद तर क्रांतिकारक होते. परंतु नंतर त्यांच्या कार्याची आणि प्रयत्नांची दिशा बदलली. स्वामी विवेकानंद आणि गुरुदेव यांच्यात साम्य हे होते की या दोघांनी भारतीय संस्कृतीचा देशात आणि विदेशात प्रसार आणि प्रचार केला. या सगळ्या महापुरुषांमध्ये एक समान धागा होता तो म्हणजे ही सगळी मंडळी गुरुदेवांच्या कवितांची चाहती होती. एवढी एकच गोष्ट गुरुदेवांच्या कवितांचे महत्त्व स्पष्ट करण्यासाठी पुरेशी आहे असे मला वाटते. स्वामी विवेकानंदांनी तर गुरुदेवांच्या कवितांचे स्वतः गायन केले.

रवींद्र संगीतांचे ते चाहते होते. आपल्या काही कविता गुरुदेवांनी स्वामीजींना नोटेशनसह शिकवल्या होत्या. पुढील काळात स्वामीजींच्या शिष्या भगिनी निवेदिता यानंतर गुरुदेव आणि स्वामी विवेकानंद यांच्या भेटीमधील आणि संपर्कातील दुवा बनल्या. १८९८ साली मिस मार्गरिट नोबल स्वामी विवेकानंदांचे शिष्यत्व स्वीकारून भारतात आल्या आणि भगिनी निवेदिता म्हणून त्यांच्या कार्यात त्यांनी स्वतःला वाहून घेतले. याच सुमाराला कलकत्त्यामध्ये प्लेगची भयंकर साथ आली होती. या साथीतून लोकांना वाचवण्यासाठी आणि त्यांची मदत करण्यासाठी भगिनी निवेदिता सक्रिय होत्या. त्यांच्या याच कार्यामुळे गुरुदेव रवींद्रनाथ टागोर आणि त्यांचा संपर्क आला आणि एकमेकांशी दृढ परिचय झाला.

भगिनी निवेदितांच्या कलकत्त्यातील निवासस्थानी मग गुरुदेव, जगदीशचंद्र बोस, प्रफुल्लचंद्र राय, यदुनाथ सरकार आदी मंडळी विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी एकत्र येऊ लागली.

हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व करण्यासाठी स्वामी विवेकानंद अमेरिकेत गेले होते. तिथे भारतीय संस्कृतीची पताका फडकवत साऱ्या विश्वसमुदायाला मानवतेच्या सूत्रात एकत्र बांधण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांच्या या प्रयत्नांचा प्रचंड जयजयकार झाला. उपनिषदातील तेजस्वी विचारांचा परिचय त्यांनी जगाला करून दिला. उपनिषदांच्या शिकवणुकीकडे डोळे उघडून पहा, समर्थ व्हा. पौरुषत्वाचा संचार तुमच्या अंगी येऊ द्या. उपनिषदात काय सांगितले आहे ते डोळे उघडून पहा. त्या प्रकाशमय, ज्ञानदायी आणि बलदायी ग्रंथांकडे वळा असा संदेश त्यांनी आपल्या विचारातून जगाला दिला. त्यांच्या शिकागो येथील या विश्वविजयी परिषदेनंतर त्यांचे भारतात परतणे म्हणजे भारतासाठी एक शुभ शकून आहे असे गुरुदेवांना वाटले आणि ते खरेच होते.

स्वामीजींनी नंतर आपल्या कार्याच्या विस्तारासाठी संन्याशांचा संघ स्थापन केला आणि त्या माध्यमातून हिंदू धर्म जागृतीच्या चळवळीला प्रारंभ केला. असे करताना ते केवळ जुन्या धर्मकल्पना किंवा रुढीपरंपरांना चिकटून बसले नाहीत तर पौर्वात्य व पाश्चिमात्य विचारांची सांगड घालण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांच्या या प्रयत्नांचे गुरुदेवांना कौतुक होते. स्वामीजी तरुणांना स्वाभिमान आणि स्वावलंबनाची शिकवण देत होते ही गोष्टही गुरुदेवांना अतिशय आवडणारी होती.

किंबहुना त्यांचेही जीवनध्येय तेच होते. स्वामीजींप्रमाणेच गुरुदेवांनी उज्वल भारतीय संस्कृतीचा परदेशात प्रचार आणि प्रसार केला. स्वामीजींच्या अल्प आयुष्याच्या तुलनेत गुरुदेवांना या कार्यासाठी दीर्घायुष्य लाभले.

योगी अरविंद हे गुरुदेवांपेक्षा वयाने अकरा वर्षांनी लहान होते. परंतु त्यांची वैचारिक प्रगल्भता जबरदस्त होती. इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी त्यांच्या वडिलांनी त्यांना वयाच्या सातव्या वर्षीच इंग्लंडला पाठवले. ते अत्यंत बुद्धिमान असल्यामुळे आयसीएस परीक्षा सहज उत्तीर्ण होऊ शकले असते परंतु हेतूपुरस्सर त्यांनी त्या परीक्षेत घोडेस्वारीची परीक्षा देणे टाळले आणि मुद्दाम अनुत्तीर्ण झाले कारण त्यांना इंग्रजांची चाकरी करायचीच नव्हती. पुढे त्यांनी काही काळ बडोद्याच्या सयाजीराव महाराजांकडे सेवा केली आणि नंतर काही काळ इंग्रजी आणि फ्रेंच भाषेचे प्राध्यापक म्हणून कार्य केले. पुढे त्यांनी 'वंदेमातरम' या इंग्रजी दैनिकाचे संपादन केले आणि विविध विषयांवर लेखन करून बंगाली तरुणांमध्ये नवचैतन्य जागृत करण्याचे कार्य केले. त्यांचा कोणताही गुन्हा नसताना इंग्रजांनी त्यांना एका बॉम्ब हल्ल्याच्या खटल्यात गोवले होते.

(पान ६ वर)

# ग्रहसंकेत

**(रविवार, २० जुलै ते शनिवार, २६ जुलै २०२५)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २० जुलै-** एकादशी श्राद्ध ✻ **सोमवार, २१ जुलै-** कामिका एकादशी, द्वादशी श्राद्ध, आळंदी व निर्मळ यात्रा, दुर्गानंद महाराज पुण्यतिथी तासगाव, गोदड महाराज रथयात्रा कर्जत, विठ्ठल मंदिर उत्सव ताहराबाद ✻ **मंगळवार, २२ जुलै-** भौमप्रदोष, संत नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा, नित्यानंद महाराज पुण्यतिथी गणेशपुरी वसई, संत कन्नन महाराज पुण्यतिथी ✻ **बुधवार, २३ जुलै-** शिवरात्री, संत सावता माळी पुण्यतिथी, भारतीय श्रावण मासारंभ, लोकमान्य टिळक जयंती, स्वयंज्योती मुळेमहाराज पुण्यतिथी सातारा ✻ **गुरुवार, २४ जुलै-** दर्श अमावास्या, दीपपूजन, अन्वाधान, (गुरुपुष्यामृत सायं. ४.४४ नंतर), मरगुबाईदेवी व यात्रा बेवनूर (ता.जत) ✻ **शुक्रवार, २५ जुलै-** नक्तव्रतारंभ, श्रावण मासारंभ, श्री महालक्ष्मी स्थापना व पूजन, जरा- जीवंतिका पूजन, श्रावण मासारंभ, विठ्ठल बुवा महाराज पुण्यतिथी चितळी, द्वार यात्रा चिंचवड ✻ **शनिवार, २६ जुलै-** चंद्रदर्शन (२०: ४२ पर्यंत) नृसिंह, पिंपळ, शनि, मारुती पूजन

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** २१ जुलै ✻ **डोहाळ जेवण-** २५ जुलै (१६ पर्यंत) ✻ **बारसे-** २१ जुलै (१० नंतर) ✻ **जावळ-** २० जुलै ✻ **गृहप्रवेश-** २१, २५ २० जुलै

### मेष :- चिंता करीत बसू नका

सर्वांवर विश्वास ठेवू नका, कारण जगात खोटे लोकच जास्त आहेत. बुधवारी धनस्थ शुक्राचा मंगळाशी केंद्रयोग होत आहे. व्यवहार विचारपूर्वक करावेत. धन चिंता राहिली तरी फार चिंता करीत बसू नका. वेळेनुसार सर्वकाही बदलत जात असते. सरकारी काम, स्थावर व्यवहार मार्गी लागतील. सुसंधी लाभतील. शुभ ता. २१, २५

### वृषभः- सामंजस्याने रहावे

पाण्याचा थेंब गरम तव्यावर पडला तर नाहीसा होतो. कमळावर पडला तर चमकतो. शिंपल्यावर पडला तर मोती बनतो. थेंब तोच पण संगतीचा परिणाम आहे. राशी स्वामी शुक्र चतुर्थातील मंगळाशी केंद्रयोग होत आहे. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. स्थावर वाद वाढवू नका. रेंगाळलेली कामे मार्गी लागतील. विश्रांतीची गरज भासेल. शुभ ता. २५

### मिथुनः- अपेक्षित घटना घडतील

प्रत्येक व्यक्ती आपल्या नशिबानेच जगत असतो. वेळ त्यांना योग्यायोग्य ठिकाणी घेऊन जात असते. राशीतील गुरुच्या जोडीला शुक्रही येत आहे. त्यामुळे आता कसलीही चिंता करू नका. धनस्थ रवी, बुध योग्य मार्ग दाखवतील. उत्साह, धडाडी वाढत जाईल. वेळेचा सदुपयोग करून घ्यावा. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. २१, २५

### कर्कः- मनासारखे घडत जाईल

गोष्ट जेव्हा गरजेची असते, तेव्हा जीभ सर्वांशी गोड गोड बोलायला लागते. राशीतच रवि- बुध असल्याने आता सर्व काही मनासारखे घडत जाईल. खर्च वाढले तरी पुढील काळासाठी गुंतवणूक असल्याचे समजा. वादाचे प्रसंग टाळायलाच हवे. कला गुणांचा विकास होत जाईल. नव्या विचारांना चालना मिळेल. धार्मिक कार्यात अधिक लक्ष घालू शकाल. शुभ ता. २५

### सिंहः- सावध चित्त असू द्यावे

सर्वात मोठी संपत्ती बुद्धी आहे. धैर्य उत्तम हत्यार तर हसणे चांगले औषध आहे. राशीत मंगळ केतूसह आहे. जे नाही त्याबाबत खंत करीत बसू नका. जे आहे त्यातच समाधान मानणे म्हणजे सुख आहे. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. अति घाई संकटात नेई, याची प्रचिती संभवते. सावध चित्त असू द्यावे. शुभ ता. २५

### कन्याः- चिंता करीत बसू नका

वडिलांपेक्षा मोठे कोणीच नाही तर आई पेक्षा महत्त्वाचं काहीच नाही. कर्मस्थ गुरुच्या जोडीला शुक्रही येत आहे. त्यामुळे कार्यक्षेत्राबाबत अजिबात चिंता करीत बसू नका. आपल्या प्राक्तनातील कोणीच हिरावून घेऊ शकणार नाही. सरकारी कामे करून घ्यावीत. आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करावेत. डोळ्यांच्या तक्रारींची दखल घ्यावी. शुभ ता. २१

### तुलाः- नव्या संधी लाभतील

माणसाचे खरे भांडवल पैसे नसून विचार आहेत. पैसे येतात जातात पण विचार आपल्याकडेच राहतात. कर्म स्थानातील रवी बुधामुळे कार्यक्षेत्रात समाधानकारक फळे मिळतील. नोकरीत अधिकार वाढतील. नव्या विचारांना चालना देऊ शकाल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. नव्या संधी लाभतील. शुभ ता. २५

### वृश्चिकः- वादाचे प्रसंग टाळावेत

आपली परिस्थिती मजबूत असेल तर विष उगाळणारे आपले काहीच बिघडू शकत नाही. सप्तमातील शुक्राचा कर्मस्थ मंगळाशी केंद्रयोग होत आहे. कार्यक्षेत्रात भिन्न लिंगी व्यक्तींपासून त्रास संभवतो. जपून असावे. उत्साह, धडाडी वाढेल. अपेक्षित संधी लाभतील. नव्या कामांना गती मिळेल. कौटुंबिक जीवनात वादाचे प्रसंग टाळावे. अनुकूलता वाढेल. शुभ ता. २१

### धनुः- सुसंधी लाभतील

माणसं पण तीचं जवळ करा, ज्यांच्या मनात आपण पण तितकेच महत्त्वाचे असू. शुक्र मंगळाचा केंद्रयोग कलेचा गौरव करणार आहे. कार्यक्षेत्रात विलंबाने पण प्रगती होत जाईल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. सरकारी कामांसाठी अधिक पाठपुरावा करावा लागेल. नव्या विचारांना चालना मिळेल. सुसंधी लाभतील. शुभ ता. २५

### मकरः- अडचणी कमी होतील

श्वास व विश्वास नावे वेगळी आहेत पण त्यांचे काम एकच आहे. श्वास गेला तर जीवन संपते, विश्वास गेला तर नाते संपते. शुक्र मंगळाचा केंद्रयोग कलागुणांची प्रगती करणार आहे. भागीदारीच्या व्यवसायात प्रगती घडेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. अडचणी कमी होत जातील. शुभ ता. २५

### कुंभः- चिकाटीने रहावे

वहाणा व लोक आपल्याला त्रास देत असतील तर ते आपल्या मापात नाहीत असेच समजावे. सुखस्त शुक्राचा मंगळाशी केंद्रयोग होत आहे. अंगीकृत कार्यात प्रगतीच्या संधी लाभतील. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. कौटुंबिक जीवनात मतभेदाचे प्रसंग टाळावे. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. नव्या ओळखी पारखून घ्या. शुभ ता. २१, २५

### मीनः- प्रतिस्पर्ध्यांवर विजय

बचावाचा पवित्रा कधीच घेऊ नका. काहीच फरक पडणार नाही, असे समजून रहावे. शुक्र मंगळाचा केंद्रयोग कलागुणांचा विकास करणारा आहे. प्राप्तीचे प्रमाण समाधानकारक राहील. सरकारी कामे करून घ्यावीत. अनुकूलता वाढत जाईल. प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. चिंता नको. शुभ ता. २१, २५

!! शुभ भवतु !!

---

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

# सप्तशृंग गड

नाशिकपासून चांदवडपर्यंत आणि मनमाडपासून चाळीसगावपर्यंत सह्याद्रीची डोंगररांग 'सातमाळा' नावाने ओळखली जाते. हीच डोंगररांग पुढे चाळीसगावपासून अजिंठ्यापर्यंत पसरली असून तिला 'अजिंठा रांग' असे म्हणतात. या पर्वतरांगेत अचला किल्ल्यापासून चांदवडपर्यंत चौदा किल्ले आहेत.

या किल्ल्यांचा वापर पूर्वी टेहळणी दुर्ग म्हणून मोठ्या प्रमाणात करण्यात आला. या प्रदेशात फारशी हिरवळ नाही, परंतु येथील डोंगररांगांचे सौंदर्य आपले वेगळेपण जपत पर्यटकांना नेहमीच आकर्षित करते. म्हणूनच नाशिक, वणी परिसरातील सातमाळा डोंगररांगात असलेल्या दुर्ग किल्ल्यांची भटकंती हा पर्यटकांसाठी संस्मरणीय अनुभव आहे. सप्तशृंग गड नाशिकपासून साधारण ६० किलोमीटर अंतरावर आहे.

नाशिकवरून वणीपर्यंत गेल्यावर, सप्तशृंग गडावर जाण्यासाठी वणी गावातून उजव्या बाजूस रस्ता वळतो. हा रस्ता आपल्याला घाटमार्गाने सप्तशृंग गडावर घेऊन जातो. देवीचे मंदिर असलेल्या कातळकड्याच्या पायथ्यापर्यंत गाडी जाते. येथे भाविकांसाठी भक्त निवास, खाजगी निवास व्यवस्था, जेवणाची व्यवस्था असल्याने मुक्काम करणे सोयीचे झाले आहे. मंदिराच्या अगदी पायथ्याशी गडमाथ्यावर राहण्याचा आनंद काही वेगळाच आहे. आम्ही यावर्षी मे महिन्याच्या शेवटी देवीच्या दर्शनाला गेलो होतो. आमची राहण्याची सोय मंदिराच्या अगदी पायत्त्याशी झाली. पायऱ्यांनी व रोपवेने गडावर जाणारे दोन्ही मार्ग आमच्या खोलीसमोरून नीट दिसत होते. मंदिरातील आरतीदेखील निवास व्यवस्थेच्या ठिकाणी अगदी स्पष्ट ऐकू येत होती. त्यामुळे सप्तशृंगी देवीच्या सहवासात राहण्याचा आनंद मिळाला.




गडावरील मंदिरात रोपवे वरून सतत दोन छोट्या ट्रेन चढताना व उतरताना दिसतात. रोपवेची सोय झाल्यानंतर आम्ही पहिल्यांदाच गेलो होतो. रोपवे झाल्यामुळे संध्याकाळी व दुसऱ्या दिवशी सकाळी असे दोनदा देवीचे दर्शन घेणे शक्य झाले. रात्रीच्या वेळी गडावर दिवे लागल्यावर मंदिर अप्रतिम दिसते. देवीच्या मंदिराच्या आजूबाजूला मोकळी जागा नाही. अरुंद गडमाथा आहे त्यामुळे देवीला प्रदक्षिणा घालता येत नाही. दर्शन झाल्यावर मंदिराच्या उजव्या बाजूच्या मोकळ्या जागेतून मार्कंडा, रावळ्या, जावळ्या व इतर किल्ले स्पष्ट दिसतात. सप्तशृंग गड नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यात असून हे देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक आहे. कोल्हापूरची महालक्ष्मी, तुळजापूरची भवानी, माहुरची रेणुकादेवी व वणीची सप्तशृंगी अशी साडेतीन शक्तिपीठे महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत.

समुद्रसपाटीपासून साधारण ४ हजार ६५० फूट उंचीवर स्थित सप्तशृंगी देवीचे मंदिर अद्वितीय आहे. देवीची स्वयंभू मूर्ती अठराभुजा असलेली सुमारे ९ फूट उंचीची आहे. मूर्ती संपूर्णपणे शेंदूराने लिंपली असून देवीने प्रत्येक हातात विविध शस्त्रे धारण केली आहेत. देवीचे आयुधधारी रूप अत्यंत तेजस्वी आणि देखणे असून कितीही वेळ न्याहाळले तरी मन भरत नाही. मंदिराच्या गाभाऱ्याला तीन दरवाजे आहेत. त्यांची नावे शक्तिद्वार, सूर्यद्वार, चंद्रद्वार असून या तिन्ही दरवाज्यातून देवीचे दर्शन घडते.

संध्याकाळी भाविकांची गर्दी असल्याने मंदिरात जास्त वेळ थांबता आले नाही; मात्र सकाळी गेलो तेव्हा देवीचा अभिषेक, शृंगार पाहण्याचे भाग्य लाभले. देवीला अकरावार पैठणी नेसवतात व चोळीला तीन-वार खण लागतात. देवीचे शृंगार केलेले रूप पाहताना सहजच तिच्या अलंकारांवर लक्ष जाते. डोक्यावर मुकुट, गळ्यात पुतळीहार व मंगळसूत्र, गळाभरून दागिने, कानात कर्णफुले, नाकात नथ, कंबरपट्टा, पायात तोडे तिला नेसवलेल्या भरजरी पैठणीवर शोभून दिसतात. देवी सतीने आपल्या पित्याच्या इच्छेविरुद्ध श्री महादेवांशी विवाह केला त्यामुळे ते सतीवर व महादेवांवर नाराज होते. काही काळाने देवी सतीचे पिता प्रजापती दक्ष यांनी एक यज्ञ आयोजित केला. मात्र त्यांनी श्री महादेव व सती यांना आमंत्रण दिले नाही. पित्याने सर्व देवांना यज्ञाचे निमंत्रण दिले, परंतु आपल्या पतीला बोलाविले नाही, मान दिला नाही यामुळे सतीला वाईट वाटले. तिचे महादेवांवर निस्सीम प्रेम व श्रद्धा असल्याने, देवी सतीला पित्याचे हे वागणे अजिबात आवडले नाही. तिने आमंत्रण नसतानाही यज्ञाला जाण्याचे ठरविले आणि यज्ञाला माहेरी गेली. ती तिथे गेल्यावर पित्याने तिचा व श्री महादेवांचा शाब्दिक अपमान केला. या सगळ्या वागण्याने देवी सती खूप दुखावली गेली आणि तिने यज्ञकुंडात उडी मारली. इकडे श्री महादेवांना हे कळले. ते अत्यंत क्रोधित झाले.

महादेवांनी रौद्र रूप धारण केले व सतीचे मृत शरीर खांद्यावर घेऊन जग भ्रमण करू लागले. असे म्हणतात की, त्यावेळी सतीचे अवयव ज्या ज्या ठिकाणी पडले ती सर्व स्थाने शक्तिपीठ म्हणून ओळखली जातात. दैत्यराज महिषासुराला ब्रह्मदेवाकडून वरदान मिळाले होते की देव, दानव, मनुष्य यापैकी कुठल्याही पुरुषाच्या हाताने त्याला मरण येणार नाही. त्यामुळे तो उन्मत्त झाला होता. त्याने इंद्रलोकापर्यंत हाहाकार माजवला. सगळे चिंतेत होते. यावेळी ब्रह्मा, विष्णू, महेश यांनी आदिशक्ती सतीला मदत मागितली. पार्वती अठरा भुजाधारी दुर्गारूपात प्रकट झाली. सर्व देवतांनी आपले एक एक शस्त्र देवीला दिले. दुर्गादेवी व महिषासुर यांच्यात घनघोर युद्ध झाले. येथेच देवीने महिषासुराचा वध केला. महिषासुर वधानंतर देवी सप्तशृंग गडावर आरामासाठी थांबली. 'आई गिरी नंदिनी' या स्तोत्रात दुर्गादेवीच्या महिषासुरमर्दिनी रूपाचे व पराक्रमाचे वर्णन आहे. रामायणकाळात श्रीराम आणि सीता लक्ष्मणासह जेव्हा वनवासात होते, तेव्हा दंडकारण्यातून देवीच्या दर्शनाला आले होते, असा उल्लेख पौराणिक ग्रंथात आढळतो.

पूर्वीपासून साधारण ५०० पायऱ्या चढून भक्त मोठ्या श्रद्धेने सप्तशृंगी देवीच्या दर्शनास जात होते. आता मात्र ज्यांना चढणे शक्य नाही त्यांच्यासाठी गडावर जाण्यास रोपवे ट्रेन झाली आहे. भाविकांसाठी ही खूप छान सोय झाली असून सर्व वयोगटातील लोकांना देवीचे दर्शन घेणे शक्य झाले आहे. कांचनबारीच्या लढाईच्या आधी सुरत लुटीतील संपत्ती शिवाजी महाराजांनी सप्तशृंगी गडावर पाठविली होती. लढाईनंतर शिवाजी महाराज देवीच्या दर्शनाला आल्याचा उल्लेख बखरींमध्ये आला आहे. मंदिरात चैत्र नवरात्र, शाकंबरी नवरात्र साजरे केले जाते. चैत्र नवरात्रातील सप्तमीला मोठ्या प्रमाणात भाविक गडावर येतात. पहाटे ५ वाजता मंदिराची दारे उघडतात. ६ वाजता आरती होते. दुपारी महानैवेद्य आरती व संध्याकाळी साडेसात वाजता शेजारती होते. देवीच्या पूजेचा मान देशमुख व दीक्षित घराण्याचा आहे. नवरात्रात व चैत्र पौर्णिमेला मंदिरात मोठी गर्दी असते. गडावर भाविकांसाठी आता बऱ्याच नवनवीन सुविधा झाल्या असून अजूनही होतच आहेत. महाराष्ट्रातील शक्तिपीठ म्हणून सप्तशृंग गड प्रसिद्ध आहे. पूर्वी भाविक अगदी पायऱ्यापासून दोन डोंगराच्या मधील खिंडीतून गड चढून दर्शनाला येत असत. सप्तशृंग गडाला शक्तिपीठ म्हणून धार्मिक महत्त्व लाभले असल्याने येथील हवेत भक्तीचा सुगंध कायम दरवळत असतो. नवरात्रीच्या आरतीत प्रतिपदेपासून दशमीपर्यंत प्रत्येक दिवसाचे यथार्थ वर्णन केले आहे. प्रत्येक वर्षी नवरात्रीत आरती म्हणताना देवीच्या त्या त्या दिवसाच्या रूपाचे दर्शन घडते.

'सप्तमीचे दिवशी सप्तशृंग गडावरी हो तेथे तु नांदशी भोवती पुष्पे नानापरी हो जाईजुई शेवंती पूजा रेखियली बरवी हो भक्त संकटी पडता झेलुन घेशी वरचेवरी हो उदो बोला उदो!' असे सातव्या माळेचे आरतीत वर्णन केले आहे. या ओळी म्हणताना मन सप्तशृंगी देवीचे दर्शन घेण्यास गडावर पोहोचलेले असते. ही शब्दांची ताकद आहे. आपण एखाद्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन आलो की, शब्दांच्या आधारे तिथे वारंवार जाण्याचा आनंद घेता येतो.

सप्तशृंगी देवीचे रूप जितके सुंदर आहे तितकेच आश्वस्तही आहे. तिच्या डोळ्यात आत्मविश्वास, शौर्य, आनंद, समाधान आणि विश्वास आहे. तिच्या त्या रूपाच्या मोहात पडलेले मन गडावरून निघताना थोडं नाराजच असतं. मात्र, दरवेळी देवी आपली ओंजळ अपार प्रेमाने व आशीर्वादाने भरून आपल्याला निरोप देते.

---

पान ५ वरून

## मन करारे प्रसन्न...

मन म्हणजे स्वतःची जाणीव असते. ज्यातून आपले व्यक्तिमत्त्व आणि वृत्ती प्रकट होते अशी जाणीव! आपल्या अस्तित्वाची जाणीव दुसऱ्यांच्या अस्तित्वासाठी व्यापक करणारे इंद्रिय म्हणजे मन. आपल्या व्यक्तिमत्त्वावर चढलेले विकारांचे आणि विचारांचे पापुद्रे हळूहळू सोलत, शेवटी जी विशुद्ध निराकार जाणीव उरते, त्यालाच मन म्हणतात. मनाला सहावे इंद्रिय म्हटले आहे. 'मनः षष्ठाणि इंद्रियाणि प्रकृती:स्थानिकर्षति' असे प्रत्यक्ष भगवंताने गीतेत सांगितले आहे. म्हणूनच मनाच्या शुद्धतेसाठी समर्थांनी रामाच्या अनुसंधानाचा आग्रह धरलेला आहे.

'मना पाविजे सर्वही **सुख जेथे । अति आदरे ठेविजे लक्ष तेथे ।**
**विवेके कुडी कल्पना पालटीजे। मन सज्जना राघवी वस्ती कीजे ।।**'

ज्याचे मन विशुद्ध भावनांनी परिपूर्ण राहील, त्याचाच प्रपंच आणि परमार्थ शुद्ध राहील. जीवनात आपल्याला ज्या अंतिम सत्याचा शोध घ्यावा लागतो तो, अशाच शुद्ध मनाणे घ्यावा लागतो. यासाठीच ंतांनी मनाशी संवाद साधण्याचा सातत्याने उपदेश केला आहे. संतांच्या जगण्यातील प्रत्येक श्वास हा परोपकारासाठीच होता. संतांचे जीवनही काही पूर्ण सुखाने युक्त नव्हते; उलट याही माहात्म्यांना, सत्पुरुषांना, उपेक्षा, अपमान, संकटे या अग्निपरीक्षेतून जावे लागलेले आहे. परंतु आपल्या मनाला भगवंताच्या भक्तीचे वळण लावून त्यांनी आत्मज्ञानाचा मार्ग स्वीकारला आणि या आत्मज्ञानातूनच जीवनाचा आनंद उपभोगला. आत्मज्ञानातूनच मनाची दिव्यशक्ती जन्माला येते. या दिव्यशक्तीतूनच कोणत्याही संकटाचा परिहार करण्याचे सामर्थ्य मनात निर्माण होते.

सामान्य प्रापंचिक माणसाला, एकाएकी गळ्यामध्ये रुद्राक्षांच्या माळा घालून वैराग्य स्वीकारता येत नाही; किंबहुना त्याने तसे करूही नये. आपल्या वाट्याला आलेले कर्म करता करता, येणाऱ्या संकटांना आणि विषम परिस्थितीला सामोरे जाता जाता त्याला जगावे लागते. हे जगणे सुसह्य व्हावे म्हणूनच मनावर नियंत्रण हवे. संत तुकोबाराय, समर्थ रामदास यांसारख्या लोकोत्तर विभूतींना याची जाणीव होती. त्या काळच्या आपत्तीमधून समाजाला बाहेर काढण्यासाठी समर्थांनी जो विचार मांडला त्याला ऐहिकतेचा स्पर्श होता. अन्य संतांच्या शिकवणुकीपेक्षा हे जरा वेगळे होते. परंतु जोपर्यंत सामान्य माणसांची मने बलिष्ठ होणार नाहीत तोपर्यंत त्यांची मनगटेही बलिष्ठ होणार नाहीत, हे सर्वांना ठाऊक होते. म्हणूनच आपले मन बलिष्ठ करण्याचा जो उपदेश या माहात्म्यांनी केला आहे तो आजही लागू होतो. यासाठी यामागील रहस्य समजून घेतले पाहिजे.

---

पान ५ वरून

## कृष्ण आणि कृष्णविवर

**ब्लॅक होल :** म्हणजे कृष्णविवराची फक्त कल्पनाच करता येते. अनु ानेना अनु ानेना. पृथ्वीच नव्हे तर अख्खे सौर मंडळ गिळंकृत करेल, असे त्याचे गुरुत्वाकर्षण असते. ते प्रकाशालाही ओढून घेते. अत्याधुनिक टेलिस्कोपमधून त्याचे दर्शन अशक्य आहे. त्याच्या अस्तित्वाचे फक्त अनु ान करावयाचे. वेध घेणारी सर्व अत्याधुनिक यंत्रे जेथे श्रांत होतात तेथे कृष्णविवर संभवते, असे वैज्ञानिक सांगतात. याप्रमाणे किंवा 'यथा नदीनां बहवोऽम्बुवेगाः समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति। (जसे नद्यांचे सगळे प्रवाह । वेगें समुद्रात चि धांव घेती ।।) **पाया पडू गेले तर पाऊलचि न दिसे । उभाचि स्वयंभू असे । समोरचि पाठीमोरा न कळे ।'** म्हणताना माउलींना असेच काहीतरी अभिप्रेत असावे. पण म्हणून तत्त्वज्ञांचा कृष्ण आणि शास्त्रज्ञांचे कृष्णविवर हे दोनही एकच किंवा विज्ञानातील बोसान पार्टिकल म्हणजे हेच ते गूढ आदितत्त्व असा निष्कर्ष मात्र कोणी काढू नये. दुरान्वयानेही तसे सुचवावयाचे नाही आणि अभिप्रेतही नाही. त्यांची तुलना मात्र करावी.'कर्षयति इति कृष्णः' याप्रमाणे स्वत:मध्ये संपूर्ण विश्वाला आकर्षित करून त्याने नटलेला, रंगलेला तो सर्वगुणसंपन्न असा गुणगंभीर कृष्ण. विष्णुनामसहस्रात वर्णिलेली 'गुह्यो गभिरो गहनो' किंवा 'नैकरूपो बृहद्‌रूपो' म्हणजे सर्वच रूपात वावरतो म्हणून ज्याचे कोणतेही एकमेव असे विशिष्ट रूप सांगता येणार नाही असा बहुरूपी. निरंतर गुणी अस्तित्व ती निर्गुण अवस्था असे म्हणणे योग्य होईल. पुरुषसूक्तातील 'विश्वतोवृत्वात्यतिष्ठत दशांगुलम्' किंवा मोरोपंतांच्या शब्दात सांगावयाचे तर- 'स्थिरचर व्यापूनी तो परमात्मा, दशांगुळे उरला.' स्थिर म्हणजे पोटेन्शियल आणि चर म्हणजे कायनेटिक. अवघे विश्व व्यापून पुन्हा १० अंगुळे शिल्लकच म्हणजे काय? हे विश्व स्थिर नाही. सतत प्रसरण पावत आहे. त्या प्रसरणाच्या वेगाच्या गणिती सूत्रातील +१ आणि १० दिशांची प्रत्येकी १ अशी ती १० अंगुळे हे दोनही मुद्दे एकच म्हणावयाचे का? भौतिकशास्त्र या शब्दांनी सुरुवात होऊन विस्तारत गेलेल्या विचारांना अंततः निर्गुण अवस्थेची अशी खेव पडावी आणि त्यातच ते हरपून जावेत यातच कृष्णाचे विश्वगुरुत्व किंवा सर्वग्राही, सर्वभक्षी गुरुत्वाकर्षण सिद्ध होते. म्हणून व्याकरणाने कृष्ण शब्दाची जी व्याख्या केली आहे ती नव्हे तर तीच योग्य आहे.

## मैत्रीपर्व...

त्यातून दोषमुक्त झाल्यानंतर ते परागंदा झाले. पण ते पळून वगैरे गेले नव्हते तर त्यांनी पाँडेचेरीला प्रयाण केले आणि तेथे जवळपास ४० वर्षे योगसाधना केली आणि त्यातून अध्यात्मातील एका उच्च अवस्थेपर्यंत त्यांचा प्रवास झाला. इथेच गुरुदेवांची आणि त्यांची पुन्हा भेट झाली यावेळी गुरुदेव परदेश दौऱ्यासाठी निघाले होते परंतु त्यांची तब्येत बिघडल्यामुळे त्यांनी विश्रांती घेण्याचे ठरवले आणि त्यादरम्यान योगी अरविंद यांची भेट घेण्याचे निश्चित केले. त्या काळात योगी अरविंद आपल्या ध्यान साधनेमुळे कोणालाही भेटत नव्हते. योगी अरविंद यांच्या फ्रेंच शिष्य मीरा अल्फासा त्यावेळी आश्रमाचे काम पाहत होत्या. त्यांना माताजी म्हणून सर्व ओळखत होते. गुरुदेवांनी त्यांच्याशी संपर्क साधला आणि योगी अरविंद यांच्या भेटीची विनंती केली. रवींद्रनाथ आपली भेट घेऊ इच्छित आहेत हे कळल्यानंतर योगी अरविंद यांनी आपले सर्व नियम बाजूला ठेवून गुरुदेवांची भेट घेतली. योगी अरविंदांकडे पाहिल्यानंतर पहिल्याच दृष्टिक्षेपात गुरुदेवांना त्यांच्या उच्च अध्यात्मिक साधनेची जाणीव झाली. त्यांनी इतर योग्यांप्रमाणे आपल्या देहाला क्लेश दिले नव्हते तर त्यांच्या चेहऱ्यावर शांत आणि सौंदर्यपूर्ण असे हास्य आणि तेज विराजमान होते. एका योग्याची ती तेजस्वी मुद्रा होती. त्यांची ती आत्मसाक्षात्कारी अवस्था पाहिल्यानंतर गुरुदेवांनी त्यांना 'अरविंद रोबिंद्रेर लह नमस्कार' (हे अरविंदा, तुला रवींद्रचा नमस्कार असो) असे मनातल्या मनात म्हटले आणि त्यांचा निरोप घेतला. योगी अरविंद गुरुदेवांच्या कवितांचे चाहते होते. त्यांनी गुरुदेवांना साक्षात्कारी कवी म्हटले आहे.

स्वामी विवेकानंद योगी अरविंद आणि गुरुदेव रवींद्रनाथ टागोर या तिघांनाही हे माहिती होते की राजकारण हा काही मानवाच्या विकासाचा आणि कल्याणाचा मार्ग नाही. माणूस घडवणे हे महत्त्वाचे आहे. आज माणूस जाणिवेच्या ज्या पातळीवर उभा आहे त्यापेक्षाही अधिक पुढच्या पातळीवर किंवा पायरीवर गेल्याशिवाय त्याला पुढील गोष्टी नीट दिसणार नाही किंवा परिस्थितीचे योग्य आकलन होणार नाही याबाबत या तिघाही महामानवांचे एकमत होते असे दिसते. हेच त्यांचे मोठेपण आहे.

---

पान २ वरून

## फडणीसांचा...

अभिव्यक्ती स्वातंत्र्याची ही कवच कुंडले काढून घेतल्याशिवाय या लोकांवर कारवाई शक्यच नव्हती. जनसुरक्षा कायदा हा ही कवच कुंडले उध्वस्त करणार आहे. या सगळ्या पांढरपेशा गुन्हेगारांना आणि राष्ट्रद्रोह्यांना कायद्याच्या कचाट्यात अडकवून त्यांच्या पापकृत्यांची शिक्षा देण्यात हा कायदा यशस्वी होणार आहे. हा कायदा करून देवेंद्र फडणवीस यांनी गेली ७५ वर्षे कोंग्रेस ने पोसलेल्या देशद्रोही, पांढरपेश्या, विचारवंत मंडळींच्या पोळ्यावर हल्ला केला आहे. या मधमाशा आता फडणवीस यांना चावण्याचा प्रयास करणार यात संशय नाही. सरकारने जनसुरक्षा कायदा करून अशा प्रवृत्तींचा बिमोड करण्याचे ठरवले आहे ही स्वागतार्ह गोष्ट आहे. संसदीय प्रणाली न मानणारे, लाल क्रांती करून देशावर माओच्या विचारांची सत्ता आणण्याच्या वल्गना करणारे संसदीय प्रणालीने अस्तित्वात आलेल्या सर्वोच्च न्यायालयात धाव घेतीलच आणि 'भारतातील सेक्युलर त्यांची वकिली करतीलच. त्या तमाशातून हा कायदा सुखरूप बाहेर पडो ही (नव्या रूपातल्या!) न्याय देवतेपुढे प्रार्थना! इतके दिवस जंगलातील नक्षलवादी रूपी तक्षक हे संसदीय लोकशाहीला, न्यायव्यवस्थेला, पोलिस प्रशासनाला आणि सामान्य प्रशासनाला उघड आव्हान देत होते. त्यांचे रक्षण करण्याचे कार्य साम्यवादी राजकीय नेते, पत्रकार, विचारवंत, कलाकार, पत्रकार असे समस्त इन्द्र करत होते... जनसुरक्षा कायदा म्हणजे देवेंद्र फडणवीस रूपी जनमेजयाने केलेला उद्घोष आहे. ज्यात या इंद्रांची पहिली आहुती पडेल आणि दुसरी आहुती समस्त नक्षलवादी, इस्लामी दहशतवादी रूपी तक्षक मंडळींची पडणार यात संशय नाही.

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# भावनिक साक्षरतेची मशागत

सकारात्मकतेचे तत्वज्ञान २७६



संवाद आणि नाती सुधारायची असतील तर भावना समजून घेणे आणि त्या व्यवस्थितरीत्या व्यक्त करणे महत्वाचे असते. त्यामुळे सांस्कृतिक धक्के कमी होतात, समस्या-निरसनाची कौशल्ये विकसित होतात आणि भावनिक स्वास्थ्य सुधारते. भावनांना लेबल लावून त्या मांडून ठेवता येणे, दैनंदिनी लिहिणे आणि सक्रिय श्रवण करणे यासारख्या कृती माणसाची भावनिक साक्षरता सुधारण्यास मदत करतात. व्यक्तिगत आणि व्यावसायिक जीवनात हे महत्वाचे ठरते.

### भावनिक साक्षरता

१८९० साली विल्यम जेम्सने शारीरिक हालचालींवर आधारित चार मूलभूत भावनांचे वर्गीकरण मांडले- भय, शोक,प्रेम आणि क्रोध. पण आता नदीखालून खूप पाणी वाहून गेलंय आणि मानवी भावनांच्या संशोधनानेही खूप मजल मारली आहे. सगळ्याच भावना वेळोवेळी आपल्यावर अधिराज्य गाजवीत असतात. पण आपणच त्यांना गृहीत धरून त्यांची ओळख धूसर करतो, त्यांना समजून घेण्यात कमी पडतो आणि दुसऱ्यांच्या भावनांच्या बाबतीत तर खूपच गोंधळ घालतो. नवं संशोधन मानतं- भावनिक साक्षरता मानसिक स्वास्थ्य आणि मानसशास्त्रीय लवचिकतेसाठी फार महत्वाची असते.

ब्रॅकेट म्हणतो- भावनिकदृष्ट्या साक्षर मंडळी ताण-तणाव हाताळण्यास, परस्परांमधील मतभेद हाताळण्यास आणि सकारात्मक नाती राखण्यास अधिक सक्षम असतात आणि तेच तर मनःशांतीचे स्तंभ असतात. याव्यतिरिक्त भावनिक दृष्ट्या साक्षर असलेली मंडळी मदत मागण्यात संकोचत नाही, की मदत करण्यात हात आखडता घेत नाही. त्यांना हरतऱ्हेच्या प्रसंगांशी सामावून घेता येते. त्यामुळे मानसिक व्याधी त्यांच्यापासून दूर राहतात. भावनांची मशागत वेगवेगळ्या संस्थांमध्ये समानुभूतीचे व सौहार्दाचे वातावरण निर्माण करते. झ्यसबर्ग आणि स्चवाबस्कीय यांना २०२० साली केलेल्या संशोधनात असे आढळले की संस्थेत कामाचे साफल्य वाढते, हतोत्साहता कमी होते आणि संघकार्य सुधारते.

शिक्षणसंस्थांमध्ये जर विद्यार्थ्यांना भावनांची हाताळणी शिकवली तर त्यांचे शैक्षणिक कर्तृत्व बहरते, वर्तनविषयक तक्रारी कमी होतात आणि समाजामधील देवाण घेवाण वाढते. हे नाझींलेस्की यांना २०१३ साली दिसून आले.

या सगळ्या अनुमानांवरून स्पष्ट होते की भावनिक स्वायत्तता हा प्रशिक्षणाचा महत्वाचा विषय झालेला आहे- मानसिक स्वास्थ्य हा विषय आता शैक्षणिक अभ्यासक्रमात समाविष्ट करणे गरजेचे आहे. या कौशल्यांचा विकास नव्या समुदायांसाठी करुणा, कणखरपणा आणि स्थितिस्थापकत्व हे गुण बिंबविण्यासाठी आवश्यक आहे.

### भावनिक मशागत आणि स्वमग्नता (ऑटीझम)

स्वमग्नतेचा विकार असणाऱ्यांसाठी भावनिक सक्षमता अधिक क्लिष्ट असते. अशा व्यक्तींना समाजात सहजी मिसळता येत नाही आणि म्हणूनच त्यांच्या जीवनाची गुणवत्ता कायम प्रश्नांकित असते. त्यांना सामाजिक प्रज्ञा शिकविणे गरजेचे असते. स्वमग्नता असणाऱ्या व्यक्तींना स्वतःच्या आणि इतरेजनांच्या भावना समजून घेणे जड जाते.

२०१४ साली माझेफ्स्कय आणि व्हाईट यांना त्यांच्या संशोधनादरम्यान असं आढळून आलं. स्वमग्नता असणाऱ्या व्यक्तींची भावनिक जागरूकता कमी असते आणि म्हणूनच भावनांचे नियमन करण्यात खूप अडचणी असतात. सहजी ते खिन्न मनस्कता, वैफल्य, चिंताग्रस्तता अशा वर्तनविषयक विकारांना बळी पडू शकतात.

त्यांना नाती जोडताना, सांभाळताना त्रास होतो, सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होताना अवघडलेपण जाणवते इतकेच काय तर रोजचे दिनक्रम पार पाडताना झगडावे लागते. अर्थात स्वमग्नतेचा विकार असणाऱ्यांची भावनिक साक्षरता सुधारू शकते.

लर्नर यांनी २०१२ साली सिद्ध केले. भावनांवर आधारलेले कौशल्य विकसनाचे प्रशिक्षण दिले तर स्वमग्न व्यक्तीच्या सामाजिक क्षमतांमध्ये सुधारणा होते. अशा प्रशिक्षणामध्ये भावना-परिचय, बाजू घेणे म्हणजे काय, जुळवून घेण्याचे मार्ग असे विषय समाविष्ट असतात त्यामुळे सामाजिक वर्तुळातील त्यांची स्वीकारार्हता वाढते.

### भावनिक साक्षरता आणि मनःस्वास्थ्य

मानसशास्त्राच्या अखत्यारीतील निराशा कमी करणे आणि जीवनातील सौख्य वाढविणे यासाठी भावनांवर हुकूमत गरजेची असते. मग तणावांचे सुनियोजित व्यवस्थापन शक्य होते, वैफल्याची पातळी कमी होते आणि खिन्नमनस्कता उणावते. अवघड भावनांशी दोन हात करायचे असतील आणि इतरही दैनंदिन आव्हानांचा सामना करायचा असेल तर भावनांच्या बाबतीत निरक्षर राहून चालत नाही.

भावनांची हाताळणी जमली तर मनःस्वास्थ्याची समस्या चांगल्या प्रकारे हाताळता येते आणि उपचारांवर लक्ष ठेवता येते.

चार मार्गांनी हे साध्य करता येते. या हत्यारांचा वापर भावनिक प्रज्ञा मोजण्यासाठीही होऊ शकतो.

### (१) भावनिक बुध्यांक

एका सम्यक चौकटीत स्वतःबद्दलचे आकलन, स्वतःचे व्यक्त होणे, परस्पर संबंध, निर्णयक्षमता आणि तणाव-व्यवस्थापन सारं मोजता येतं. याचा अहवाल मानवातील भावनिक आणि सामाजिक कौशल्यांवर प्रकाश टाकतो आणि माणूस कसा व्यक्त होतो, भावनांशी संबंधित माहिती कशी प्रभावीपणे आणि अर्थपूर्णरीत्या उपयोगात आणतो इथे पाहायला मिळते.

### (२) मेयर- स्लोवेय- कॅरूसो यांची भावनिक बुध्यांक चाचणी

मेयर यांनी २००२ साली मानवी भावनांवर आधारित संशोधन करून एक सिद्धांत मांडला. येल आणि न्यू हॅम्पशायर विद्यापीठांनी एकत्र येऊन ही चाचणी विकसित केली. वस्तुनिष्ठ आणि वैयक्तिक प्रश्नांच्या आधारे मानवाची भावनांचे आकलन, वापर, समज आणि नियमन याबाबत तपासणी केली जाते. रोजच्या आयुष्यातील घटनांच्या आधारे माणसं दिलेल्या जबाबदाऱ्या कशा पार पाडतात, भावनांशी संबंधित समस्या कशा सोडवितात तेही कोणतीही मोजपट्टी न देता /वापरता. अनेक मनोरंजक, कलात्मक आणि सर्जनशील उपक्रमांमधून भावनांची तोंडओळख व तपासणी केली जाते.

अर्थात येथे फसवे प्रतिसाद नोंदविले जाण्याची शक्यता गृहीत धरावी लागते, तरीही व्यवसायांमध्ये, शैक्षणिक संस्थांमध्ये, संशोधनात या चाचणीचा वापर केला जातो.

ही चाचणी स्वतः सोडविण्याच्या प्रश्नांवर (डू-इट- यूवरसेल्फ) आधारित असते आणि सर्वसाधारण ३० ते ४५ मिनिटांमध्ये संपते. आजकाल ही चाचणी ऑनलाईन पद्धतीनेही देता येते.

### (३) गुणवैशिष्ट्यांवर आधारित प्रश्नावली-

स्व-मदतीसाठी आपल्यातील स्वभाववैशिष्ट्ये आधी ओळखता आली पाहिजेत. पेट्रिडेस आणि फर्नहॅम यांच्या २००१ सालच्या संशोधनाचे हे फलित आहे, आणि तिचा उपयोग वैश्विक पातळीवर संभवतो. या प्रश्नावलीत मानवी भरभराट, स्व-नियमन, भावुकता, मनमिळाऊपणा, जनसंपर्क असे अनेक कप्पे तपासले जातात आणि त्या व्यक्तीच्या भावनांचे कार्य समजू शकते.

चाचणीचे निकष सर्वसामान्य व्यक्तींना लागू असल्याने त्यात बरोबर किंवा चूक नसते. फक्त तत्कालीन विचारांचा आणि वर्तनाचा संक्षिप्तपणे टिपला असतो आणि तो इतरांच्या मापदंडांशी ताडून बघितला जातो. प्रत्येक अहवाल असाधारण असतो आणि त्यांतून शक्तिस्थाने, आव्हाने प्रतिबिंबित होतात. मिळालेले गुणांक या चाचणीच्या सैद्धांतिक चौकटीशी मिळते जुळते आहेत की नाही, एवढेच तपासले जाते.

### (४) स्व-तपासणीसाठी चाचणी-

वेगवेगळ्या भावनिक क्षमतांच्या चाचपणीसाठी १९९८ साली विकसित झालेली ही चाचणी खूप लोकप्रिय आहे.

तेहतीस विधानांच्या मदतीने एक स्वतःबद्दलचा अहवाल तयार करण्यासाठी येथे एक मोजपट्टी वापरली जाते.

येथे १= ठामपणे सहमत आणि ५= पूर्णतया असहमत असा येथे अर्थ अभिप्रेत आहे. सर्व तेहतीस विधानांना दिलेल्या गुणांची बेरीज करून खालील मतितार्थ काढता येतो.

सामान्यतः १२४ हा सरासरी गुणांक आहे. त्यानुसार १११ पेक्षा कमी आणि १३७ पेक्षा जास्त अपवादात्मक मानले जातात. या चाचणीत स्त्रियांची सरासरी १३१ आढळली आहे तर पुरुषांची १२५!

### चाचणी

(१) स्वतःच्या समस्यांबद्दल इतरांशी केव्हा बोलायचे, हे मला माहित आहे.

(२) अडचणी आल्या की अशाच अडचणी पूर्वी कधी आल्या होत्या आणि मी त्यावर कशी मात केली होती, हे मला आठवते.

(३) बऱ्याच बाबतीत मी चांगले कर्तृत्व दाखवू शकतो, अशी मला अपेक्षा असते

(४) माझ्यावर विश्वास ठेवणे बऱ्याच लोकांना सहज जमते.

(५) इतरांची देहबोली माझ्या पटकन लक्षात येत नाही.

(६) आयुष्यातील काही घटनांनी मला काय महत्वाचे आणि काय नाही याचे पुनर्मूल्यांकन करायला शिकवले आहे.

(७) मूडनुसार मला नव्या शक्यता दिसू लागतात.

(८) भावनांमुळे मला जीवन जगण्यासारखे भासते.

(९) भावना अनुभवताना मला त्या जाणवतात.

(१०) आयुष्यात काही चांगले होत असते यावर माझा विश्वास आहे.

(११) मला काय वाटत असते, ते इतरांना सांगायला मला आवडते.

(१२) काही सुखद अनुभव आले की त्यांची अनुभूती दीर्घकाळ कशी टिकवायची हे मला माहित आहे.

(१३) मी आयोजित केलेले उपक्रम सगळ्यांना आवडतात.

(१४) मला खुश करतील असे उपक्रम मी शोधत असतो.

(१५) माझी देहबोली इतरांना समजेल अशी सोप्पी असते.

(१६) माझे इतरांवर इंप्रेशन नेहमीच चांगले पडते.

(१७) मूड चांगला असला कि समस्या चुटकीसरशी सुटतात.

(१८) इतरांच्या चेहेऱ्यावरील हावभावांवरून लोकांच्या मनात काय चाललंय याचा मला थांगपत्ता लागतो.

(१९) माझ्या भावना बदलायला काय परिस्थिती कारणीभूत असते, हे मला ठाऊक आहे.

(२०) मन प्रसन्न असले की मला नवनवीन कल्पना सुचतात.

(२१) स्वतःच्या भावनांवर मला नियंत्रण ठेवता येते.

(२२) मला स्वतःच्या भावना ओळखता येतात.

(२३) हाती घेतलेल्या कामाचे चांगलेच फळ मिळेल अशी सूचना मी स्वतःला देत असतो.

(२४) कोणाच्याही हातून चांगले काम झाले कि मी त्यांची पाठ थोपटतो.

(२५) मला इतरांची देहबोली ओळखता येते.

(२६) स्वतःच्या आयुष्यातील महत्वाची घटना मला कोणी सांगत असेल तर असंच केव्हातरी आपल्याही आयुष्यात झालं होतं असं मला वाटतं.

(२७) भावना बदलताहेत असं जाणवलं कि माझ्या मनात नवे विचार येतात.

(२८) आव्हान समोर आलं की, मला वाटतं मला झेपणार नाही, म्हणून मी प्रयत्न सोडून देतो.

(२९) माझ्याकडे बघून लोकांच्या मनात काय येत असेल याची मला कल्पना आहे.

(३०) एखाद्याच्या पडत्या काळात मी मदत केली की त्या व्यक्तीला बरं वाटतं.

(३१) अडचणींच्या काळात मी स्वतःचा मूड आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करतो.

(३२) माणसांचे आवाज (बोलण्यातील चढउतार) कानी पडल्यावर मी त्यांना काय वाटत असेल याची कल्पना करू शकतो.

(३३) माणसांच्या संवेदना समजून घेताना अडचण होते.

**सूचना-** वरीलपैकी विधान क्रमांक ५, २८ आणि ३३ ला गुणांक देताना मोजपट्टी उलटी आहे, हे ध्यानी ठेवावे.

सर्व विधानांना गुण दिले की त्या गुणांची बेरीज करावी. वाढत्या वयानुसार मानवी भावनांचा विकास कसा होत जातो, याबद्दल पुढील लेखात...

---

परराष्ट्रकारण
प्रतिनिधी

# अमेरिकेची वाटचाल वेगाने यादवी युद्धाकडे?



**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सध्या देशाबाहेर आणि देशांतर्गत आव्हानांना तोंड देत आहेत. अमेरिकेमध्ये स्थलांतरितांचा मुद्दा ऐरणीवर आला असून, डेमोक्रॅटिक पक्षाची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये ट्रम्प सरकारविरोधात हिंसक आंदोलन जोरावर आहे. हे आंदोलन पसरण्याची भीतीमुळे, अमेरिका यादवीच्या उंबरठ्यावर असल्याची चर्चा आहे. अमेरिकेतील परिस्थितीचा घेतलेला आढावा...**

अमेरिकेतील विविध राज्यांमध्ये चाललेल्या घटना बघता, तेथील दोन राजकीय पक्षांच्या दोन भिन्न विचारधारेमुळे अमेरिकेची वाटचाल वेगाने यादवीकडे चालू झाल्याचे म्हटल्यास, वावगे ठरणार नाही. डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकेचे सध्याचे राष्ट्राध्यक्ष असून, ते रिपब्लिकन पक्षाचे प्रतिनिधित्व करतात. अमेरिकेतील काही राज्यांमध्ये विरोधी पक्ष असणार्या डेमोक्रॅटिक पक्षाची सत्ता आहे. परराष्ट्र धोरण, चलन, संरक्षण याची जबाबदारी अमेरिकेतील केंद्र सरकारची असते. कॅलिफोर्निया, न्यूयॉर्कप्रमाणे सुमारे दहा राज्यांमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाची सत्ता आहे.

डेमोक्रॅटिक पक्षाच्या धोरणानुसार, अमेरिकेतील अवैध स्थलांतरितांना नुसता आश्रयच नव्हे, तर संपूर्ण सुखसोयी पुरवल्या पाहिजेत. पण, या स्थलांतरितांना अमेरिकेत प्रवेश देताना त्या स्थलांतरितांचा अमेरिकेला काय उपयोग होईल याचा विचार न करता, त्यांना सरसकट प्रवेश देण्यामुळे हे स्थलांतरित अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवरील बोजा बनले आहेत. फुकट राहणे, दुकानांमध्ये लुटालूट करणे, सार्वजनिक ठिकाणी सामान्य लोकांना त्रास देणे, परिसर घाण करणे, ही या स्थलांतरितांची वैशिष्ट्ये. या स्थलांतरितांनी अमेरिकेत सध्या धुमाकूळ घातला आहे. या अवैधपणे अमेरिकेत घुसलेल्या स्थलांतरितांना अमेरिकेबाहेर काढण्यासाठी, डोनाल्ड ट्रम्प यांचा रिपब्लिकन पक्ष प्रयत्नशील आहे. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाचे प्रतिनिधित्व करणार्या राज्यांमध्ये, या स्थलांतरितांना शोधून अमेरिकेबाहेर हाकलण्याचे काम चालू आहे. या कामामध्ये डेमोक्रॅटिक पक्षाच्या राज्यांकडून जोरदार विरोध होतो आहे. या राज्यांमध्ये सामान्य मतदार आणि हे स्थलांतरित मोठ्या संख्येने मोर्चे काढताना दिसत आहेत. कॅलिफोर्निया अंतर्गत येणार्या लॉस एंजेलिस शहरात, गेल्या आठवड्यात मोठा मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चाचे लोण आता इतर शहरांतही पसरताना दिसत असून, ते त्याची तीव्रता वाढण्याची लक्षणे आहेत. सध्यातरी हे मोर्चे विशेषतः डेमोक्रॅटिक पक्षाच्या राज्यांमध्येच पसरत आहेत.

कॅलिफोर्निया शतकापूर्वी मेसिको देशाचा भूभाग होता, जो अमेरिकेने मेसिकोकडून खरेदी केला. याच कॅलिफोर्नियामधून अमेरिकेतून फुटण्याच्या घोषणा ऐकू येत आहेत. डेमोक्रॅटिक पक्षाच्या वर्चस्वाखालील इतर राज्यांमध्येही असेच फुटीरतेचे ध्वनी पुढील काळात एकू येण्याची शक्यता आहे. कॅलिफोर्नियाकडे स्वतःचे पोलीसदल असतानाही, लॉस एंजेलिसमध्ये उसळलेल्या दंगली काबूत आणण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांनी फेडरल सरकारचे नॅशनल गार्डस लॉस एंजेलिसमध्ये पाठविले. त्यामुळे राज्य सरकार आणि फेडरल सरकारमध्ये मतभेद निर्माण झाल्याच्या बातम्या आल्या होत्या. या दंगली पूर्वनियोजित असाव्यात, ज्याला ट्रम्पविरोधी मार्सवादी लोकांचा पाठिंबा होता, हे पुढे आले.

डेमोक्रॅटिक पक्षाचा बालेकिल्ला असणाऱ्या कॅलिफोर्नियासारख्या राज्यामध्ये, तेथील दुकानांमध्ये चोऱ्यामाऱ्या करणाऱ्यांना 'व्यवस्थेचे बळी' संबोधून, त्यांच्यावर पोलिसांनी कोणतीही कारवाई करू नये, असा कायदाच संमत करण्यात आला. कायद्याचे राज्य या व्यवस्थेला सुरुंग लावणार्या आणि अराजकता पसरवणाऱ्या या कृती होत्या. यालाच 'वोकिझम' असे गोंडस नावही देण्यात आले. समलैंगिकांना, लिंग बदल करू इच्छिणार्यांना प्रोत्साहन, हे सर्व 'वोकिझम'च्या अंतर्गतच येते. अमेरिकेची वाटचाल सध्या मुक्त अर्थव्यवस्थेकडून संरक्षित बाजारपेठेकडे चालू झाली आहे. ट्रम्प सरकार उलथवून लावण्यासाठी सुरु असलेले आंदोलन ही डावी मंडळी, अमेरिकेतील सर्व राज्यांमध्ये घेऊन जाऊ इच्छितात. त्यातच ट्रम्प यांचे पाठीराखे, ट्रम्प यांनी अमेरिकेला इस्रायल-इराण युद्धात ओढल्यामुळे नाराज आहेत. त्यामुळे ट्रम्प यांच्यावरील ही नाराजी कोणत्या थरापर्यंत जाऊ शकेल, याचा अंदाज बांधणे कठीण आहे. त्यातच अमेरिकेतील महागाईने उच्चांक गाठला असून, सर्वसामान्य मतदाता ट्रम्प सरकारवर नाराज आहे. घर विकत घेणे ही अमेरिकेतील सर्वसामान्य लोकांसाठी अशय गोष्ट झाली आहे. अमेरिकेचे जगन्मान्य चलन अमेरिकन डॉलर हे गटांगळ्या खात असून, फेडरल बँकेने 'क्रिप्टो' चलनाला घर खरेदीसाठी स्वीकारण्याचे जाहीर केले आहे.

'मार्सवादी विचारधारेशी संलग्न असणाऱ्या लोकांच्या संपत्तीचे समान वाटप' अशा सामान्य लोकांना आकर्षित करणाऱ्या घोषणांची, अमेरिकेतील दंगलींमध्ये चलती आहे. 'टेक्सास'च्या मेयरपदासाठी निवडणूक लढविणारे डेमोक्रॅटिक पक्षाचे उमेदवार झोहरान ममदानी यांनी निवडणुकीची प्राथमिक फेरी जिंकली असली, तरी त्यांच्या भाषणामध्ये या 'संपत्तीचे समान वाटप' या घोषणेचा वारंवार उल्लेख होताना दिसत आहे. 'टेक्सास'चे इस्लामीकरण आणि तेथे अराजकतेचे पर्व सुरू होण्याची ही चिन्हे आहेत. कम्युनिस्ट राजवटीत सर्वसामान्य नागरिकांचे जीवन किती असुरक्षित आणि हलाखीचे असते, याची अमेरिकन युवा मतदाराला कल्पना नाही. गेली अनेक दशके अमेरिकेच्या मतदारांनी संरक्षित अर्थव्यवस्थेच्या वातावरणात व्यतीत केलेली आहेत. त्यामुळे त्यांना भविष्यातील धोके दिसत नाहीत. अमेरिकेला भांडवलशाही देश म्हणून हिणवले गेले असले, तरी अमेरिकेची वाटचाल ही मार्सवादाकडे होते आहे. अमेरिका आणि पाश्चात्य देशांनी इतकी वर्षे भांडवलशाहीचे फायदे उचलून समृद्धी, सुबत्ता, स्वातंत्र्य अनुभवले. सर्वसामान्य लोकांच्या जीवनाचा स्तर उंचावतच गेला पण, अमेरिकन डॉलर आणि युरोपातील इतर चलनांची अधोगतीकडे सुरु असलेली वाटचाल बघता, लोकांमधील असंतोषाला वाट करून देण्यासाठी कम्युनिस्टांनीच पाश्चात्य सभ्यतेचा विध्वंस घडवण्याची योजना बनविली आहे, अशी शंका घेण्यास वाव आहे.जे अमेरिकेत घडेल, त्याचे वारे इतर देशात पसरण्याची शयता आहे. अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक हरल्यामुळे, पुढील चार वर्षे डेमोक्रॅटिक पक्षाला त्यांचा अजेंडा अमेरिकेत राबविता येणार नाही, हे स्पष्ट आहे. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांना सुरळीतपणे कारभार करता येऊ नये, म्हणून डेमोक्रॅटिक पक्षाने या हालचाली चालविल्या आहेत. अमेरिकेत भविष्यात घडू शकणार्या घटनांवर चित्रपट बनविले जातात. कोरोना विषाणूच्या साथीमुळे होणारे हाहाकार दर्शविणारा 'कॉन्टेजियन' नावाचा चित्रपट २०११ साली आला होता. या चित्रपटाचा दिग्दर्शक होता स्टीवन सोडरबर्ग. याचप्रमाणे येत्या काळात अमेरिकेत पसरू शकणाऱ्या 'यादवीची' कथा सांगणारा चित्रपट 'सिव्हिल वॉर' २०२४ साली येऊन गेला. या चित्रपटाचा दिग्दर्शक आहे अलेस गारलॅण्ड. या योगायोगाच्या गोष्टी नाहीत. येऊ शकणार्या 'यादवीची' पटकथा यापूर्वीच लिहिली गेली आहे. अमेरिकेत कुटुंबव्यवस्था फार पूर्वीच उद्ध्वस्त झाली आहे. त्यामुळेच तेथील नागरिक आणि विशेषतः युवा वर्गामध्ये तुटलेपणाची आणि निराशेची भावना आहे. या भावनेलाच फुंकर मारण्याचे काम डावे आणि पुरोगामी डेमोक्रॅटिक पक्षाच्या पुढार्यांकडून होताना दिसते. अमेरिकेचे एकेकाळचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी अमेरिकेतील संसदेसमोर भाषण करताना, 'माय फेलो इमिग्रण्टस' (माझे स्थलांतरित सहकारी) असा उल्लेख केला होता. कारण, अमेरिका हा विविध देशांमधून आलेल्या, विविध धर्मांच्या, विविध वंशांच्या, विविध भाषा बोलणाऱ्या लोकांनी बनलेला आहे. त्यामुळे स्वतःच्या उत्थानासाठी अमेरिकेत आलेल्या लोकांचा समूह असे म्हणता येते. अमेरिकेत आतापर्यंत कॅथलिक, ॲंग्लो सॅसन प्रोटेस्टंट्स लोकांचा वरचष्मा होता पण, आता इस्लामिक देशांमधून आलेल्या स्थलांतरितांमुळे, अमेरिकेची ही जुनी ओळख पण पुसली जाताना दिसत आहे.

लॅटिन अमेरिकेतील मेसिको, कोलंबिया, व्हेनेझुएला यांसारख्या इतर देशांमधूनही बहुसंख्य स्थलांतरित अमेरिकेत आले आहेत. त्यांच्यासाठी त्यांचा चरितार्थ महत्त्वाचा असून, देशप्रेम वगैरे त्यांच्यासाठी दुय्यम आहे. त्यामुळे अमेरिकेत सध्या डाव्या, पुरोगामी लोकांचीच चलती आहे. त्यामुळे ट्रम्प यांना हुकूमशहा ठरवून, त्यांना अगदी जीवे मारण्यापर्यंतच्या वल्गना की धमया, या अवैध स्थलांतरितांकडून दिल्या जातात. त्यामुळे अमेरिकेत रस्त्यावर उतरून, ट्रम्प यांचे सरकार अस्थिर करण्याचे प्रयत्न चालू आहेत. कॅलिफोर्नियाचे गव्हर्नर गेविन न्यूसम आणि लॉस एंजेल्सच्या महापौर करेन बस यांचा या रस्त्यावर उतरलेल्या आंदोलकांना पाठिंबा आहे. थोडयात फेडरल सरकारविरोधात राज्य सरकार उभे राहिलेले दिसते आहे.

अमेरिकेतील न्यायव्यवस्थेमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाच्या सरकारच्या काळात मोठ्या प्रमाणात, न्यायाधीशांची भरती करण्यात आली होती. डेमोक्रॅटिक पक्षाबद्दल सहानभूती असणाऱ्या न्यायाधीशांची अमेरिकेत गर्दी आहे. त्यामुळे ट्रम्प यांच्या प्रत्येक निर्णयाला, न्यायपालिकांच्या सर्व स्तरांवर विरोध होताना दिसतो. याचाही मोठा फटका ट्रम्प सरकारला बसतो आहे. ट्रम्प हे सध्या अमेरिकेतील नागरिक आणि अमेरिकेबाहेरील देशांबरोबर संघर्ष करताना दिसत आहेत. अमेरिकेची शिक्षण व्यवस्थाच धोयात आलेली आहे. एलॉन मास्क हे चार वर्षे विद्यापीठात शिकून मिळालेली पदवी बिनकामाची आहे, असे जाहीरपणे बोलतात. कौशल्य आधारित लोकांनाच यापुढे कामे मिळतील, असेही मस्क सांगतात.

अमेरिकेत येऊ शकणारे हे 'यादवीचे' वादळ कोणत्या स्वरूपात येते आणि त्याचा मुकाबला डोनाल्ड ट्रम्प यांचे सरकार कसे करतात, याकडे जगाचे लक्ष असेल.

वेध

**प्रा. डॉ. गणपती यादव**

# विकसित भारताचे ध्येय

## मुख्य अभियांत्रिकी व विज्ञान शाखांमध्ये शक्य आहे का?



**आयआयटी मुंबईला पहिल्या १०० जेईई टॉपरपैकी ७१ विद्यार्थ्यांनी पसंती दिली, तर आयआयटी मद्रासने पालक आणि प्रवेशार्थींना मोफत विमान प्रवासाची सोय करून आकर्षित केले. इतर काही आयआयटींनीही जेईई मधील टॉपर विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी विविध सवलती जाहीर केल्या आहेत. या बातम्यांकडे बारकाईने पाहिल्यास लक्षात येते की, हा दृष्टिकोन 'विकसित भारत-२०४७' या दीर्घकालीन राष्ट्रीय स्वप्नासाठी पोषक नाही. मग उर्वरित हजारो अभियांत्रिकी व विज्ञान संस्थांनी काय करायचे? दुसरी चिंताजनक बाब म्हणजे आजच्या बहुतांश जेईई ॲडव्हान्स टॉपर विद्यार्थ्यांचा कल कॉम्प्युटर सायन्स या शाखेकडे असतो.**

बहुतेक विद्यार्थी आयआयटीमधून पदवी घेतल्यानंतर उद्योगजगतात प्रवेश न करता थेट व्यवस्थापन शिक्षण घेणे हीच यशस्वी कारकीर्द समजतात. आयआयटी पदवीधरांचा उत्पादन, संशोधन किंवा तंत्रज्ञान क्षेत्राला प्रत्यक्ष उपयोग किती होतो? प्रश्न असा उभा राहतो, आपल्या उद्योगांची पाठराखण कोण करतो, ती चालवतो आणि उभारतो कोण? कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयाला समाजात खूप महत्त्व दिल्यामुळे असा गैरसमज पसरतो आहे की, सीएसई शिवाय इतर सर्व अभियांत्रिकी पदव्या निरुपयोगी आहेत.

भारताने २०४७ पर्यंत ३० अब्ज अर्थव्यवस्था होण्याचे ध्येय निश्चित केले आहे. भारताची लोकसंख्या सुमारे १६७ कोटी असेल. राहणीमान उच्च दर्जाचे, जीवनमान समृद्ध आणि आर्थिक भरभराटीचे असेल. दरडोई उत्पादन ३० हजारांपर्यंत पोहोचेल. त्यावेळी स्वच्छ ऊर्जा, स्मार्ट आणि कमी घनतेची, परंतु अत्यंत मजबूत फंक्शनल मटेरियल्स तसेच पर्यावरण संरक्षण हे अत्यंत महत्त्वाचे विषय असतील.

इलेक्ट्रॉनिक्स जगावर राज्य करेल. ६जी, ७जी, आणि इंडस्ट्री ६.० च्या माध्यमातून सायबर आणि फिजिकल सिस्टिम्सचे एकत्रीकरण होईल. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) सर्व क्षेत्रांत उपयोगात येईल, पण काही मूलभूत प्रश्न राहतीलच. काही दिवसांपूर्वी आपली अर्थव्यवस्था ४ अब्ज डॉलरची झाली. आता ३० अब्ज डॉलरचं उद्दिष्ट गाठण्यासाठी ७० टक्के ग्रॉस एनरोलमेंट रेशो (जीईआर) आवश्यक आहे. उत्पादनवाढ ही एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या २५ टक्क्यांपर्यंत पोहोचवणं आवश्यक आहे. सेवा क्षेत्रातून ७० टक्के जीडीपी मिळणं अपेक्षित आहे.

ऑटोमोबाईल क्षेत्रातून १० टक्के वाढ व्हायला हवी. ५०० अब्ज डॉलरचा फार्मास्युटिकल आणि बायोटेक उद्योग उभा राहायला हवा. कामगार सहभाग किमान ६५ टक्के असावा, त्यात ५० टक्के महिला सहभाग अनिवार्य आहे. व्यावसायिक व फिनटेक सेवांमध्ये जागतिक स्तरावर किमान १० टक्के हिस्सा मिळविणे गरजेचे आहे.

भारताला एक विकसित राष्ट्र बनवण्यासाठी उत्पादन, तंत्रज्ञान, ऊर्जा, पायाभूत सुविधा, मनुष्यबळ आणि व्यापार यासारख्या क्षेत्रां ध्ये महत्त्वपूर्ण आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. सध्या भारताचा उत्पादन क्षेत्र जीडीपीमध्ये फक्त १५-१७ टक्के योगदान देतो. औद्योगिक क्षमतेत वाढ करण्यासाठी 'मेक इन इंडिया'चा विस्तार, पीएलआय योजनांची बळकटी, उच्च तंत्रज्ञान क्षेत्रात घटक स्तरावरील उत्पादनाला प्रोत्साहन आणि लॉजिस्टिक्स व नियामक सुलभीकरण यावर धोरणात्मक भर दिला पाहिजे.

जीडीपीच्या किमान दोन टक्के आर अँड डी मध्ये गुंतवणूक, कृत्रिम बुद्धिमत्ता, जैवतंत्रज्ञान, क्वांटम आणि अवकाश तंत्रज्ञानातील डीप-टेक मिशन स्थापन करणे आणि खाजगी-सार्वजनिक नवोन्मेष केंद्रांची निर्मिती करून आयपी निर्माणास चालना देणे आवश्यक आहे. हरित ऊर्जा संक्रमणदेखील अत्यंत महत्त्वाचे आहे, ज्यासाठी जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी करणे, ग्रीन हायड्रोजन व बॅटरी पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे आणि राष्ट्रीय ग्रीडचे आधुनिकीकरण आवश्यक आहे.

या दृष्टिकोनाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी सर्व अभियांत्रिकी शाखा आणि मूलभूत विज्ञान शाखांची एकत्रित भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. यांत्रिकी, विद्युत, नागरी, रासायनिक आणि इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी या क्षेत्रांचा वापर स्मार्ट पायाभूत सुविधा, स्वयंचलित यंत्रणा, प्रक्रियात्मक उद्योग आणि स्वच्छ ऊर्जा उपाय विकसित करण्यासाठी केला जाईल. रोबोटिक्स, मटेरियल सायन्स आणि बायो मेडिकल अभियांत्रिकीसारख्या उदयोन्मुख अंतःशाखीय क्षेत्रांना चालना देणे आवश्यक आहे; जेणेकरून उत्पादन, आरोग्यसेवा आणि शाश्वततेसाठी नवोन्मेष शक्य होईल. त्याचबरोबर भौतिकशास्त्र, (रसायनशास्त्र, गणित आणि जीवशास्त्र या मूलभूत विज्ञान शाखांतील प्रगतीमुळे सेमिकंडक्टर, जैवतंत्रज्ञान, अवकाश संशोधन आणि क्वांटम संगणन यामध्ये मोठे तंत्रज्ञानविषयक प्रगती साध्य होईल.

भविष्यातील युद्धांमध्ये ड्रोन, प्रगत क्षेपणास्त्रे, बायोसेंसर, उपग्रह प्रणाली, जैवसुसंगत आणि उच्च कार्यक्षम साहित्य तसेच हवामान-प्रतिरोधक पायाभूत सुविधा यांचा वापर मोठ्या प्रमाणावर होणार आहे.

गरिबी आणि उपासमार दूर करण्यासाठी पोषणक्षम पिकांचे उत्पादन, स्मार्ट शेती आणि तांत्रिक नवकल्पनांची अं लबजावणी अत्यंत गरजेची आहे. या सगळ्यांसाठी खालील शाखांमध्ये क्रांतिकारी संशोधन आणि विकास आवश्यक आहे.

यांत्रिकी अभियांत्रिकी, रसायन अभियांत्रिकी, इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी, सिव्हिल व स्ट्रक्चरल अभियांत्रिकी, एअरोस्पेस अभियांत्रिकी, मटेरियल सायन्सआणि अभियांत्रिकी, जैवतंत्रज्ञान, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, पर्यावरणशास्त्र, हवामानशास्त्र, अन्नतंत्रज्ञान, कार्यक्षम अन्न आणि न्युट्रास्युटिकल्स, लघु-तंत्रज्ञ या क्षेत्रांमध्ये सक्षम मनुष्यबळ, संशोधनासाठी गुंतवणूक आणि धोरणात्मक पाठबळ देणे हे 'विकसित भारत' घडवण्यासाठी अत्यावश्यक आहे.

माझ्या मते सेमेस्टर ही संकल्पना आता कालबाह्य झाली आहे. त्याऐवजी ट्रायमेस्टर प्रणाली स्वीकारल्यास प्रात्यक्षिक शिक्षण, उद्योगाभिमुखता, आर्थिक सहाय्य आणि द्वैतीय पदवी मिळविण्याच्या संधी उपलब्ध होतील. विद्यार्थी एखाद्या विषयात मेजर घेऊन, त्यासोबत एआय, बिझनेस, आर्ट्स अशा विविध क्षेत्रां ध्ये मायनर करून आंतरशाखीय कौशल्ये आत्मसात करू शकतात. ही प्रणाली सर्वच शाखांमध्ये अंमलात आणता येईल.

१ वर्ष प्रमाणपत्र, २ वर्षे डिप्लोमा, ३ वर्षे बॅचलर, ४ वर्षे ऑनर्स, ५ वर्षे मास्टर्स. शिक्षकांना दरवर्षी एक ट्रायमेस्टर उद्योगअध्यय नासाठी उपलब्ध करून दिला जावा. जे पीएच.डी.धारक नाहीत त्यांनी पर्यायी ट्रायमेस्टरमध्ये आपला पीएच.डी. अभ्यास सुरू ठेवावा. यामुळे शिक्षणात संशोधनाभिमुखता वाढेल आणि उद्योग-शिक्षण यामधील दरी भरून निघेल. प्रत्येक शाखेतील नामवंत माजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन सत्रांसाठी आमंत्रित करावं.

या व्याख्यानांमध्ये संबंधित क्षेत्रातील बदल, आव्हानं, संधी आणि नवउद्योजकतेविषयी त्यांचं अनुभवाधारित ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणं महत्त्वाचं आहे. कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी फंड २ टक्क्यांवरून ३ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात यावा. त्यातील किमान १ टक्का निधी उच्च शिक्षणातील संशोधनासाठी वापरला जावा. हा निधी संशोधन सुविधा, फेलोशिप्स आणि आकस्मिक गरजांसाठी खर्च केला जावा.

उद्योग-शैक्षणिक संस्था सह-गुंतवणूक आणि बौद्धिक संपदा शेअरिंग हे अत्यावश्यक आहेत, जे संशोधन आणि नवप्रवर्तनाला चालना देतील.

स्टार्टअप्ससाठी इनोव्हेशन हब्स, इन्क्युबेशन सुविधा आणि ट्रायमेस्टर प्रणालीची अं लबजावणी आवश्यक आहे. एक संभाव्य उपाय म्हणजे पीएच.डी. विद्यार्थी अध्यापन सहायक म्हणून आणि उद्योग-इंटर्न्स म्हणून कार्यरत राहावेत. सध्याचे शिक्षक पर्यायी ट्रायमेस्टरमध्ये पीएच.डी.चा अभ्यास सुरू ठेवावा; जेणेकरून शिक्षकांचे शैक्षणिक स्तरही वृद्धिंगत होतील. सर्व संस्थांमध्ये पदवीपूर्व संशोधन ट्रायमेस्टर अनिवार्य केल्यास नवप्रवर्तन, रोजगार क्षमता आणि आंतरसंस्थात्मक सहकार्य वाढेल. सर्व अभ्यासक्रमांमध्ये नीतिशास्त्र, व्यावसायिकता, नैतिक मूल्ये आणि भारतीय ज्ञान प्रणाली यांचा समावेश करणे आवश्यक आहे. मुलींना पीएच.डी. पर्यंतचे शिक्षण मोफत आणि निर्बंधमुक्त मिळाले पाहिजे.

प्रत्येक मुलीला व्यावसायिक आणि उच्च शिक्षणाच्या संधी मिळाल्या पाहिजेत. यासाठी सार्वजनिक निधी, उद्योग-खाजगी क्षेत्राचे सहकार्य आणि सीएसआरचा योग्य वापर करता येईल. केंद्र व राज्य सरकारांनी ५०:५० टक्के निधी विभागणी करून ही योजना व्यवहार्य आणि क्रांतिकारी बनवू शकतात.

भारताला आर्थिक, सामाजिक आणि लोकसंख्यात्मक दृष्टिकोनातून आमूलाग्र लाभ देऊ शकते. शिक्षण हे केवळ काही उच्चपदस्थ नोकऱ्या मिळविण्यासाठी नसून देशाच्या एकूण उत्पादन क्षमतेत वाढ करणारा मुख्य पाया आहे. केवळ संगणक अभियांत्रिकी नव्हे, तर सर्व अभियांत्रिकी शाखा (जसे की यांत्रिकी, नागरी, रासायनिक, विद्युत, इलेक्ट्रॉनिक्स) तसेच मूलभूत विज्ञान आणि मानविकी शाखांचादेखील उद्योग, समाज आणि धोरणनिर्मितीमध्ये अत्यंत महत्त्वाचा सहभाग असणार आहे.

(लेखक हे एलआयटीयू नागपूरच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष आणि इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबई या संस्थेचे संस्थापक कुलगुरू आहेत.)

---

पर्यावरण

**मिलिंद बेंडाळे**

# कठोर पावले उचलण्याची गरज

**हवामान बदलामुळे निसर्ग आणि पृथ्वीवरील व्यवस्था बिघडत आहे. नजीकच्या भविष्यकाळात तीव्र हवामान बदलामुळे अधिक वादळे येतील. वेगाने होणाऱ्या गारपिटीसोबतच वीज कोसळण्याचे प्रमाणही वाढेल. हिमनद्या वेगाने वितळू लागतील. सर्व प्रकारच्या घटना अत्यंत टोकाच्या असतील. त्यात उष्णतेच्या लाटादेखील असतील. या पृष्ठभूमीवर जग वाचवण्यासाठी आता कठोर पावले उचलणे आवश्यक आहे.**



जगात हवामान बदलाची भाषा बदलली आहे. आता हवामान संकट निर्माण झाले असून यातून सुटणे अवघड आहे. १९०० नंतर औद्योगिकीकरण सुरू झाले. कोळसा, पेट्रोल आणि डिझेलचा वापर वाढला. त्यामुळे आसमंतामध्ये कार्बन डाय ऑक्साईड वाढला. औद्योगिक युगाच्या सुरुवातीपासून तापमानात १.३ अंश सेल्सिअसने वाढ झाली आहे. हवामान बदलामागे हे मुख्य कारण आहे. मानवी क्रियाकलापांमुळे आपल्या जागतिक हवामानात जलद बदल होत आहेत. वीज, उष्णता आणि वाहतुकीसाठी जीवाश्म इंधन जाळले जाते, तेव्हा कार्बन डाय ऑक्साईड, सौर किरणोत्सर्गाला अडकवणारा हरितगृह वायू आपल्या वातावरणात सोडला जातो.

गेल्या शतकात कार्बन डाय ऑक्साईड, मिथेन आणि इतर हरितगृह वायूंच्या उत्सर्जनात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे आपल्या ग्रहावरील तापमानामध्ये वाढ झाली आहे. जागतिक तापमानात होणारी ही वाढ हवामान आपत्तींना खतपाणी घालत आहे. आपण उपाययोजना न केल्यास या आपत्ती आणखी वाईट होतील. त्या टाळण्यासाठी, प्रदूषणात लक्षणीय घट करण्यासाठी आपल्याकडे वेळ कमी असल्याचा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. वादळे अधिक तीव्र होत आहेत. वादळ प्रणालींना समुद्राच्या उबदार पाण्यापासून ऊर्जा मिळते. जागतिक तापमान वाढत असताना चक्रीवादळे अधिक शक्तिशाली होत आहेत. कारण या वादळ प्रणालींना उष्ण समुद्राच्या पाण्यापासून ऊर्जा मिळते. सप्टेंबर २०२४ मध्ये हेलेन चक्रीवादळामुळे आग्नेय अमेरिकेत ऐतिहासिक पूर आला. त्यात किमान १२१ लोकांचा मृत्यू झाला आणि लाखो लोक विजेशिवाय राहिले.

शास्त्रज्ञांनी इशारा दिला आहे की, आपले हवामान जसजसे उष्ण होईल, तसतशी चक्रीवादळे केवळ जास्त शक्तिशाली होणार नाहीत, तर त्यांची तीव्रताही वेगाने वाढेल. पश्चिम अमेरिका आणि कॅनडामध्ये वणवे नेहमीच जीवनाचा एक नैसर्गिक भाग राहिले आहेत. तथापि, प्रदेश जसजसा उष्ण आणि कोरडा होत जातो, तसतसा वणव्यांचा आकार, भय आणि वेग वाढत जातो. वणव्यांमुळे होणारे धोकादायक वायू प्रदूषण आग लागलेल्या क्षेत्राच्या पलीकडे पसरू शकते. २०२३ च्या उन्हाळ्यात कॅनडामध्ये जळणाऱ्या सुमारे ९०० वणव्यांच्या धुरामुळे हवेच्या गुणवत्तेचे अलर्ट आले. त्यामुळे पूर्व अमेरिकेतील सात कोटींहून अधिक लोक प्रभावित झाले. अलिकडच्या वर्षांमध्ये कॅलिफोर्नियाला विनाशकारी आगी लागल्या. राज्यभरात विक्रमी कोरड्या, उष्ण हंगामी वाऱ्यामुळे लागणारे वणवे अभूतपूर्व वेगाने वाढले आणि पसरले आहेत. २०२० मध्ये कॅलिफोर्नियातील वणव्यांमुळे ४० लाख एकरपेक्षा जास्त जमीन जळून खाक झाली. २०२० हा राज्याच्या इतिहासातील सर्वात मोठा आगीचा हंगाम बनला. यावर्षी वणव्यांमुळे हजारो लोकांना स्थलांतर करावे लागले, अनेकांचे जीव गेले आणि घरे तसेच व्यवसाय उद्ध्वस्त झाले. उष्णतेच्या लाटा आरोग्यासाठी धोकादायक असतात आणि आपल्या ऊर्जा प्रणालीवर दबाव आणतात.

गेल्या जुलैमध्ये कॅलिफोर्नियामधील 'डेथ व्हॅली'मध्ये आतापर्यंतचे सर्वात उष्ण १३० फॅरनहाईट तापमानाची नोंद झाली. त्याच महिन्यात सरासरी जागतिक तापमान आतापर्यंतच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचले. या तापमानाने फक्त काही उष्ण दिवसांचा विक्रम मोडला नाही, तर हा एकंदरीत तापमानवाढीचा ट्रेंड दाखवला. गेल्या ५० वर्षांमध्ये अमेरिकेतल्या ऑस्टिनमध्ये १०० फॅरनहाईटपेक्षा जास्त तापमान असलेल्या दिवसांची संख्या एका महिन्याने वाढली तर ह्युस्टनमध्ये ९५ फॅरनहाईटपेक्षा जास्त तापमान असलेल्या दिवसांची संख्या एका महिन्याने वाढली. कॅलिफोर्नियामध्ये गेल्या शतकात तापमानात तीन फॅरनहाईटने वाढ झाल्याचा अंदाज आहे. 'युनियन ऑफ कन्सर्न्ड सायंटिस्ट्स'च्या मते, २१०० पर्यंत अमेरिकेच्या प्रत्येक भागात तापमान वाढेल आणि उष्णतेच्या लाटा अधिक वारंवार आणि तीव्र होतील. अतिउष्णतेमुळे एअर कंडिशनिंगची मागणी वाढते, कार्बन प्रदूषण वाढते आणि आपल्या ऊर्जा प्रणालीवर दबाव येतो. त्यामुळे ब्लॅकआऊट होऊन आरोग्याला गंभीर धोका निर्माण होतो. जागतिक तापमान वाढते तेव्हा जलस्रोतातून बाष्पीभवन होते. हवामान बदलामुळे अमेरिका आणि जगाच्या इतर भागात दुष्काळ अधिक तीव्र आणि दीर्घकालीन झाला आहे. खरे तर अमेरिकेचा पश्चिम भाग सध्या एका मोठ्या दुष्काळाच्या विळख्यात आहे, जो गेल्या १२०० वर्षांमधील सर्वात वाईट दुष्काळांपैकी एक आहे. या प्रदेशातील बहुतेक भाग सध्या 'अत्यंत' किंवा 'अपवादात्मक' दुष्काळी परिस्थिती अनुभवत आहे. गरम हवेमुळे बाष्पीभवन वाढते, म्हणजेच आपल्या

वातावरणातील पाण्याच्या बाष्पाचे प्रमाण वाढते. त्यामुळे वादळे येतात आणि त्यांचे रूपांतर पाऊस किंवा बर्फात होते. जागतिक तापमान वाढल्याने कोरडे प्रदेश जसे कोरडे होण्याची अपेक्षा आहे तसेच जगातील ऐतिहासिकदृष्ट्या मुसळधार पाऊस अनुभवणारे प्रदेश अधिक आर्द्र होतील. जुलै २०२३ मध्ये ईशान्य अमेरिकेतील मुसळधार पाऊस आणि अचानक आलेल्या पुरामुळे कोट्यवधी डॉलर्सचे नुकसान झाले. व्हरमाँटची राजधानी गुडघ्यापर्यंत पाण्यात बुडाली. अमेरिकेतील १.२६ कोटी मालमत्ता आता अतिवृष्टीच्या धोक्यात आल्या आहेत. वाढत्या तापमानामुळे जमिनीवरील हिमनद्या वितळत आहेत. त्यामुळे जगातील महासागरांमध्ये पाणी वाढत आहे. परिणामी गेल्या १५० वर्षांमध्ये जागतिक समुद्राची पातळी सरासरी आठ इंचांनी वाढली आहे. अमेरिकेचा अटलांटिक किनारा आणि मेक्सिकोच्या आखातात जगातील सर्वाधिक समुद्रपातळी वाढ होत आहे. त्यामुळे विक्रमी पावसासह विनाशकारी पूर येत आहे. हिवाळ्यातील वादळे अधिक प्राणघातक असतात. १ फेब्रुवारी २०२१ रोजी न्यू जर्सी येथे हिवाळ्यातील वादळामुळे दोन फुटांपेक्षा जास्त बर्फ पडला. यावेळी १२२ वर्षांचा बर्फवृष्टीचा विक्रम मोडला.

एकंदरीत हिवाळा सौम्य आणि कमी होत चालला आहे; पण अलिकडच्या हिवाळ्यात तीव्र हिमवृष्टी आणि विक्रमी थंडी आली आहे. हवामान बदलामुळे हिवाळ्यातील हवामान अधिक तीव्र होऊ शकते. वर्षाच्या उत्तरार्धात तापमानवाढीमुळे वातावरणात बाष्प अडकते. तापमान कमी झाल्यावर त्या पर्जन्याचे रूपांतर जोरदार हिमवर्षावात होते. 'अर्थजस्टिस' या संस्थेने अमेरिकेमध्ये दरवर्षी ६५ हजार मेगावॉटपेक्षा जास्त वीज निर्मिती करणारे कोळसा प्रकल्प बंद करायला भाग पाडले असून ८५०० मेगावॉटपेक्षा जास्त मिथेन वायूचे उत्पादन थांबवले आहे. या कामामुळे हवामानाशी संबंधित खर्चात दरवर्षी १६.९ अब्ज डॉलर्सची बचत झाली आहे. अमेरिकेतील इतर कोणत्याही आर्थिक क्षेत्रापेक्षा वाहतुकीमुळे जास्त हरितगृह वायू उत्सर्जन होते. 'अर्थजस्टिस'मुळे १० कोटी लोकसंख्या असलेल्या १० राज्यांना शून्य-उत्सर्जन नियम स्वीकारण्यास मदत झाली आहे. राष्ट्रीय उद्योग मानकांना आकार देण्याची शक्ती असलेल्या कॅलिफोर्नियाने लोकोमोटिव्ह आणि सार्वजनिक बसेसचे विद्युतीकरण करण्यासाठीदेखील वचनबद्धता दर्शविली आहे.

पृथ्वी वाचवायची असल्यास डिझेल, पेट्रोल आणि कोळसा यांचा अनिर्बंध वापर बंद करायला हवा; पण सध्या ते थांबवणे शक्य नाही. कारण आपण विकासाच्या मागे धावत आहोत. पेट्रोल, डिझेल आणि कोळशाशिवाय विकास शक्य नाही. अशा परिस्थितीत आता आपल्याला या संकटांमध्ये राहून स्वतःचे संरक्षण कसे करू शकतो, याचा विचार करावा लागेल. यासाठी गावपातळीवरील लोकांनाही अशा संकटात आपण कसे जगावे, याची माहिती द्यावी लागेल. आज आपण शहरी भागात राहतो, म्हणून हे शहरी उष्णता बेट आहे. येथे सिमेंट, लोखंड आणि पक्के रस्ते दिवसा उष्णता शोषून घेतात आणि रात्री ऑक्सिजन सोडतात.

अशा परिस्थितीत आता आपल्याला हवामान अनुकूलन अंतर्गत 'अर्बन हीट आयलंड'मध्ये शहरी जंगलांची आवश्यकता आहे. विकासाला समांतर शहरी जंगले विकसित करण्याची गरज आहे. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)